# महात्मा फुले आणि - सत्यशोधक चळवळ.

९६५५
म. ग्रं. सं. ठाणे
विषय चरित्र
सं: नं. ५४२०

REFBK-0008576

मा. प. मंगुडकर

अनुक्रमांक
विभाग
क्रा
वाचनालय

# महात्मा फुले

# आणि

# सत्यशोधक चळवळ

— लेखक —

## मा. प. मंगुडकर

REFBK-0008576

किंमत १२ आणे

प्रकाशक
स. मा. गर्गे
सोशल बुकस्टॉल
फर्ग्युसन रोड, पुणें ४.

संगम प्रकाशन दुसरें

सर्व हक्क डॉ. प. रं. मंगुडकर यांच्या स्वाधीन

( प्रथमावृत्ति )

मुद्रक
महाराष्ट्र मुद्रणालय
२५२ अ / ४ नारायण,
पुणें २.

व्यक्तिस्वातंत्र्य, बुद्धिप्रामाण्यवाद आणि शास्त्रीय
मानवतावाद यांचे पुरस्कर्ते आणि भारतीय
नवजीवनाच्या चळवळीचे ज्ञात आणि
अज्ञात शिल्पकार यांना
सादर अर्पण

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.

# थोडेसें प्रकाशनासंबंधीं

विचारप्रधान साहित्य प्रकाशित करण्याचा हेतु मनाशीं ठेवून लेखन-प्रकाशन करण्याची योजना मी व माझ्या कांहीं मित्रांनीं तयार केली. त्या योजनेला अनुसरून प्रथम 'राज्यशास्त्राचा विकास' व नंतर 'महात्मा फुले आणि सत्यशोधक चवळवळ' हीं दोन पुस्तकें वाचकांपुढें आम्ही ठेवलीं आहेत. त्यांचें योग्य तें मूल्यमापन करून वाचक आमच्या प्रकाशन कार्यास प्रोत्साहन देतील अशी अपेक्षा आहे.

राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, वाङमयीन विषयावर अभ्यासपूर्वक लिहिलेल्या पुस्तकांची संख्या फार थोडी व त्यांचा वाचकवर्गहि अगदीं बेताचाच. त्यामुळें अभ्यासू लेखकांकडून पुस्तक मिळविण्यापासून त्याला ग्राहक मिळविण्यापर्यंत सर्वच कामें अवघड, शिवाय आर्थिक दृष्टयाहि असा प्रयत्न फायद्याचा ठरण्याची शक्यता फार कमी. तरी पण, आमच्या प्रकाशनांनीं वाचकांच्या विचारांना चालना देण्याचे कार्य झाल्यास मूळ हेतु साध्य झाल्याचें समाधान आम्हांस मिळूं शकेल.

'राज्यशास्त्राचा विकास' या पुस्तकांत मुख्यतः पाश्चात्त्य राजकीय तत्त्वांचा विकास गेल्या पंचवीस शतकांत कसा झाला याचें विवेचन करण्याचा प्रयत्न केला आहे. ग्रीक राजकीय तत्त्वज्ञानापासून मार्क्सवादी तत्त्वज्ञानापर्यंत प्रमुख विचारप्रवाहाचा त्यांत परामर्ष घेतला आहे. राजकीय प्रश्नांचें तात्त्विक स्वरूप समजण्यास या विवेचनाचा उपयोग होईल अशी आशा केल्यास ती अनाठायीं ठरणार नाहीं.

'महात्मा फुले आणि सत्यशोधक चळवळ' या पुस्तकांत महाराष्ट्रांतील एका जिव्हाळयांच्या प्रश्नाची चर्चा माझे मित्र प्रा. मा. प. मंगुडकर यांनीं केली आहे. 'कल्चरल असोसिएशन' च्या एका बैठकीमुळें त्यांनीं याच विषयावर वाचलेल्या निबंधांतील विचार व विवेचन नव्या स्वरूपाचें वाटले.

अधिक संशोधन करून पुस्तकाच्या स्वरूपांत तें प्रकाशित करण्याचा विचार आम्ही ठरविला. त्यासाठीं लेखकांनीं प्रत्यक्ष मुलाखती, मुंबई विधान सभेचे अहवाल, तत्कालीन वृत्तपत्रांच्या फायली इत्यादीचा भरपूर उपयोग करून सत्यशोधक चळवळींसंबंधीं पुष्कळ माहिती प्रथमच प्रकाशांत आणली आहे. महात्मा फुले यांच्या कामगिरीचें मूल्यमापन आणि त्यानंतरच्या सत्य-शोधक चळवळीचे गुणदोषविवेचन असें या पुस्तकाचें दुहेरी स्वरूप आहे. पुस्तकांत स्पृश्य व अस्पृश्य समाजांच्या आगामी संबंधाचे स्वरूप आणि जातीयतेचें उच्चाटन करण्यासाठीं लेखकांनीं सुचविलेले उपाय याकडे वाच-कांचें लक्ष वेधावें ही अपेक्षा उद्यांच्या महाराष्ट्राचे सुसंवादी समाज जीवन निर्माण होण्याच्या दृष्टीनें अशा उपायांची आवश्यकता आहे हें निराळे सांगण्याची गरज नाहीं.

'शांति पर्वातील कथा,' आणि 'मुंबई राज्यांतील नगरपालिकांचा कारभार' ही आमचीं पुढचीं प्रकाशनें आहेत. त्याशिवाय महाराष्ट्राच्या आर्थिक विकासाच्या दृष्टीनें मार्गदर्शक ठरणारें पुस्तक लौकरच प्रकाशित करावें अशीहि आमची अिच्छा आहे. या कामीं महाराष्ट्रांतील प्रथितयश लेखकांचें सहकार्य मिळविण्याचा आमचा प्रयत्न चालू आहे. अर्थात हें सर्व वाचकांच्या सक्रिय प्रोत्साहनावरच अवलंबून आहे.

आमचीं प्रकाशनें महाराष्ट्र समाजाला वैचारिक दृष्टि देणारीं ठरावीं अशी आमची नम्र अपेक्षा आहे.

स. मा. गर्गे

# निवेदन

महात्मा फुले हे जातिव्यवस्थेवर प्रहार करणारे आधुनिक भारतांतील पहिले बंडखोर पुरुष होत. एकोणिसाव्या शतकांतील या देशांतील प्रबोधनाच्या चळवळीचे ते एक प्रमुख प्रणेते आहेत. त्यांच्या सार्वजनिक सत्यधर्मांतून मानवतावादाचा--भूतदयावादाचा व्यापक विचार प्रत्ययाला येतोच, परंतु त्याचबरोबर त्यांच्या अितर ग्रंथांतूनहि व्यक्तिप्रामाण्य आणि विचारप्रामाण्याला पोषक असे अनेक विचार आढळतात. असें असूनसुद्धां ज्योतिबा हे एक 'ब्राम्हणद्वेष्टे' 'जात्यंध' गृहस्थ होते असा अपसमज सर्वत्र रूढ आहे. याची अंशत: जबाबदारी खुद्द म. ज्योतिबांवर पडत असली तर त्याचे खरे उत्तरदायित्व त्यांच्या टीकाकारांवरच पडते. त्यांच्या अभ्यासकांनीं ज्योतिबांच्या विचाराचा आशय व त्यांची अभिव्यक्ति यामध्यें गल्लत केली आहे. ज्योतिबांच्या आचाराचा आणि विचाराचा मुख्य आशय हा व्यापक भूतदयावादाचा वा विश्वबंधुत्वाचा होता. परंतु त्यांच्या विचाराची अभिव्यक्ति मात्र अत्यंत ओबडधोबड, प्रसंगी ब्रह्मद्वेष्टी अशी झाली आहे. परंतु अभिव्यक्तीपेक्षां आशय महत्त्वाचा असल्यानें समीक्षकांनीं तिकडेच अधिक अवधान द्यायला हवे! ज्योतिरावांनीं प्रथम अि. स. १८५२ मध्यें अस्पृश्यांसाठी शाळा काढली. त्यांनीं सर्वाआधी सवर्ण हिंदूच्या पाणवठ्यावर अस्पृश्यांना पाणी भरतां यावे म्हणून चळवळ केली. शेकडो वर्षें अज्ञानांत असलेल्या स्त्रियांच्या शिक्षणाला त्यांनीं आरंभ केला. त्याचप्रमाणें कर्जाच्या ओझ्याखाली दबलेल्या शेतकऱ्यांबद्दल त्यांनीं अनेक ठिकाणीं सहानुभूतिपूर्ण उदगार काढले आहेत. चुकून वांकडे पाऊल पडलेल्या कुमारिका आणि विधवा यांच्या प्रसूतीसाठी आपल्या घरांत त्यांनीं व्यवस्था केली. त्याचप्रमाणें निग्रोंना दास्यमुक्त करणाऱ्या अमेरिकन स्वातंत्र्यवीरांना 'गुलामगिरी' मोठ्या भक्तिभावानें अर्पण केलें आहे. ज्योतिबांच्या या सर्व विचारांत आणि कृतीत व्यापक विश्वकुटुंबवादी विचार प्रतिबिंबित झाले आहेत. ज्योतिबांनी ब्राह्मण, भट किंवा जोशी यांच्यावर जरी टीका केलेली असली तरी ती खऱ्या अर्थानें ब्राह्मण्य,

जोशीवृत्ति किंवा भटशाही यावर होती. हे टीकाकारांनी लक्षांत घ्यावे. शूद्र अतिशूद्र व स्त्रिया यांच्याबद्दलच्या त्यांच्या सर्व विचारांना अशा व्यापक भ्रातृभावाचे अधिष्ठान होते. परंतु या विचाराचा आविष्कार मात्र त्यांना यथायोग्य करता आली नाहीं त्यांनीं 'भट' 'जोशी' यांच्यावर चौफेर हल्ले केलेले आहेत. परंतु निर्विकार मनाच्या आणि तटस्थ वृत्तीच्या अभ्यासकानें या दोन्हीमध्यें सीमारेषा मारून ज्योतिबांच्या कार्याचे सम्यक मूल्यमापन करणें आवश्य आहेअशा दृष्टीकोनांतून ज्योतिबाकडे जर पाहिले तर त्यांच्याबद्दलचे सर्व अपसमज नष्ट होतील. आणि त्यांचे आपणास योग्य आकलन होऊं शकेल. निदान माझी तशी श्रध्दा असल्यामुळे मी हा प्रयत्न माझ्या पुस्तकांत–केला आहे.

त्याचप्रमाणें अलिकडें ज्योतिबांच्या कार्याचें मूल्यमापन करतांना ते 'शेतकरी कामकरी राज्याचे' पहिले अध्वर्यु होते असे सांगून साम्यवादी दृष्टीनें त्यांच्या कार्यांकडे पाहिले जाते. त्यांनी येथील समाजव्यवस्थेंत वादळे उठवून सामाजिक सुधारणा घडवून आणल्या असा सुधारणावादी मानदंड हातांत घेऊन कांहींनी त्यांच्या कार्याचें मोजमाप केले आहे. ब्रिटिश सरकारला अनुकूल भूमिका घेऊन त्यांनी येथील राजकीय झगड्याला विरोध केला. त्यामुळें ते 'राष्ट्रीय चळवळीचे शत्रू' होते असा कांहींनी निर्णय दिला. माझ्या मते वरील तिन्हीहि विचारांत सत्यांश आहे, सत्य नाही. कारण त्यांच्या वरील तिन्हीहि भूमिकांच्या मुळाशी त्यांचा मानवतावादी विचार प्रामुख्यानें कार्य करीत होता. त्यांच्या या विचाराचे वरील तिन्हीहि विविध आविष्कार होते. यांच्या या मूलभूत प्रेरणेकडे टीकाकारांचे लक्ष वेधावे असाहि माझा या विवेचनांत हेतु आहे.

ज्योतिबांनी सामाजिक समतेचा जो महान् विचार ६०–७० वर्षांपूर्वीं या देशांत मांडला. त्याची आजच्या लोकशाहीच्या काळांत आपणास अत्यंत गरज आहे. सामाजिक समता हाच लोकशाहीचा मुख्य गाभा आहे. जन्माधिष्ठित जातिव्यवस्थेवर आधारलेली लोकशाही या देशांत खऱ्या अर्थानें नांदू शकत नाही. लोकशाहीच्या विकासासाठीं आपणास जाति व्यवस्था शक्य तितक्या लवकर नष्ट केली पाहिजे.

कारण लोकशाही हा केवळ राज्यकारभाराचा प्रकार नव्हे तरी ती व्यापक जीवननिष्ठा आहे. ( Democracy is not the form of government. It is the philosophy of life) व्यक्तिस्वातंत्र्य आणि व्यक्तिविकास हाच या जीवनाच्या तत्त्वज्ञानाचा पाया आहे. प्रत्येक व्यक्तीच्या अंतरंगांत अमर्याद सर्जनशील शक्ति असतात, त्यांचा आविष्कार व्हावा हीच प्रत्येकाची धडपड असते. या सुप्त क्रियाशील शक्तीच्या आविष्कारांतूनच मानवी जीवन आणि संस्कृति समृध्द होत असतात. कला, संस्कृति, वाङमय ही याच सर्जन शक्तीची मनोहर अपत्ये आहेत. लोकशाहीच्या राज्यांत व्यक्तीचा असा सर्वांगीण विकास व्हावा अशी अपेक्षा असते परंतु जाति व्यवस्था या त्याच्या स्वातंत्र्याच्या आणि प्रगतीच्या आड उभी असते. कारण ती जन्माच्या अपघातानें त्याचे कर्तृत्व मर्यादित करते. सामाजिक विषमता व्यक्तींना माणुसकीचें मूलभूत हक्क देखील नाकारीत असते. चांभाराच्या मुलाला या व्यवस्थेंत वेद किंवा पुराण यांचा अभ्यास करायला मज्जाव असतो. अशी ही जातिव्यवस्था लोकशाहीच्या तत्त्वज्ञानाशीं विसंवादी सूर काढीत असते. तिचा निःपात सर्व मार्गांनी झाला पाहिजे.

ज्योतिबांनीं सुरूं केलेले परंतु मध्यंतरी राजकीय लढ्यामुळें खोळंबून राहिलेले हे सामाजिक समतेचे कार्य आज आपणास पुरे करायचे आहे. न्यायमूर्ति रानडे यांनी एके ठिकाणी म्हटल्याप्रमाणे "आजच्या समाज सुधारकांचें कार्य असें असतें कीं, त्यांनीं मागाल पिढींतील समाज सुधारकांनीं समाजसुधारणेचें अर्धवट सोडलेले वाक्य पुरें करावयाचें. १"

जातिव्यवस्थेचे निर्मूलन करण्यासाठीं कोणत्या विधायक मार्गांचा अवलंब केला पाहिजे या विचाराचा प्रपंच मी पुस्तकांत करूं शकलो नाही. त्याच्या कक्षेत ते कदाचित् बसूंहि शकले नसते. परंतु सामाजिक समतेचें आपले स्वप्न साकार कसे होईल याची चिंता आपणास लागली पाहिजे. ब्राह्मण ब्राह्मणेतर वाद उकरून काढून कोणी कोणावर जास्त अन्याय केला याची चर्चा फारशी फलदायी होणार नाही. अशी चर्चा माझ्या मते अनावश्यक आणि असमर्थनीय आहे. जातीयतेचें निर्मूलन कसे करतां येईल यावर

विधायक मार्गांनी अधिक विचार झाला पाहिजे, आजच्या विचारवंतांना काळानें दिलेले हेंच आव्हान आहे असे वाटते. हे आव्हान आपण स्वीकारले पाहिजे. याबाबत पुढील तीन मूलगामी विचारांचा आपणास पाठपुरावा करावा लागेल असे माझें प्रांजल मत आहे.

जातिव्यवस्थेचा खरा कणा या देशांतील सात लाख खेड्यांत पसरला आहे आणि खेड्यांतील जीवनाचा खरा आधार तेथील मध्ययुगीन अर्थ-व्यवस्था आहे. त्यामुळें जाति व्यवस्थेच्या उच्छेदासाठीं आपण प्रथम ग्रामीण अर्थव्यवस्थेंत मूलग्राही बदल केले पाहिजेत. खेड्यांतले जीवन तळापासून ढवळून काढल्याशिवाय जातिव्यवस्था या देशांतून जाणार नाही. खेड्यांतले जीवन आधुनिक विज्ञाननिष्ठ संस्कृतीनें गदगदा हलविल्या-शिवाय तेथें शेंकडो वर्षे घोरत पडलेली, सुस्तावलेली सामाजिक विषमता जागी होणार नाही. यासाठीं प्रथम मध्ययुगातील शेतीची अवजारे टाकून दिलीत पाहिजे व आधुनिक पद्धतीनें शेती कसण्यास सुरुवात केली पाहिजे. जुनाट अर्थव्यवस्था जाऊन तेथें सहकारी अर्थव्यवस्थेचें नवे प्रयोग झाले पाहिजेत. या नव्या अर्थ व्यवस्थेबरोबर आणि अद्ययावत् उत्पादनाच्या साधनाबरोबर या शतकांतील विचार तेथें जाऊन पोंचतील. यांतून जाति व्यवस्थेला हादरे बसूं लागतील.

खेड्यांतील अर्थ व्यवस्था बदलून तेथील बाह्य वातावरणांत बदल होईल. परंतु या बाह्य बदलाबरोबर तेथील ग्रामीण जनतेच्या मनांत बदल करणारी सांस्कृतिक चळवळ तेथें सुरुं झाली पाहिजे. कांहीं ध्येयवादी तरुणांनी बुद्धिप्रामाण्य, व्यक्तिस्वातंत्र्य शास्त्रीय मानवतावाद, इत्यादि अत्यंत महत्त्वाचें विचार तेथें पसरविण्यासाठीं अशा सांस्कृतिक चळवळींना वाहून घेतले पाहिजे. हे कार्य शिक्षण प्रसारांतून लवकर होण्यासारखें आहे. यासाठीं सर्व प्रकारच्या शैक्षणिक कार्याला त्यांनी हातभार लावला पाहिजे. या सांस्कृतिक आणि शैक्षणिक क्षेत्रांत सुदैवानें महात्मा फुले, महर्षि विठ्ठल रामजी शिंदे, गुरुवर्य बाबुराव जगताप, कर्मवीर भाऊराव पाटील यांनी आपल्या जीवनकार्यानें मोठे आदर्श निर्माण केले आहेत. म. फुले यांची श्रेष्ठ सांस्कृतिक परंपरा माझ्या मतें महर्षि शिंदे, कर्मवीर भाऊराव पाटील, गुरुवर्य

९० ५९३ अनुक्रम विभाग क्रमांक २३/१२/५४

जगताप यांनीं अद्यापहि चालविली आहे. त्यांच्याच पावलावर पाऊल टाकून नव्या ध्येयवादी तरुणांनी हेंच सांस्कृतिक कार्य पुढें पसरविण्याचें ठरविले तर सामाजिक विषमतेस लवकर आळा बसेल. खेड्यांतील आर्थिक क्रांतीनें पोषक वातावरण तयार होईल तर अशा सांस्कृतिक चळवळीनीं खेडुतांचीं मनें तयार होतील. या दुहेरी आघातांनी जातिव्यवस्था लवकर हतबल होईल.

परंतु सांस्कृतिक चळवळीस वाहून घेणाऱ्या युवकांनीं एक पथ्य कटाक्षानें पाळले पाहिजे. ते म्हणजे त्यांनीं प्रचलित राजकारणापासून संपूर्णपणें अलिप्त राहिले पाहिजे. राजकारण हे मुख्यत: सत्तेचें राजकारण असते. आणि सत्तेच्या राजकारणांत गुरफटलेला कोणताहि कार्यकर्ता सामाजिक क्रांतीचा बंडखोर कार्यक्रम हाती घेऊं शकत नाहीं. कारण या सत्ताभीलाषी राजकारणी पुरुषाची सारी मदार ही मतदारांवर असते. राजसत्तेची सिंहासनें मतदाराच्या मर्जीवर उभारलेली असतात. अशावेळीं मतदारांना दुखवून क्रांतिकारक विचार मांडण्याऐवजी तो त्यांना खूष ठेवून सनातन विचारच मांडीत राहील. अधिकाराच्या राजकारणाची किरीट कुंडले उतरवून ठेवणारा नेताच जनतेला न रुचणारी परंतु पुरोगामी असलेली मते बोलून दाखवू शकतो. ‘ रुचेल ते बोलणार आणि पटेल ते करणार ’ हा करारी बाणा फक्त सांस्कृतिक चळवळीचे कार्यकर्तेंच पाळूं शकतील. सत्तेच्या राजकारणांत गुरफटलेल्यांना ते शक्यहि नाही आणि अिष्टहि नाहीं. या द्ष्टीनें सत्तांकांक्षेपासून चार पावलें दूर राहिलेल्या आणि सांस्कृतिक चळवळीला वाहून घेणाऱ्या युवक संघटना या देशांत निर्माण झाल्या तर जातिव्यव स्थेचा मृत्युलेख लवकर लिहिला जाईल.

आर्थिक आणि सांस्कृतिक चळवळीबरोबर सामाजिक भेदावर आधारलेल्या कांहीं कायद्यांतहि बदल झाला पाहिजे. आजच्या कायद्यांत ब्राह्मणासाठीं एक तरतूद तर बाकीच्या सवर्ण हिंदूसाठीं निराळीच व्यवस्था आहे त्याचप्रमाणें अस्पृश्यांवर अन्याय करणारे देखील कांहीं कायदे आहेत. त्यांचा धांवता उल्लेख पुढीलप्रमाणें करतां येईल.

हिंदु कायद्याच्या बहुतेक महत्त्वाच्या प्रकरणामध्यें द्विज व शूद्र असा भेद केला. आहे या कायद्यांतील विषमतेला मुख्य आधार म्हणजे ब्राह्मणांना

उपलब्ध असलेली उपनयन ही संस्था होय. दत्तक, वारसा, विवाह या बाबतींत ब्राह्मणांना एक कायदा व शूद्रांना कायदा दुसरा अशी स्थिति आहे. या कायद्यानुसार न्यायालयांत अनेक मराठा कुटुंबांना शूद्र म्हणून लेखण्यांत येते. महाराष्ट्रांतील शहाण्णव कुळी मराठे हे क्षत्रिय आहेत व त्यांना ब्राह्मणांचा कायदा लागूं होतो. परंतु शहाण्णव कुळी मराठे नसलेले असे बहुसंख्य हिंदु हे प्रचलित कायद्याने शूद्र म्हणून गणले जातात. कोल्हापूरचे छत्रपती शाहू महाराज यांचे वेदोक्त पुराणोक्त प्रकरण याच वादांतून निघाले. यासंबंधी इ. स. १९२८ सालीं सुबाव विरुद्ध रावा या केसमध्यें न्यायमूर्ति माडगांवकर व न्यायमूर्ति पारकर यांनीं दिलेला निर्णय त्या काळांत पुरोगामी असला तर त्यामुळें कायद्यांतील मूळची विषमता कशी नष्ट होणार ? मराठा समाजाचें महाराष्ट्रांतील स्थान लक्षांत त्यांना कायद्यानें शूद्र मानण्याचे प्रकार त्वरित बंद झाले पाहिजेत परंतु याहूनहि ते केवळ इतराप्रमाणे माणसे आहेत. व्यापक मानव्याच्या भूमिकेवरून कायद्यांतील ही विषमता नष्ट केली पाहिजे.

याबाबतचे दुसरे उदाहरण म्हणजें १८९० सालचा म्युनिसिपल नोकराबाबतचा मुंबई इलाख्यांतील कायदा होय. या कायद्यामुळें भंगी लोकांवर मोठावर अन्याय होत आहे. हे लोक जर परवानगीवाचून गैरहजर राहिले अथवा तीन महिन्याची आगाऊ सूचना न देतां काम सोडून गेले तर कायद्यानें त्यांना नगरपालिका तुरुंगांतहि पाठवूं शकते. सर्वसाधारणपणे सर्व स्पृश्य नोकरांना नोकरीच्या या सामान्य नियमांचा भंग केला तर जास्तींत नुकसान भरपाई द्यावी लागते. त्याच्यावर दिवाणी कोर्टांत दावा लावला जातो. परंतु सर्व सवर्ण हिंदु नोकरांना हा नियम लागूं असतांना भंग्यांना मात्र फौजदारी कोर्टांत या गुन्ह्यांसाठीं खेचण्याची कायद्यांत तरतूद असावी हा सामाजिक समतेचा अवमान आहे.

याचप्रमाणें मद्रासमध्ये १८१६ या क्रिमिनल रेग्युलेशन कायदा लागूं आहे. या कायद्यानें खालच्या जाती व वरच्या जाती असा भेद केला आहे. या कायद्यानुसार खालच्या जातींतल्या लोकांना खोड्यांत घालतां येते. वरच्या जातीना असली पाशवी शिक्षा लागूं नाहीं. विषमतेवर आधा-

रलेले असले सर्व कायदे नष्ट होऊन सामाजिक समतेचे अधिष्ठान असलेले नवे कायदे ताबडतोब अमलांत आले पाहिजेत.

वरील तिन्ही गोष्टीबरोबर गांवाच्या बाहेरील महारवाडा, मांगवाडा प्रथम गांवांत आला पाहिजे. या कामीं सरकारनें व समाजांतील पुरोगामी गटानें निश्चित योजना लवकर आंखली पाहिजे. या योजनेनुसार गांवांत अस्पृश्यांना घरे व रानांत त्यांना शेते मिळवून दिली पाहिजेत, त्याचप्रमाणें सर्वत्र आंतर्जातीय विवाहांना उत्तेजन दिले पाहिजे. परंतु विचारांबाबत दुष्ट वर्तुळ आहे. येथील जातिव्यवस्थेची उतरंड मोडल्याशिवाय आंतर्जातीय विवाह होणार नाहींत. परंतु त्याचबरोबर अशीं लग्नें घडायला लागल्याशिवाय जातिव्यवस्था देखील लवकर जाणार नाहीं. हें दुष्ट वर्तुळ तोडण्यासाठीं समाज धुरिणांनीं आधी सांगितलेल्या तिन्ही विचारावर भर दिलाच पाहिजे. परंतु त्याचबरोबर आंतर्जातीय विवाहांना आणि महारवाडा गांवांत आणण्याच्या विचारांना उत्तेजन दिले पाहिजे. असे झाले म्हणजे आमच्या जाति व्यवस्थेचे भरतवाक्य लवकर लिहिले जाईल.

सत्यशोधक चळवळीचा इतिहास लिहितांना मी शक्य तेवढी वस्तुनिष्ठ तटस्थ अभ्यासकाची भूमिका सांभाळली आहे. विवेचनांत कोठें दोष आढळल्यास तो माझ्या पूर्वग्रहामुळें नसून अभ्यासांतील उणिवांमुळें आहे असे टीकाकारांनी मानावे. त्यांनीं माझ्या या पुस्तिकेवर विधायक टीका केल्यास त्यांच्या टीकेचे मी मनापासून स्वागत करीन.

माझ्या या छोटया पुस्तकास देखील मला अनेकांचे सहाय्य मिळाले आहे. त्यांत पुणे विद्यापीठांतील राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख व रीडर आणि माझे पी. एच. डीचे गुरु (Guide) डॉ. ना. र. देशपांडे एम. ए. एल. एल. बी. पी. एच. डी ( कोलंबिया ) यांचा मला प्रामुख्यानें उल्लेख केला पाहिजे. त्यानी अगदी प्रथम माझे हस्तलिखित वाचून ज्या मला उपयुक्त सूचना केल्या त्यामुळें पुस्तकांतील उणिवा दूर घेण्यास साहाय्य झाले आहे. त्याचप्रमाणें माझे मित्र स. मा. गर्गे ( सहसंपादक–सकाळ ) श्री. दि. के. बेडेकर, प्रा. मधुकर नामजोशी, प्रा. गं. बा. सरदार, आमदार बाळासाहेब मोरे वकील पंढरपूर यांच्याशी चर्चा करायला मिळाल्यामुळें

माझ्या विचारांत स्पष्टता आली. या सर्वांचा मी कृतज्ञतापूर्वक उल्लेख करूं इच्छितो. याशिवाय श्री. शंकर रामचंद्र खरात वकील बी. ए. एल. एल्. बी. यांनी सत्यशोधकी तमाशांत काम करणाऱ्या कांहीं अस्पृश्य बांधवांना बोलवून त्यांच्या मुलाखती घेण्यास मला मदत केली याबद्दल मी त्यांचे व त्यांनी बोलाविलेल्या इतर सर्वांचे आभार मानतो त्याचप्रमाणें केळकर ग्रंथालयाचे चालक, श्री. प्रतापराव शिंदे, श्री. ए. के घोरपडे यांनी पुस्तकांच्या बाबतींत मला केलेल्या मदतीबद्दल मी त्यांचे हार्दिक आभार मानतो. वरील सर्वांचा मी ऋणी आहे. 'लोकशक्ति'चे संपादक श्री. नरूभाऊ लिमये यांनीं हे पुस्तक लेखमालेच्या स्वरूपांत साप्ताहिक लोकशक्तित प्रसिद्ध करून पुस्तक प्रकाशनास परवानगी दिली याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. शेवटी प्रकाशनाच्या कामांत दैनिक लोकशक्तिमधील मित्र व महाराष्ट्र मुद्रणालयांतील कामगार यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. त्याचप्रमाणें लेखनकेंद्राचे संचालक व माझे स्नेही रा. बा. कुलकर्णी तसेंच श्री. नारायणराव डोळे एम. ए. यांनी माझ्या या कामांत सर्व प्रकारे मदत केली आहे. औपचारिकपणाचा दोष पत्करून देखील मी त्यांचे हार्दिक आभार मानतो.

गोखले इंन्स्टिटयूट ऑफ् पॉलिटिक्स
अँड इकॉनॉमिक्स, वसतिगृह, पुणें ४.
२७ नोव्हेम्बर, १९५४
म. फुले पुण्यतिथी

**मा. प. भंगुडकर**

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. क्र. ८५७६
अनुक्रम ९.७.५.९३
९३/१/५५

# राष्ट्रवादानें सामाजिक चळवळी
# ...ळून गतप्रभ केल्या

एकोणिसाव्या शतकामध्यें इंग्रजांकरवी पाश्चात्य संस्कृतीशीं हिंदुस्थानचा परिचय झाला आणि त्याबरोबर येथें नवजीवनाच्या चळवळीस प्रारंभ झाला. बंगालमधील ब्राम्हो समाज, पंजाबांतील आर्य समाज, महाराष्ट्रांतील प्रार्थना समाज, सत्यशोधक समाज आणि आगरकरांचा सुधारकी संप्रदाय हे सर्व या नव्या प्रबोधनाच्या युगाचे प्रारंभ होते. अनेक शतकें निद्रिस्त असलेल्या या देशाची ही जागृतींतील पहिली चुळबुळ होती. परंतु दुर्दैवानें १९ व्या शतकाच्या शेवटापर्यंतच या सर्व पुरोगामी चळवळी येथील पुराणाभिमानी राष्ट्रवादानें गिळून टाकल्या. भारतीय राष्ट्रवादाचा जन्म न्यूनगंड आणि वैफल्य यांच्यातून झाला आहे. इंग्रजांच्या जोमदार, विज्ञाननिष्ठ आणि ज्ञानसंपन्न समाजाशीं येथील मध्ययुगीन समाजरचनेची तुलना करतां आम्ही किती मागासलेले आहोंत याची तीव्र बोंचणी व जाणीव आम्हाला होऊं लागली. यांतून न्यूनगंड उद्भवले आणि त्यांच्या बुद्धिनिष्ठ शास्त्रांनीं आमची सर्व श्रद्धामूल्यें खोटी ठरविलीं, आमच्या राज्याबरोबर आमच्या सनातन कल्पनाहि नष्ट केल्या. जगण्यांसारखें सर्व नाहींसें झालें. यांतून वैफल्यवाद पुढें आला. परंतु न्यूनगंड आणि विफलता यांनीं स्वसंरक्षणार्थ पवित्रा घेतला तो मात्र बरोबर उलटा ! आक्रमक बनून या दोन प्रवृत्तीनीं असें सांगायला सुरुवात केली कीं पश्चिमेकडील जेंजें आहे तें तें सर्व क्षुद्र आणि निंद्य व आमच्या

भूतकाळांत पूर्वजांनीं जेंजें लिहिलें आहे तें तें सर्व सत्य आणि सुंदर आहे. या पुनरुज्जीवनवादी विचारांचे नेते महाराष्ट्रांत विष्णुशास्त्री चिपळूणकर, बंगालांत परमहंस, विवेकानंद होते. या प्रतिगामी प्रवृत्तींनीं येथील सर्व नवजीवनाच्या चळवळी गतप्रभ केल्या. जवळ जवळ अर्धें शतक खोळंबून राहिलेल्या नवजीवनाच्या चळवळीकडे आतां बुद्धिमंतांचें लक्ष वेधूं लागलें आहे. या सर्व चळवळीमध्यें सत्यशोधक चळवळीचें स्थान अनन्य साधारण आहे. तिच्या मूळच्या विशुद्ध प्रेरणांचा निर्विकल्प मनानें कांटेकोर अभ्यास झाला तर महाराष्ट्रांतील प्रबोधनाच्या चळवळीला फार मोठें साहाय्य होणार आहे. सत्यशोधक चळवळ म्हणजे सामाजिक दास्यामध्यें अनेक वर्षें दडपल्या गेलेल्या दलितांचा पहिला प्रतिकाराचा आवाज होता. जाति व्यवस्थेखालीं दबलेल्या मानव्याचा तो एक उत्कट उद्गार होता. अनेक वर्षें साध्या माणुसकीलाहि पारख्या झालेल्या दीनदुबळया जिवांच्या अव्यक्त भावनांचा तो एक उद्रेक होता.

## समतेवर विश्वास घोषित करणारी पहिली चळवळ

मानवाच्या समतेवर विश्वास घोषित करणारी आधुनिक महाराष्ट्रांतील ही पहिली चळवळ होय. या चळवळींतील मूळच्या पुरोगामी विचारांची उजळणी करणें हें देखील आजच्या सामाजिक सुधारणेसाठीं आवश्यक आहे.

भारताची परदास्यांतून मुक्तता झाली स्वातंत्र्याबरोबर आमच्या जीवनांतील सर्व दुःखें नष्ट होतील अशी भोळी आशा आम्ही उराशी बाळगून होतो. तथापि नुसत्या राजकीय स्वातंत्र्यानें समाजांतील सर्व प्रश्न सुटत नाहींत. उलट राजकीय स्वातंत्र्याबरोबर सामाजिक स्वातंत्र्यहि समाजांत वावरत असलें पाहिजे. किंबहुना सामाजिक सुधारणा या पायाभूत असतात. व राजकीय सुधारणा या त्यावर डोलाऱ्याप्रमाणें आधारलेल्या असतात. राजकीय सुधारणा म्हणजे सर्व सामाजिक दुर्गतीवर रामबाण उपाय या कल्पनेबद्दल गेल्या ७–८ वर्षांत आपला भरपूर भ्रमनिरास झाला आहे. म्हणूनच आतां आपली दृष्टि हळूहळू सामाजिक सुधारणेकडे वळूं लागली आहे. या दृष्टीनें सत्यशोधक चळवळीला फार मानाचें स्थान द्यावें लागेल. प्रबोधनाच्या चळवळीचा भाग म्हणून देखील या चळवळीकडे पाहतां येईल.

शिवाय महाराष्ट्राच्या सामाजिक आणि राजकीय जीवनाच्या अभ्यासकाला सत्यशोधक चळवळीचा अभ्यास नुसता आवश्यकच नव्हे तर अटळ आहे.

या चळवळीचा अभ्यास करतांना आपणास तिचा उद्‌गम आणि विकास पहिला पाहिजे. ती मुख्यतः दक्षिणेंत म्हणजे विंध्य पर्वताच्या खालींच कां नजरेस पडते याची छाननी केली पाहिजे. या चळवळीच्या विकासामध्यें तिची मूळची पुरोगामी वैचारिक भूमिका कितपत टिकून राहिली, नसल्यास ती कां सुटली याची कठोर मीमांसा झाली पाहिजे. आणि शेवटी या चळवळीचा वारसा भविष्य काळांत आपणास चालवावयाचा असला तर कोणत्या विधायक मार्गांचा आणि विचारांचा आपणास अवलंब केला पाहिजे याची शास्त्रीय परंतु निर्भय चर्चा झाली पाहिजे.

## सत्यशोधक चळवळीचे तीन कालखंड

सत्यशोधक चळवळीचा ऐतिहासिक विकास कसा झाला यासंबंधीं विद्वानांत मतभेद आहेत. तथापि अभ्यासाच्या सोयीच्या दृष्टीनें या चळवळीसाठीं तीन कालखंड पाडणें सोयींचे होईल. पहिला पुराणकालीन काल. या कालामध्यें देखील ब्राह्मणांविरुद्ध क्षत्रीय व इतर वर्ण यांचा झगडा चालू होता. दुसरा कालखंड संतांच्या सामाजिक चळवळीपासून म्हणजे दहाव्या शतकापासून तो ब्रिटिशपूर्व कालापर्यंतचा. याच काळांत निरनिराळ्या संतांनीं ब्राह्मणांच्या बौद्धिक दास्यावर हल्ला करून इतर जमातींना त्यांच्या गुलामगिरींतून मुक्त केले आणि तिसरा कालखंड म्हणजे ज्योतिबा फुले यांच्या सत्यशोधक चळवळीपासून सुरू झालेला. या तिन्ही कालखंडामध्यें ही एकच चळवळ चालू होती. तिच्या आविष्कारांत फक्त मामुली बदल झाला होता असे कांहींचें मत आहे. म्हणजे या चळवळीनें पोषाख बदललेले आहेत परंतु आत्मा तिन्ही कालखंडांत तोच आहे असे त्यांचें प्रतिपादन आहे उलट या तिन्ही कालखंडांत या चळवळीचें बाह्य स्वरूपच नव्हे तर तिचा गाभाहि दरवेळीं निराळा होता असे कांहीं समीक्षकांचे मत आहे. वरील दोन्ही पक्षांच्या म्हणण्यांत मूलभूत स्वरूपाचें मतभेद असल्यामुळें त्यांचा सखोल अभ्यास करणें अगत्याचें आहे. असा अभ्यास उद्‌बोधक ठरल्यावाचून कसा राहील ?

## पुराणकालीन प्रसंगांचा नवा अर्थ

(पुराणांतील परशुराम क्षत्रिय द्वंद्व म्हणजे या वादाचें दुसरें स्वरूप आहे असें श्री. ज्योतिबा फुले यांचें मत आहे. परशुरामानें क्षत्रियांचा संहार केला. अमानुष रक्तपात केला त्यांच्या स्त्रियावर पाशवी जुलूम केले ते केवळ क्षत्रिय द्वेषामुळेंच होय असे त्यांना वाटते. यासंबंधी ते आपल्या 'गुलामगिरी'-मध्यें म्हणतात, " परशुरामाचे क्रूरतेविषयीं इतके समजलें जातें कीं त्यानें पुष्कळ क्षत्रिय लोकांचे प्राण घेऊन त्यांचे अनाथ झालेल्या स्त्रियांपासून त्यांची लहान लहान चार चार पांच पांच महिन्यांचीं गरीब बिचारी निर्दोषी बालकें हिसकावून घेऊन अंतःकरणांत कांहीं द्रव न पावतां त्यांचे प्राण कीं हो मोठे दुष्ट रितीनें घेतले. तो दुष्ट इतकेच करून राहिला असे नाहीं तर त्यानें कित्येक आपले पतीच्या मृत्यूमुळें दीन झालेल्या स्त्रिया आपले पोटांत संभवलेल्या गर्भाच्या संरक्षणार्थ रानोमाळ मोठ्या क्लेशानें पळत असतां त्यांचे प्रसूतकाळीं त्यास पुत्र झाला असे ऐकिले मात्र कीं लागलीच त्यांचे प्राण घ्यावे.') (पा. १० गुलामगिरी)

म. ज्योतिबा फुले यांच्या प्रमाणें श्री. भास्करराव जाधव यांनी या चळवळीचा उगम पुराण कालांत शोधून काढलेला आहे. विंध्य पर्वत ओलांडून आर्यांचा दक्षिण भागांत झालेला प्रवेश हीच नान्दी ठरली. अगस्ति महर्षि विंध्याजवळ गेले तेव्हां त्यांच्या पायावर डोके ठेवण्यासाठीं विंध्यानें शिर वाकविले. 'याच स्थितींत मी परत येईपर्यंत रहा ' अशी आज्ञा महर्षींनीं पर्वताला केली. त्याच अवस्थेंत तो अद्यापहि पडून आहे अशी पुराणांत आख्यायिका आहे श्री. भास्करराव जाधव यांच्या मते हा प्रसंग म्हणजे ब्राह्मण ब्राह्मणेतर वादावर असलेलें एक बहारदार रूपकच होय. ब्राह्मणेतर समाजानें ब्राह्मणांच्या चरणीं नम्र होऊन पडावें अशी व्यवस्था त्यांतून व्यक्त केली आहे. याप्रमाणें पुराणांतील निरनिराळ्या कथा व प्रसंग निवडून ज्योतिराव फुले, भास्करराव जाधव किंवा या चळवळीचे इतर नेते यांनीं त्यांचा अर्थ वादाच्या दृष्टीनें लावला.

या सत्यशोधक पुढाऱ्यांप्रमाणेंच ज्ञानकोशकार डॉ. केतकर यांनीं देखील त्यासंबंधीं असेंच मत व्यक्त केलें आहे. प्राचीन काळी ब्राह्मण व

क्षत्रिय यांच्यामध्यें सत्तास्पर्धा चालू होती. ब्राह्मण्याचा कांहीं काळ विजय होई, परंतु क्षत्रिय देखील त्यांना कांहीं कांहीं प्रसंगीं मोठ्या शौर्यानें तोंड देत. गौतम बुद्ध म्हणजे ब्राह्मण वर्चस्वाला शरण न गेलेला एक प्रभावशाली क्षत्रियच होय. याबाबत डॉ.केतकर म्हणतात, "या दोन वर्गात स्पर्धा अनेक ठिकाणी दिसून येतें. गौतम बुद्धाच्या वेळेस गौतम जे वातावरण निर्माण करूं पहात होता, ते ब्राह्मणद्वेष्टे होतें यांत शंका नाहीं. तो क्षत्रिय, ब्राह्मण. वैश्य शूद्र अशी वर्णपरंपरा मांडीत असे. तो ब्राह्मणांना हीन कुळांतील असें उल्लेखी आणि त्यांच्या अंगी ब्राह्मणद्वेष इतका भरलेला दिसत होता कीं, त्यासाठीं त्यानें विद्याविकासावर देखील आघात केला ... ब्राह्मणांच्या विद्येपासून अलिप्त रहा असा तो उपदेश करी ( भारतीय समाजशास्त्र-१९३६ -पा. १५० )

त्यांच्या या अन्वयार्थांत सत्यांश असणें शक्य आहे. परंतु त्यांच्या या निष्कर्षाला इतिहासशास्त्र वा समाजशास्त्र यांची अनुमति मिळाली तर त्याला अधिक विश्वासार्ह स्वरूप प्राप्त होईल. अद्याप या मीमांसेला इतर शास्त्रांचा पुरेसा पुरावा मिळाला नाहीं म्हणून ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादाच्या प्राचीन कालीन स्वरूपाबद्दल निर्णायक मत देणें कितपत वाजवी होईल याबद्दल शंका वाटते.

## संतपरंपरेनें निर्मिलेली 'अध्यात्मिक समता'

पुराणकाळानंतर मध्ययुगामध्यें संतांच्या चळवळीच्या स्वरूपांत ब्राह्मण ब्राह्मणेतर वादाचा दुसरा आविष्कार झाला असे कांहीं कांहीं वेळां बोलले जाते. जनाबाई, चोखा, तुकाराम, एकनाथ इ. संतांनीं त्या काळांतील ब्राह्मणवर्चस्वावर हल्ले केले व अध्यात्मिक क्षेत्रांतील त्यांचें वर्चस्व कमी केलें हें खरें ! संस्कृतांतील ज्ञान प्राकृतांत आणून त्यांनीं ज्ञानाची दारें बहुजनसमाजाला खुलीं केलीं यांतहि शंका नाहीं. परमेश्वर आणि भक्त यांच्यामध्यें पूर्वीं ब्राह्मणांची अडगळ होती ती संतांनीं दूर सारली. ईश्वराच्या दरबारांतील ब्राह्मण ब्राह्मणेतर हा उच्चनीच भाव त्यांनीं प्रयासानें नाहीसा केला. थोडक्यांत संत चळवळीनें धार्मिक क्षेत्रांतील श्रेष्ठ कनिष्ठता नष्ट करण्याचा प्रयत्न केला व 'अध्यात्मिक समता'

स्थापन करण्याची कोशीस केली. ब्राह्मण आणि बहुजनसमाज यांच्यांतील धार्मिक विषमता कमी करण्याचें संतांचें कार्य नाकारून चालणार नाहीं.

## परंतु सामाजिक समतेचा उच्चारहि नाहीं

परंतु एवढ्याच वरून संत चळवळ ही ब्राह्मण ब्राह्मणेतर चळवळींतील ऐतिहासिक टप्पा आहे असे मानतां येईल कीं नाहीं याची शंका आहे. कारण संतांनीं अध्यात्मिक समतेचा पुरस्कार केला, परंतु त्याचबरोबर सामाजिक समतेबद्दल कोठेंहि उच्चार केला नाहीं. जातिव्यवस्थेप्रमाणें ब्राह्मण जन्मानें उच्च व इतर वर्णीय जन्मानें नीच ठरत. या जातिव्यवस्थेविरुद्ध त्यांनीं आपल्या लिखाणांतून शब्दानेंहि विरोध व्यक्त केला नाहीं. इतकेंच नव्हे तर ही व्यवस्था टिकून रहावी म्हणून त्यांनीं श्लोक किंवा अभंग लिहिले आहेत असेंच दाखवितां येईल. सामाजिक समतेचा विचार संतचळवळीमध्यें सांपडत नाहीं हें खरें, तर मग ज्योतिराव फुले यांच्या चळवळीचा प्रारंभ संत चळवळींत होता असें म्हणणें कितपत सयुक्तिक होईल? कारण सामाजिक समता म्हणजे मानव तेवढा समान–हीच ज्योतिरावांच्या सत्यशोधक चळवळीची मूळ प्रेरणा होती. यामुळें संत चळवळ ही ज्योतिरावांच्या चळवळीचें उगम स्थान मानतां येणार नाहीं. त्याचप्रमाणें पुराणकालीं या द्वंद्वाला प्रारंभ झाला असे पुराव्याचे अभावी गृहीत धरतां येणार नाहीं. (ज्योतिरावांच्या चळवळीची प्रेरणा पाहतां ती १९ व्या शतकाच्या उत्तरार्धांत इ. स. १८७२ मध्यें सुरू झाली असेच आपणास मान्य करावे लागेल.)

पुराण काळ व ब्राम्हण पूर्व संतांचा काळ यांमधील ब्राह्मण ब्राह्मणेतर चळवळीचा आढावा घेतल्यानंतर या पार्श्वभूमीवर ज्योतिरावांच्या सत्यशोधक चळवळीचें मूल्यमापन करणें सोपें जाणार आहे या चळवळीची सामाजिक फलश्रुति पाहण्यापूर्वीं आपणास आणखी एका मूलगामी प्रश्नाचा विचार केला पाहिजे.

पुराण काळ, मध्यकाळ किंवा अर्वाचीन काळ यामधील सत्यशोधक चळवळीचा उद्‌गम पाहतां तो मुख्यतः दक्षिणेंत म्हणजे विंध्य पर्वताच्या खालच्या बाजूस दिसतो. उत्तरेकडे या वादाचीं बीजें कोणत्याच काल-

खंडांत सांपडत नाहींत. दक्षिणेंतच या वादाचें मूळ रुजलें व या चळवळीला विलक्षण धार प्राप्त झाली याचीं मुख्यतः खालील कारणे सांगतां येतील.

# ब्राह्मण ब्राह्मणेतर वाद दक्षिणेंतच कां ?

## इस्लामी संस्कृतीचा परिणाम

उत्तरेकडे इस्लामी संस्कृतीचा परिणाम हिंदु समाजांतील जाती–व्यवस्थेंतील विषमता कमी होण्यांत झाला. कारण मोंगलांचें साम्राज्य तिकडे २–३ शतके होतें. इस्लामी संस्कृतींत इतर कांहीं दोष असले तरी त्यांच्यांतील अध्यात्मिक आणि सामाजिक समता आपणास नाकारतां येणार नाहीं. हिंदुस्थानांत आलेल्या मोंगल संस्कृतीमध्यें मूळच्या इस्लामी संस्कृतीचा उच्च ठेवा सर्वांशानें होता हें कोणीहि म्हणणार नाहीं उलट खरी इस्लामी संस्कृति तिच्या विशुद्ध स्वरूपांत इकडे आलीच नाहीं. इस्लामी संस्कृति मध्य आशियांतून इकडे येतांना तिच्यावर मोंगल, तुर्क, अफगाण यांचेहि संस्कार झाले होते. त्यामुळें इकडे आलेली इस्लाम संस्कृति ही कांहीं अंशीं भ्रष्ट झाली होती तरी देखील तिच्यांत सामाजिक समतेचा आशय शिल्लक होता हें नाकारून चालणार नाहीं.

यामुळें उत्तरेंत ब्राह्मण ब्राह्मणेतरांतील अंतर बरेंच कमी झालें. परंतु दक्षिणेंत मुस्लीम संस्कृतीचा परिणाम होण्याइतपत तिचा संबंध आला नाहीं. गोंवळकोंडा, अहमदनगर, विजापूर इ. ठिकाणीं मुस्लीम राज्यें होतीं परंतु त्यांचा प्रभाव हिंदु समाजावर पडूं शकला नाहीं. या दृष्टीनें उत्तरेकडे ब्राह्मण ब्राह्मणेतरांतील विषमता कमी करणारी मुस्लीम संस्कृति दक्षिणेंत मूळ धरूं शकली नाहीं हें येथील वादाचें पहिलें कारण सांगावें लागेल.

## पेशवाईच्या उत्तरार्धांतील ब्राह्मणशाहीचें वर्चस्व

दुसरे म्हणजे महाराष्ट्रांत पेशवाईच्या उत्तरार्धांत ब्राह्मणांचे इतर जमातीवरील जुलूम या वादाला पोषक ठरले असें दिसून येईल. पेशवाईच्या उत्तरार्धांत जातिभेदाच्या दोषास घृणास्पद स्वरूप आलें हे इतिहास संशोधक कै. न्या. रानडे यांनीं पेशव्यांच्या डायरीच्या प्रस्तावनेंत विस्तारानें

दाखवून दिलें आहे. ते Caste Ascendency मध्यें म्हणतात, "ब्राह्मणांचा पेशवाईत असे वाटूं लागलें कीं आतां आपणच खरेखुरे राजे आहोंत. ब्राह्मणांना स्वतंत्र सवलती भोगावयास मिळूं लागल्या. त्यांना अनेक बाबतींत इतरांना लागूं असलेल्या कायद्यांचीं बंधनें लागेनाशीं झालीं इतमामास भरपूर योग्य असा पगार मिळे. त्यांच्या आयात निर्यातीच्या बाबतींत जकात माफ होत असे. कल्याण प्रांतांतील व मावळांतील ब्राह्मणांच्या जमिनींवर इतर जातींच्या मानानें निम्मेपेक्षांहि कमी कर पेशवा सरकारनें ठेविला होता. फौजदारी न्यायालयांत ब्राह्मणांच्या बाबतींत कायदेशीर दंड व शिक्षा शक्य तितकी मऊ केली जात होती. किल्ल्यांतील बंदिखान्यांत इतरांपेक्षां ब्राह्मणांना उदार वागणूक मिळे. आणखी असें कीं सरकार दरबार ब्राह्मणांना फार मोठा दानधर्म सरकारी खजिन्यातून करीत असे. विद्या असो नसो ब्राह्मणाकरतां दक्षिणा आणि जेवण यांची भरपूर तरतूद सरकारनें केली. त्यामुळें पुणें शहर हे ब्राह्मण भिकारांचे मोठे जंगी केंद्रच बनलें. तीस ते चाळीस हजार ब्राह्मण ओळीनें कित्येक दिवस पक्वान्नाची भोजनें झोडीत रहात असत. या व अशा प्रकारच्या गोष्टीमुळें ब्राह्मणशाहीचे वर्चस्व अठराव्या शतकाच्या शेवटच्या विभागांत पराकाष्ठेस पोंचलें (The Miscellaneous Writings by Mr. Justice M G. Ranade p.351–352) ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादा ची ही सामाजिक पार्श्वभूमि लक्षांत घेतली म्हणजे या वादाला पुढें तीव्र स्वरूप कां आलें हें ध्यानांत येईल. परंतु महाराष्ट्रांत पेशवाईमुळें ब्राह्मण-ब्राह्मणेतरांतील विषमता वाढली असली तरी मद्रास आणि कर्नाटक इकडे या वादास धार येण्याची कारणें कोणतीं हें तपासणें जरूर आहे. तिकडे देखील पेशव्याप्रमाणें ब्राह्मण राजेच राज्य करीत होते काय ? नसल्यास इतर कारणें कोणतीं याचा अभ्यास होणें अगत्याचे आहे.

## ब्राह्मणेतर वर्ग राजे, सरदार

दक्षिणेंत या वादाला उग्र स्वरूप प्राप्त होण्याचें आणखी एक कारण असें कीं ब्राह्मणेतर वर्ग अनेक वर्षे इकडे राजे, सरदार, सेनापति इ. मानाच्या जागा भूषवीत होता. पेशवाईच्या काळांत कांहीं वर्षे त्यांच्या

हातांतील सत्ता कमी झालेली असली तरी पूर्वीचा इतिहास एकदम नष्ट होणें शक्य नव्हतें. ते राज्यकर्ते असल्यामुळें त्यांच्या स्वाभिमानाची ज्योत अनेक वर्षें पेटत राहिली होती. या पार्श्वभूमीवर ब्राह्मण-ब्राह्मणेतरांमधील सरकारी विषमता त्यांना अधिक बोचूं लागली व याचा परिस्फोट अखेर ब्राह्मण द्वेषांत होऊन या चळवळीला जोम प्राप्त झाला.

## महाराष्ट्रांतील विशिष्ट आर्थिक घडी

दक्षिणेतील आर्थिक घडी किंवा उत्पादन पद्धति देखील येथील वादाचा भडका उडण्यास सहाय्यभूत ठरली. महाराष्ट्रांत मध्यम वर्ग फार मोठ्या प्रमाणावर आहे. उत्तरेकडे जमीनदारी असल्यामुळें जमीनदार व कूळ यांच्यात आर्थिक, सामाजिक इ. स्थितींत महदंतर आहे. दक्षिणेत रयतवारी पद्धति प्रामुख्यानें आहे. त्यामुळें येथें अत्यंत गरिबी आणि अत्यंत श्रीमंती आढळत नाहीं. येथील मध्यम वर्ग त्यामुळें मोठा असून तो आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी आहे.

बंगाल, उत्तर प्रदेश इत्यादि ठिकाणीं प्रामुख्यानें जमीनदारी पद्धति असल्यामुळें जमीन मालक आणि कूळ यांच्यामध्यें आर्थिक दृष्ट्या महदंतर असते. त्या चौकटीमध्यें कुळाचें सर्व जीवन मालकावर अवलंबून असतें. अशा स्थितींत त्यानें जमीनदारांविरुद्ध चळवळ करणें म्हणजे जवळ जवळ आपल्या मृत्यूलाच आमंत्रण देण्यासारखें असतें. कुळाची चरितार्थाची सर्व साधनें आपल्या हाती असल्यानें जमीन मालक त्याची सर्वं दृष्टीनें कुचंबणा व गांजणूक केल्याशिवाय राहणार नांहीं तशी स्थिति महाराष्ट्रांत कधीच नव्हती. येथें ब्राह्मण मोठे जमीनदार असते व ब्राह्मणेतर त्यांची कुळें असती तर ही चळवळ मूळ धरू शकली असती कीं नाहीं शंका आहे. आर्थिक दृष्ट्या स्वतंत्र असलेला मराठा व तत्सम वर्ग हाच या चळवळीचा कणा बनला.

## मराठी राज्याच्या ऱ्हासाचा परिणाम

इंग्रजांचे राज्य येथें सुरू झाल्यावर प्रथम नोकरीत कोणता वर्ग गेला असेल तर तो ब्राह्मण वर्ग. ज्ञानार्जनाची अखंड आणि फार मोठी

परंपरा या वर्गाला लाभल्यामुळें त्यांनीं झटकन् संस्कृतकडून इंग्रजीकडे आपला मोहरा वळविला.

ब्राह्मणांनीं अव्वल इंग्रजींत भराभर आंग्लविद्या आत्मसात् करून सरकारी यंत्रणेंतील मोठमोठ्या हुद्याच्या जागा पटकावल्या. याला त्यांच्या ज्ञातींच्या परंपरेप्रमाणें दुसरे एक महत्त्वाचें कारण सांगतां येईल. येथील मराठा व तत्सम वर्ग हा मुख्यत्वें खेड्यापाड्यांतून राहणारा. हाडानें ते शेतकरी होते. खऱ्या अर्थानें धरतीचीं लेकरें होते. मराठी राज्याच्या काळांत या वर्गानें आपल्या हातांतील नांगराचा फाळ टाकून हातांत तलवारी घेतल्या. शेतीचा व्यवसाय टाकून ते सैनिक बनले. परंतु ते सैन्यांत घुसलेले असले तरी त्यांच्या चरितार्थाचे साधन नेहमीं त्यांच्या शेतांत तयार असे. इ. स. १८१८ सालीं मराठी साम्राज्य अस्तंगत झालें. पेशव्यांच्या हाताखालील शेंकडो सैनिक, अधिकारी बेकार झाले. मराठा व तत्सम वर्गानें ताबडतोब आपल्या खेड्याकडे धांव घेतली व शेतीचा आश्रय केला. परंतु येथील ब्राह्मण वर्ग विशेषतः कोंकणांतून आलेला वर्ग हा आर्थिक दृष्ट्या अगदी निराधार झाला. त्याला जगण्यासाठीं कांहीं तरी साधन पाहिजे होते. ते त्याला इंग्रजी राज्ययंत्रणेंत मिळणें शक्य होतें. त्यासाठीं त्यानें तात्काळ इंग्रजी भाषा अवगत केली व भराभर सरकारी नोकऱ्या मिळविल्या.

## नागर संस्कृतीमुळें चालना

ब्राह्मण व मराठा यांच्यातील हा फरक फार मूलगामी स्वरूपाचा आहे. अव्वल इंग्रजींत ब्राह्मणांचा सरकारी यंत्रणेंत मोठ्या प्रमाणांत समावेश होण्यास हें कारण जबाबदार झाले. त्याचप्रमाणें बहुसंख्य ब्राह्मण हे पुष्कळ काळ शहरांतूनच राहात होते. नागर संस्कृति ( urban culture ) ही ग्रामीण संस्कृतीपेक्षां (rural culture) नेहमीच चार पावले पुढें असते. प्रगत नागर संस्कृतीच्या सतत सान्निध्यांत असणाऱ्या ब्राह्मण वर्गाला इंग्रजी भाषेचें व राज्याचे दूरगामी परिणाम लवकर कळूं शकले. ग्रामराज्यांत वाढणाऱ्या आणि राहणाऱ्या ब्राह्मणेतर वर्गाला हे महत्त्व कळण्यास वेळ लागणे स्वाभाविक होते. परंतु यामुळेंच

नेहमीं ब्राह्मणेतर लोक अधिक असंतुष्ट होऊं लागले. समाजांत ५ टक्के असणाऱ्या ब्राह्मणवर्गाला राज्ययंत्रांत मात्र ९५ टक्के जागा हा विरोध ब्राह्मणेतरांना तीव्रतेनें जाणवूं लागला. ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादाला पुढें धार येण्यास ही घटनादेखील मोठ्या प्रमाणांत कारणीभूत झाली.

अनुक्र. विभाग नों.

## नोकरींत शिरलेल्या ब्राह्मण वर्गाचे जुलूम

तसेंच ब्राह्मण अधिकाऱ्यांनीं हातीं आलेल्या सत्तेचा वाईट उपयोग करण्यास सुरवात केली. वास्तविक सत्ता हातीं आली म्हणजे तिच्या नशेनें हातून कांहीं दुष्कृत्ये घडणें हा पुष्कळ प्रमाणांत मानवी स्वभाव आहे. लॉर्ड अॅक्टननें म्हटल्याप्रमाणें, " सत्ता माणसास अधःपतित बनविते आणि अनियंत्रित किंवा निरंकुश सत्ता माणसाला सर्वस्वी अधःपतित करीत असते." ही प्रवृत्ति जशी ब्राह्मणांत तशीच ब्राह्मणतरांतहि आढळणें स्वाभाविक आहे. परंतु १९ व्या शतकाच्या उत्तरार्धांत ब्राह्मण अधिकाऱ्यांनीं तिचा फारच दुरुपयोग केला असावा असें दिसतें. या बाबत ज्योतिराव फुले म्हणतात, " आजपर्यंत जे भट मामलेदार झाले त्यापैकीं कित्येक आपले काम करीत असतां इतके कुनीतीनें वागत व गरीब गुरीब लोकांवर जुलूम करीत कीं, त्याचा एक ग्रंथ होईल--अरे, या पुण्यासारख्या शहरांत भट मामलेदार, कुलकर्ण्यापासून आणलेली लायकी दाखविल्याशिवाय मोठमोठ्या सावकारांची देखील हमी कबूल करीत नाहींत, मग तेथें गरीब गुरीबांची दाद कोठून लागणार ?

यावरून तूंच विचार करून पहा कीं, अशा युरोपियन लोकांच्या वस्तीशेजारच्या पुणें शहरांत भट मामलेदार जर अशी झोटिंग बादशाही करून आपल्या जातीच्या कलम कसायांची पोळी पिकवितात, तर खेड्यापाड्यांत त्यांचा काय जुलूम असेल बरे " ( गुलामगिरी पा. ७५–७६ )

या विविध कारणांमुळें ज्योतिरावांची सत्यशोधक चळवळ महाराष्ट्रांत सुरू झाली. इ. स. १८७३ मध्यें या चळवळीचा उद्गम होऊन नंतर तिचा विकास सुरू झाला.

## सत्यशोधक समाजाचीं विशिष्ट उद्दिष्टें

ज्योतिरावांनीं आपल्या मित्रपरिवाराच्या साहाय्यानें २४ सप्टेंबर १८७३ सालीं आपला सत्यशोधक समाज स्थापन केला. त्यांच्या त्रैवार्षिक प्रतिवृत्तांतील खालील उताऱ्यावरून त्याचा उद्देश व धोरण स्पष्ट होतें.

“ब्राह्मण, भट, जोशी, उपाध्ये इत्यादिक लोकांच्या दास्यत्वापासून शूद्र लोकांना मुक्त करण्याकरतां व आपल्या मतलबी ग्रंथांच्या आधारे आज हजारो वर्षें ते शूद्र लोकास नीच मानून गफलतीनें लुटीत आलें आहेत. यास्तव सदुपदेश व विद्याद्वारें त्यांस त्यांचे वास्तविक अधिकार समजून देण्याकरतां म्हणजे धर्म व व्यवहारासंबंधीं ब्राह्मणांचे बनावट व कार्यसाधक ग्रंथापासून त्यास मुक्त करण्याकरितां कांहीं सूज्ञ, शुद्र मंडळीनीं हा समाज ता. २४ सप्टेंबर सन १८७३ इसवी रोजीं स्थापन केला. या समाजांत राजकीय विषयावर बोलणें अजीबात वर्ज्य आहे.” (निबंधमाला चित्रशाळा प्रत पृ. ४६६–६७.)

## १९२० पूर्वीं मुख्यतः सामाजिक कार्यक्षेत्र

या चळवळीचें स्वरूप इ. स. १८७३ पासून १९२० पर्यंत मुख्यतः सामाजिक होतें. इ. स. १९१९ सालीं मॉंटेग्यू–चेम्सफर्ड सुधारणानुसार प्रांतांत द्विदल राज्यपद्धति सुरू होणार असें दिसतांच ज्योतिबांच्या मृत्यूनंतर मंदावलेल्या या चळवळीला पुन्हां गति प्राप्त झाली. प्रांतांत लोक प्रतिनिधीकडे सत्ता सोपविली जाणार व ब्राह्मणेतर जर स्वस्थ बसलें तर पुन्हां ब्राह्मणांच्या हातीं राज्याचें अधिकार जाणार या मानसिक भयानें या चळवळीला १९२० च्या पुढें प्रामुख्यानें राजकीय स्वरूप आले. तथापि या समाजाच्या प्रारंभीच्या काळांत राजकारणाचें पथ्य पाळून या चळवळीच्या नेत्यांनीं सामाजिक प्रश्नावरच आपली शक्ति आणि लक्ष केंद्रित केलें होतें. समाज स्थापन झाल्याबरोबर थोडयाच दिवसांत त्याला ३०० च्यावर सभासद मिळालें. त्यावेळीं मुख्यतः कृष्णराव भालेकर, धोंडीराम कुंभार, राजाराम गोविंदराव फुले, विश्राम रामजी घोले, विनायक बापूजी भांडारकर, रामशेठ बापूशेठ उरवणे इ. या चळवळीचें नेते होतें. इ. स. १८८५ सालीं पुणें येथें या समाजाच्या झेंडयाची मोठ्या थाटानें मिरवणूक

निघाली होती. त्यावेळीं या समारंभांत स्वतः न्यायमूर्ति रानडेहि उपस्थित होते. इ. स. १८९० मध्यें सामाजिक समतेचा हा एक महान् प्रवक्ता कालवश झाला. परंतु इ. स. १८७३ ते १८९० या १७ वर्षांच्या अवधींतच या चळवळीला चांगलें बाळसेदार स्वरूप प्राप्त झाले. वर्णवर्चस्वाच्या अन्यायाखालीं पिचून गेलेल्या बहुजन समाजामध्यें तर ज्योतिबानीं असंतोषाची ज्वाला पेटविली इतकेच नव्हे तर तिला विधायक तत्त्वज्ञानाचें अधिष्ठानहि दिलें. त्यांच्या या सामाजिक तत्त्वज्ञानाचा प्रसार करण्यासाठीं श्री. कृष्णराव भालेकर यांनीं इ. स. १८७७ मध्यें दीनबंधू नांवाचें साप्ताहिक काढले. सत्यशोधक चळवळीच्या इतिहासांत या साप्ताहिकाला अनन्य साधारण महत्त्व आहे. कारण या समाजाच्या विचारांचा उद्घोष करणारें तें महाराष्ट्रांतील पहिलेंच वृत्तपत्र होय. लोकहितवादी, विष्णुशास्त्री चिपळूणकर आगरकर यांनीं स्वतःचीं वृत्तपत्रें चालविलीं होतीं त्याचप्रमाणें या समाजाचे अव्यक्त विचार बोलून दाखविणारें हें वृत्तपत्र सुरू करण्यांत आलें.)

(परंतु हे वृत्तपत्र फार काळ टिकूं शकले नाही. ज्योतिबांनीं आपल्या विचारांचा प्रसार व्हावा म्हणून दुसरें वृत्तपत्र काढण्याचें ठरविले. त्याप्रमाणें निश्चय करुन इ. स. १८८५ मध्येंच्या जूनमध्यें त्यांनीं 'सत्सार'चा पहिला अंक प्रसिद्ध केला.) त्यांत ते म्हणतात, या आमच्या अल्पशा प्रयत्नास आमचे निःपक्षपाती विचारशील महंमदी, ख्रिस्ती व हिंदू बांधवांनीं उदार आश्रय दिल्यास त्यापुढचे अंक दर आठवडयास सुद्धां सादर केले जातील." (परंतु नंतर महिन्यानें दुसरा अंक निघून 'सत्सार' अकाली नष्ट झालें. वास्तविक ज्योतिरावांच्या या नियतकालिकाला त्यावेळीं लोकांकडून चांगला पाठिंबा मिळाला होता. पहिल्याच अंकाच्या १०५० प्रति खपल्या होत्या.) तरीहि हें वृत्तपत्र फार काळ कां टिकूं शकलें नाहीं हें एक कोडें आहे.

### दक्षिणेंतील ब्राह्मणेतर चळवळीचे चार कालखंड

ब्राह्मणेतर चळवळ इ. स. १८७३ मध्येंच सुरू झाली व ती फक्त दक्षिणेंतच रुजली हे पाहिल्यानंतर या चळवळीचा विकास कोणत्या क्रमानें झाला हें पाहणें अगत्याचें आहे. साधारणपणें या चळवळीच्या इतिहासाचें चार टप्पे कल्पितां येतील.

(१) इ. स. १८७३ ते १९२० (२) इ. स. १९२० ते १९३० (३) १९३० ते १९४७ व (४) १९४७ ते १९५३.

## इ. स. १८७३ ते १९२०

सत्यशोधक चळवळीच्या या प्रारंभीच्या काळांत ज्योतिराव फुल्यांनीं तिचा वैचारिक पिंड तयार केला. ब्राह्मण, मराठा, माळी, महार, मांग, धेड इ. सर्व माणसे समान आहेत. जातीयतेची उतरंड पाडली पाहिजे. तरच समाज प्रगत होऊं शकेल, हें त्यांच्या शिकवणुकीचें सार होतें. यासाठीं त्यांनीं मुख्यतः ब्राह्मण्यावर जास्त हल्ला केला.

## सत्यशोधक चळवळीचें तत्त्वज्ञान व कार्यक्रम

सत्यशोधक चळवळ ही कांहीं शाश्वत मूल्यांवर आधारली होती. मानवतावाद, बुद्धि प्रामाण्यवाद आणि व्यक्तिस्वातंत्र्य या थोर मानवी मूल्यांची जोपासना या चळवळीनें केली. मानव तेवढा एक त्याच्यांतील जातिभेद, धर्मभेद, राष्ट्रभेद किंवा खंड भेद हे खोटे आहे. यावर ज्योतिरावांचा अभंग विश्वास होता. मनुष्याच्या जन्मानें त्याचें श्रेष्ठत्व किंवा नीचत्त्व ठरत नाहीं. कारण जन्मतः सर्व माणसें सारखींच असतात. लिंगभेदावर आधारलेली माणसामधील विषमता देखील अन्याय्य आहे. स्त्री आणि पुरुष हे समान पातळीवर आहेत. पुरुष आणि स्त्री यांच्यामध्यें भेद करणें हें महान असत्य आहे. याबाबत ते आपल्या 'सार्वजनिक सत्यधर्म''मध्यें म्हणतात, " आपल्या सर्वांच्या निर्माण कार्यानें एकंदर सर्व स्त्रियांस अगर पुरुषांस एकंदर सर्व मानवी हक्कासंबंधीं आपले पाहिजेत तसे विचार, आपली पाहिजेत तशी मतें बोलून दाखविण्यास, लिहिण्यास आणि प्रसिद्ध करण्यास स्वतंत्रता दिली आहे — स्त्री अथवा पुरुष जे एकंदर सर्व गांवच्या, प्रांताच्या, देशाच्या व खंडाच्या संबंधानें अथवा कोणत्याहि धर्मातील मताच्या संबंधानें कोणत्याच प्रकारची आवडनिवड न करतां या सर्व स्त्री पुरुषांनीं या भूगोलावर आपलें एक कुटुंब समजून, एकमतानें, एकजुटीनें, एकमेकाशीं सत्यवर्तन करून वागावे. इतकेंच काय, एकांच घरांत बौध्दधर्मी बायको, ख्रिस्त धर्मी नवरा, इस्लामधर्मी कन्या व सावजनिक सत्यधर्मी पुत्र यांना प्रेमानें नांदायला लावील तोच खरा धर्म " ( पा. नं. ११२ व १२८ )

(ज्योतिरावांच्या वरील विचारामधून त्यांची मानवी समतेची किंवा मानवता वादाची व्यापक भूमिका प्रतीत होते.)

(त्याचप्रमाणें हिंदुधर्मामधील श्रुति, स्मृति, वेद पुराण यामधील अनेक सिद्धान्तांना आणि मतांना त्यांनीं आव्हान दिलें आहे. शेंकडो वर्षें या देशामध्यें अप्रतिहतपणें वावरत असलेल्या शब्द प्रामाण्याला त्यांनीं त्वेषानें फेकून दिलें आहे. धर्मामधील सत्य तपासतांना देखील मानवी बुद्धीचा निकष आपण लावला पाहिजे. हें त्यांनीं घोषित केलें आहें; वेदामधील शब्दांपेक्षां विचाराचें प्रामाण्य त्यांना अधिक मोलाचें वाटतें. या त्यांच्या विचार प्रामाण्यामुळें तें हिंदु धर्मामधील अनेक सनातन कल्पनावर कठोर टीका करूं शकलें.

(मानवतावाद आणि विचार प्रामाण्यवाद याचप्रमाणें व्यक्ति प्रामाण्यवाद देखील ज्योतिरावांच्या लिखाणामध्यें प्रतिबिंबित झाला आहे. जातिव्यवस्थेखालीं दडपला गेलेला माणूस आपला आत्मोन्नति करून घेऊं शकत नाहीं. आणि आत्मविकासाच्या आड येणारीं सर्व बंधनें आपण दूर लोटलीं पाहिजेत हें त्यांच्या विचाराचें सार आहे.) अमेरिकेमधील गुलामगिरीमध्यें नरकवास भोगत असणाऱ्या नीग्रोंना दास्यमुक्त करणाऱ्या स्वातंत्र्यवीरांना ज्योतिरावांनीं आपलें 'गुलामगिरी' पुस्तक मोठ्या भक्तिभावानें अर्पण केलें आहे. यांमधून त्यांच्या निर्भेळ मानवतावादाचें आणि व्यक्ति स्वातंत्र्यवादाचें सम्यक्‌दर्शन झाल्यावांचून रहात नाहीं. ज्योतिरावांच्या विचाराचा आशय हा व्यापक मानवतावादी आणि स्वातंत्र्यवादी होता.

या थोर मूल्यांची अभिव्यक्ति मात्र अत्यंत ओबड धोबड! क्वचित प्रसंगी ब्राह्मण विद्वेषी आणि प्रक्षोभक झाली आहे. तथापि अभिव्यक्तिपेक्षा आशयाला अधिक प्राधान्य दिलें पाहिजे. या दृष्टीनें त्यांच्या विचारांत अनेक चिरंतन मूल्यांची उपासना आढळल्यावांचून राहणार नाहीं.

(आपलें वरील तत्त्वज्ञान प्रत्यक्षांत आणण्यासाठीं त्यांनीं पुढील कार्यक्रम सुचविला होता.

( १ ) जातिव्यवस्थेमुळें निर्माण झालेली सामाजिक विषमता नष्ट करणें.

( २ ) देव व भक्त यांच्यामध्यें ' दलालाची ' भूमिका वठविणारी भटशाही नष्ट करणें.

( ३ ) ब्राह्मणेतर समाजांत शिक्षणाचा फैलाव करणें.

( ४ ) इंग्रजाशीं सलोखा ठेवून सरकारी यंत्रणेंत जास्तीत जास्त जागा मिळविणें.

सत्यशोधक चळवळीचें तत्त्वज्ञान व कार्यक्रम अंशतः त्यांच्या शपथ-विधींत व्यक्त झालेला आहे. हा शपथविधी असा—

" सर्व माणसें हीं एक परमेश्वराचीं लेकरें आहेत. हे सर्व माझे बंधु आहेत. आणि या तत्त्वानुसार मी सदैव आचरण करीन. परमेश्वराचें ध्यान, भजन किंवा पूजन करतांना मी कोणताहि मध्यस्थ मानावयास तयार नाहीं. त्याचप्रमाणें धार्मिक विधि उरकतांना हा मध्यस्थ दूर सारण्यासाठींच मी इतरांना प्रवृत्त करीन. मी ब्रिटिश सरकारशीं सदैव इमानी राहीन. माझ्या मुलामुलींच्या शिक्षणाची मी कधींहि आबाळ होऊं देणार नाहीं. सर्व साक्षी आणि सर्व गुणसंपन्न परमेश्वराला साक्ष ठेवून मी ही प्रतिज्ञा घेत आहे. ही पवित्र शपथ पाळून माझ्या जीविताचा सदुपयोग करण्यास मला ईश्वर सहाय्य करो. "

म. फुले यांचा जीवनविषयक दृष्टीकोण त्यांच्या सत्यशोधकी प्रतिज्ञे-प्रमाणें 'अखंड' या प्रार्थनेमध्यें चांगला प्रतिबिंबित झाला आहे. या प्रार्थने-मधील साध्या शद्बामागें फार व्यापक अर्थ पडला आहे असे मला वाटते. म. ज्योतिबा प्रार्थनेंत म्हणतात—

प्राणीमात्रा नेत्रे निर्मीकानें दिली । पाहूं ती लागलीं एकमेकां ।।ध्रु।।१।।
ज्ञान सर्वा दिले सत्य शोधण्याला । मार्गी लागण्याला । अज्ञान्यास ।।२।।
निर्मिकाचा धर्म सत्य आहे एक । भांडणे अनेक । कशासाठीं ।।३।।
मानवांनो तुम्हीं ईशा नित्य भ्यावे । सर्व सुखी व्हावे । ज्योती म्हणे ।।४।।
सर्वांचा निर्मीक आहे एक धनी । त्याचे भय मनी । धरा सर्व ।।ध्रु १।।
न्यायानें वस्तूंचा उपभोग घ्यावा । आनंद करावा ।। भांडूं नये ।।२।।
धर्म राज्य भेद मानवा नमावे । सत्यानें वर्तावे । ईशासाठीं ।।३।।
सर्व सुखी व्हावे भिक्षा मी मागतो । मनुजा सांगतो । जोती म्हणे ।।४।।

## सामाजिक स्वरूप इ. स. १८९० ते १९२०

(इ. स. १८८९च्या नोव्हेंबरांत महात्मा जोतिराव फुले दिवंगत झाले आणि त्यानंतर इ. स. १९१२ पर्यंत या चळवळीला खंबीर आणि प्रभावी नेतृत्त्व लाभलेच नाहीं. महात्मा फुल्यांच्या नंतर डॉ. घोले यांनीं कांहीं काळ चळवळीला मार्गदर्शन केले. परंतु तें फारसें परिणामकारक ठरलें नाहीं. या काळांत चळवळ प्रगत होण्याऐवजीं जवळजवळ स्थिरच राहिली. लग्नविधी-मधील पुरोहिताची अडगळ दूर व्हावी म्हणून मात्र चळवळींच्या पुरस्कर्त्यांनीं पुष्कळ प्रयत्न केले. किंबहुना ब्रह्मवृंदाला न विचारतां विवाहविधि उरकणें व जोशी वृत्तीला हादरे देणें हेंच या काल खंडांतील चळवळीचें मुख्य कार्य होतें.) वास्तविक ज्योतिराव फुले यांनींच आपल्या ह्यातींत या लग्न विधीस सुरवात केली होती. अशा तऱ्हेचा पहिला विवाह २५ डिसेंबर १८७३ रोजीं पुण्यासच झाला. दुसरें लग्न ७ मे १८७४ ला पार पडलें. या वेळीं पुरोहित वर्ग प्रक्षुब्ध झाल्यामुळें पोलीस–बंदोबस्तांत हा मंगल विधि उरकावा लागला.

यानंतर १४ जून १८८७ ला तळेगांव येथें समाज नेत्याकडून न्हावी जातीतील लग्न विधि उरकण्यांत आला. ज्योतिबा अशा लग्नाच्या वेळीं बहुधा जातीनें हजर असत. त्यांच्या काळांत ब्रह्मवृंदानें या लग्न विधि उरक-णाऱ्या मंडळींवर सामाजिक बहिष्काराचें शस्त्र उपसलें होतें. परंतु पुढें हें प्रकरण कोर्टांत जाऊन जोशांच्या शिवाय लग्न करणें कायदेशीर आहे हें ठरलें होतें. महात्मा ज्योतिरावांनंतर ही चळवळ दूरवर पसरत गेली. या चळवळीला धार प्राप्त होऊं लागली त्याच बरोबर कांहीं मंडळींनीं हें प्रक-रण कोर्टांत नेलें. जोशीवर्गाचें सामाजिक वर्चस्व यामुळें कमी होत होतेंच परंतु त्याहि पेक्षां दक्षिणेच्या स्वरूपांत मिळणारी अर्थप्राप्तीहि कमी होत होती. ज्योतिबांचे नंतर हें प्रकरण पुन्हां खालच्या कोर्टांत गेलें. न्यायमूर्ति रानडे हे तेव्हां खालच्या कोर्टांत होते. त्यांच्याच समोर अशीं कांहीं प्रकरणें गेलीं. त्यांनीं 'पुरोहित वर्गाशिवाय लग्न लावणें अयोग्य होय' असा निर्णय दिला. दावा मुंबईच्या कोर्टांत चालला. तेथें हिंदी विषमतेची फारशी जाणीव नसणारे व पाश्चात्य वातावरणांत वाढलेलें इंग्रज न्यायाधीश होते त्यांनीं 'ब्रह्मवृंदाशिवाय लावलेलीं लग्नें धर्मबाह्य ठरत नाहीत' असा निकाल

दिला. मात्र ब्राह्मणांच्या न्याय्य हक्कावर आक्रमण झालें तर त्यांना नुकसान भरपाई द्यावी असाहि निर्णय घोषित केला.

## वेदोक्त प्रकरणामुळें ब्राह्मण वर्चस्वाला शह

ही चळवळ चालू असतांना इ. स. १९०२–०३ च्या सुमारास कोल्हापुरास वेदोक्त पुराणोक्त प्रकरण उद्‌भवलें व चळवळीची कक्षा पुण्याहून कोल्हापूरापर्यंत विस्तारली. कोल्हापूरचे महाराज हे क्षत्रिय नव्हते. असे त्यावेळच्या ब्रह्मवृंदांचें मत होतें. त्यांना ज्या घराण्यांतून दत्तक म्हणून कोल्हापुरच्या गादीवर घेतलें होतें तें घराणें शहाण्णव कुळी क्षत्रिय घराणें नव्हते म्हणून त्यांना क्षत्रियत्वावर हक्क सांगतां येणार नाहीं असें करवीरी पुरोहितांच्या म्हणण्याचें सार होतें. त्यामुळें त्यांना स्नानाचाच नव्हे तर कोणताहि विधि वेदोक्त पद्धतीनें करतां येणार नाहीं असे मत त्यांच्या धर्मपीठाच्या गुरूंनीं दिले. येथेंच महाराजांच्या स्वाभिमानाला सामाजिक विषमतेचा प्रथम कडकडून दंश झाला. संकेश्वर पीठाचे आचार्य ब्रह्मनाळकर गुरूस्वामी यांच्या या उत्तराची प्रतिक्रिया म्हणून महाराजांनीं आपले अनुयायी पुणें, बडोदे इ. ठिकाणीं पाठवून कांहीं शास्त्रांचें आधार गोळा केले. ब्रह्मनाळकर घराण्यांतील शिष्यस्वामीस अनुकूल करून घेतले व त्यांना दत्तक घेऊन कोल्हापूरला स्वतंत्र धर्मपीठ स्थापन केले. संकेश्वर धर्मगुरूशीं असलेला सर्व संबंध तोडून टाकला. इ. स. १९०४ मध्येंच महाराजांना लोकांचीं पत्रें जाऊन ब्राह्मण आचार्यांच्या ऐवजीं ब्राह्मणेतर गुरूची धर्मपीठावर स्थापना करा असा सत्यशोधकांचा आग्रह सुरूं झाला. त्याच काळांत करवीर पीठाचे ब्रह्मनाळकर शिष्यस्वामी समाधिस्थ होऊन त्या जागी कुर्तकोटीची नेमणूक झाली. परंतु त्यांच्यावरहि सत्य समाजिस्टांनी अनेक आरोप ठेवले. शाहू महाराजांचे व त्यांचेहि संबंध बिघडत चालले. पीठाची रक्कम मुख्यत: ब्राह्मण संस्थांच्याच कामी लावली जाते व बहुजन समाजांच्या संस्था कटाक्षानें उपेक्षिल्या जातात असें त्यांच्या विरुद्ध लोकमत तयार झालें. पुढें लवकरच महाराजांनीं हें धर्मपीठ नष्ट करून त्या जागीं क्षत्रिय धर्मगुरु नेमले व नव्या आचार्यांमार्फत सर्व वेदोक्त विधि करण्यांत येऊं लागले. (ब्राह्मणांच्या सामाजिक वर्चस्वाला सत्यशोधक

चळवळीनें छत्रपति शाहू महाराजांच्या मदतीनें या काळांत हा मोठा शह दिला.

इ. स. १९११ च्या जानेवारीमध्यें सत्यशोधक समाजाची कोल्हापुरांत स्थापना व्हावी म्हणून चर्चा सुरूं झाली आणि इ. स. १९१२ साली मा २१ ऑगस्टला या पक्षाची करवीर नगरीत अधिकृतरीत्या प्रस्थापना झाली आणि त्यानंतर ब्राह्मण उपाध्यायाशिवाय लग्न विधी उरकण्याच्या चळवळीला जास्त जोर आला. इ. स. १९१३ सालीं नुसत्या कोल्हापुरांत त्यावेळीं १५१३ विधि वेदोक्त पद्धतीनें ब्राह्मण उपाध्यायावाचून घडलें.

## वेगळ्या धर्मपीठानें सामाजिक समतेचें तत्त्व विसरलें

ज्योतिरावांच्या मृत्यूनंतर या चळवळीचें केंद्र पुण्याहून कोल्हापुरास गेले व तेथें राजाश्रयानें ही चळवळ जोमानें फोफावूं लागली. परंतु येथूनच तिच्या मूळच्या विशाल प्रेरणेस मर्यादा पडत चालल्या. कोल्हापूरच्या महाराजांनीं ब्राह्मण धर्म गुरु नष्ट करून क्षत्रिय आचार्यांची धर्मपीठावर स्थापना केली. परंतु यांत ज्योतिरावांची मूळची वैचारिक बैठक सुटूं लागली होती. जिवा शिवाच्या ऐक्यामध्यें कोणतीहि अडगळ नको किंवा परमेश्वर आणि भक्त यांच्यामध्यें कोणताहि 'दलाल' नको ही ज्योतिरावांची विचारधारा या नेत्यांना पचली नव्हती. ब्राम्हण जाऊन क्षत्रिय आला तरी त्यामुळें सामाजिक समतेचें महान स्वरूप कसें प्रत्यक्षांत उतरणार? ब्राम्हण, धर्मगुरु ऐवजी आतां क्षत्रिय धर्मगुरु नव्या जोमानें इतर लोकांची सामाजिक आणि धार्मिक समता धोक्यांत आणणारच कदाचित धर्मपीठ एकदम नष्ट करून पुरोहिता वाचून सर्व विधि उरकण्याचा विचार लोकांना पचला नसता. शेकडो वर्षांच्या समाजाच्या संवयी चुटकीसरशी नाहींशा होत नसतात. अशा व्यावहारिक दृष्टीनें महाराजांनीं कदाचित् मधली अवस्था म्हणून ब्राम्हण धर्मपीठ काढून क्षत्रिय धर्मपीठ स्थापन केलें असावे. परंतु कारण कांहीहि असलें तरी या धर्मपीठाच्या स्थापनेमध्यें ज्योतीरावांचें विचारपीठ दुर्लक्षिलें गेलें यांत शंकाच नाहीं.

कोल्हापूरास ही शाखा स्थापन झाल्यानंतर वरचेवर त्यांच्या परिषदा भरूं लागल्या, इ. स. १९१७ सालीं नाताळांत खामगांव येथें शाहू महारा-

जांच्या अध्यक्षतेखालीं मराठा शिक्षण परिषद भरली होती. माँटचेग्चूच्या १९१७ च्या जाहिरनाम्यानंतरचें महाराजांचें हें पहिलेंच अध्यक्षीय भाषण होतें. त्यामुळें त्याला विशेष महत्त्व आहे. त्यांत महाराज म्हणाले होते, कीं " स्वराज्याचें रूपांतर विशिष्ट सत्तेंत होऊं नये म्हणून सर्व जातींना दहा वर्षें तरी प्रतिनिधि पाठवितां आले पाहिजेत. त्या योगानें आमचे हक्क आम्हांस समजूं लागतील आणि एकदां तसें झालें म्हणजे जातवार प्रतिनिधींची जरुरी राहणार नाही. " ( श्री. शाहू महाराज चरित्र — ले. लठ्ठे पा. नं. ४२० )

इ. स. १९२० सालीं नाशिकला महाराजांच्या अध्यक्षतेखालीं मराठा शिक्षण परिषद भरली होती. तेथें देखील त्यांनीं हाच विचार पुन्हां आग्रहानें मांडला. त्यांत ते म्हणाले होतें कीं, " ज्यांनीं आज पिढ्यान् पिढ्या इतरांस गुलामगिरींत ठेवलें आहे व ज्यांची तसेंच वागण्याची इच्छा उघड उघड दिसत आहे. त्यांच्या हातीं सर्व सत्ता जाऊं नये याविषयीं खबरदारी घेण्याची आवश्यकता आहे. " ( शाहू महाराजांच्या आठवणी–लेखक–माधवराव बागल पा. ४ )

## काँग्रेस शूद्रादिशूद्रांची संस्था नव्हे

या काळांतील या चळवळीचें राजकीय स्वरूप मुख्यतः तीन प्रकारें सांगतां येईल. (१) महाराष्ट्रापुरती तरी काँग्रेस ब्राह्मणांची संस्था असें मानून तिच्यापासून अलिप्तता, (२) दहशतवादी चळवळ ही पेशवाईच्या पुनरुज्जीवनाची चळवळ अशा कल्पनेनें तिच्यापासून अलिप्तता (३) इतकेच नव्हे तर प्रसंग विशेषी ही चळवळ दडपून टाकण्यासाठीं सक्रिय सहानुभूति. इ. स. १८८५ मध्यें काँग्रेस स्थापन झाली त्यावेळीं वास्तविक तिच्यामध्यें कोणत्याहि प्रकारचा जातीय हेतु नव्हता. परंतु त्या काळांत ब्राह्मण वर्ग शिक्षणामध्यें प्रगत झालेला असल्यामुळें त्याला या राजकीय आंदोलनाची कल्पना लवकर येऊं शकली व तो वर्ग बहुसंख्येनें या संस्थेंत शिरला. शिवाय त्या काळांत काँग्रेसचें स्वरूप देखील अत्यंत सनदशीर व सौम्य होतें. तिच्यांत दीन दलितांबद्दलचा कोणताच कार्यक्रम प्रामुख्यानें घेतला नव्हता. ब्राह्मणांचें वर्चस्व व शूद्रादिशूद्रांच्या प्रश्नांची उपेक्षा

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. ८५८६



यामुळें ज्योतिराव कॉंग्रेसवर त्यावेळीं नाराज असत. ते आपल्या सार्वजनिक सत्यधर्ममध्यें म्हणतात, " धूर्त आर्यभट ब्राह्मणांच्या मुलांनी ज्या सभा उपस्थित केल्या आहेत, त्यापैकीं मुख्य पुणें येथील सार्वजनिक सभा आणि नॅशनल कॉंग्रेस त्यांत कुळंबी, माळी, धनगर वगैरे शेतकरी किंवा साळी, कोष्टी, खत्री वगैरे कारागीर यांचे नांवसुद्धां नाहीं. उलट बारा आलोत्यापैकीं ब्राह्मण, जोशी, उपाधि आलोत्यांचा मात्र या सभेंत भरणा आहे. बाकीचें सरकारी, कामगार वकील अगर श्रीमंत आहेत. यांत महार, मांग कसें असणार ! ...... यावरून या बळीस्थानांतील एकंदर शूद्रादि अतिशूद्रासह भिल्ल कोळी वगैरे सर्व लोक विद्वान होऊन विचार करण्यालायक होईपर्यंत ते सर्व सारखे एकमत झाल्याशिवाय ती सभा **National** होऊंच शकत नाहीं असें असतां एकट्या उपऱ्या आर्यभट ब्राह्मणांनीं अगर चार व्यापाऱ्यांनीं नॅशनल कॉंग्रेस स्थापिली तर तिला कोण विचारतो ? " ( पृ. १०६ )

ज्योतिरावांच्या या विवेचनामध्यें स्पष्टवक्तेपणा चांगला प्रत्ययाला येतो. ब्राह्मणाचा वरचष्मा या सभेंत त्या काळीं होता तो पुढें कांहीं काळ तसाच वाढत राहिला.

## दहशतवादी चळवळ पेशवाईसाठी

हा प्रकार महाराष्ट्रांत विशेषतः सुरत कॉंग्रेसनंतर जास्त घडला. १९०७ नंतर टिळकांनी ही संस्था काबीज केली व त्यांच्या व्यक्तिमत्वामुळें इतर महाराष्ट्रीय ब्राह्मण देखील या चळवळीकडे खेंचले गेले. तथापि त्यामुळें कॉंग्रेसमध्यें ब्राह्मणेतर पुढाऱ्यांना ब्राह्मण्याचा उग्र दर्प आला व ते सर्व कॉंग्रेसपासून फटकून वागूं लागले. इ. स. १९०५ च्या काळांत नाशिकला 'अभिनव भारत' नांवाची सशस्त्र क्रांतिकारकांची एक संस्था स्थापन झाली. सनदशीर मार्गानें हें सरकार इथून जाणार नाहीं त्यासाठीं बॉम्ब सारख्या साधनांचा आश्रय करावा लागेल असे त्यांचें मत होतें. त्यांच्या संघटनेमध्यें देखील सर्व क्रांतिकारक ब्राह्मणच होते. ब्राह्मणेतर सुशिक्षित तरुण साहजिकच त्यांच्या हेतूबद्दल साशंक बनले. प्रबोधनकार ठाकरे याबाबत एके ठिकाणीं म्हणतात, " सतावनीचा उठाव असो वा वासुदेव बळवंताचा

जमाव असो, त्यांत हिरीरीनें भाग घेणारे बामणवीर केवळ पेशवाई बामणी सत्तेच्या पुनर्घटनेसाठीं झगडणारे एवढे खासखूस पटल्यावर अभिनव भारत संस्थेच्या बामण पुढाऱ्यांच्या हेतूविषयी बामणेतर जमाती साशंक राहून बाजूला सरल्या यांत काय आश्चर्य ? अभिनव भारत संस्था वास्तविक पूर्वीच्या संकुचित जातीय भावनेवर उभारलेली नव्हती हें स्पष्ट सत्य. जातीय अभिमान किंवा विकल्पापासून ती पूर्ण अलिप्त होती यांत संशयच नाही. पण बामणाबद्दल एकदां भरपूर पुराव्यानिशी ब्राह्मणेतरांच्या मनांत घर करून बसलेल्या वाजवी संशयाची निवृत्ति होणार कशी ?" प्रबोधनकार ठाकरे यांच्या या विवेचनावरून त्या काळच्या ब्राह्मणेतर तरुणांच्या धोरणावर लख्ख प्रकाश पडतो.

## ब्रिटिशाशीं सक्रिय सहकार्य

ब्राह्मणेतर तरुण या चळवळीपासून अलिप्त राहिले इतकेच नव्हे तर शाहू महाराज इ. मंडळींनी ही चळवळ दडपून टाकण्यास ब्रिटिशांना मदत केली याबद्दल कोल्हापूरकर व ब्रिटिश सत्ताधारी यांच्यामध्यें झालेला पत्रव्यवहार देखील प्रसिद्ध झालेला आहे. त्यांत एका पत्रांत महाराज म्हणतात "गोऱ्या ब्रिटिश सोजिरांची एक तुकडी येथें (कोल्हापूर) कांहीं दिवस" पाठवाल तर मला आनंद होईल. बाँब करणाऱ्या चळवळचा लोकांना दहशत बसविण्याचा तिचा उपयोग होईल."

मेजर वुड हाऊस कोल्हापूरचे पोलिटिकल एजंट यांना पाठविलेलें पत्र ( ता. १६ जुलै १९०८ ) प्रबोधनकार ठाकरे किंवा कोल्हापूरचे महाराज यांच्या या धोरणावरून त्या काळच्या या चळवळीचें स्वरूप लक्षांत येतें व ब्राह्मण्याचा त्यांना केवढा तिरस्कार वाटत होता हें स्पष्ट होतें.

(इ. स. १८८५ ते १९२० पर्यंतचा सत्यशोधक चळवळीच्या राजकीय चळवळी पाहतां त्या मुख्यत: कॉंग्रेसविरोधी आणि ब्रिटिशांना अनुकूल आढळतात. या काळामध्यें सत्यशोधक चळवळ ही येथील राष्ट्रीय चळवळीशीं समरस न होता ती तिच्यापासून अलिप्त राहिली हें वादातीत सत्य आहे.) परंतु त्यामुळें या चळवळीवर 'राष्ट्रद्रोही' 'साम्राज्यशाहीचा हस्तक' अशी जी टीका केली जाते ती अधिक व्यापक दृष्टीकोनांतून आणि

सहानुभूतीच्या सुरांत होणें जरूर आहे. ही चळवळ या काल खंडांत ब्रिटिशांना अनुकूल का होती याची खालील दोन कारणें देतां येतील.

## राजकीय दास्यापेक्षां सामाजिक गुलामगिरी असह्य

या देशामध्यें अनेक शतकें जाति व्यवस्थेच्या भाराखालीं बहुजन-समाज चिरडला गेला होता. इ. स. ७१२ सालीं मीर कासीमनें प्रथम सिंध-वर हल्ला केला. तेव्हांपासून १९ व्या शतकापर्यन्त अनेक लोक या देशांत आले आणि गेलें. परंतु त्यांच्यापैकीं कोणीहि येथील जाति व्यवस्थेस जबर-दस्त हादरा दिला नाहीं. हें ऐतिहासिक कार्य ब्रिटिश राज्यकर्त्यांनीं केलें. सामाजिक गुलामगिरींतून शद्रादिशूद्रांची मुक्तता केली. इंग्रजांच्या बरोबर येथें आलेल्या नव्या उत्पादनाच्या साधनांनीं आणि आगगाड्या, पोष्ट तारा-यंत्रें इ. सुधारणांचा हा बदल लवकर घडवून आणला. शेंकडो वर्षांच्या सामाजिक दास्यांतून ब्रिटिश राज्यकर्त्यांनी येथील ब्राम्हणेतर वर्गाची मुक्तता केली होती. त्यामुळें त्याच्याबद्दल या दलित वर्गाला स्नेहभाव कृतज्ञता वाटणें अगदी स्वाभाविक होते. शिवाय या वर्गाला राजकीय गुलामगिरीपेक्षां सामाजिक विषमताच व्यवहारांत पदोपदी अधिक असह्य वाटत होती. राजकीय स्वातंत्र्यापेक्षां सामाजिक समतेचे वा स्वातंत्र्याचें मोल बहुजन समाजाला अधिक वाटत होतें. 'साम्राज्यशाहीच्या पिळवणुकीपेक्षां भट-शाहीचा' जाच त्यांना जास्त बोंचक वाटत होता. साहजिकच या वर्गाच्या नेत्यांचें आणि पाठीराख्यांचें प्रेम ब्रिटिशांच्या बाजूला राहणार !

## संस्थानिक चळवळीचे नेते

शिवाय इ. स. १९०५ नंतर कोल्हापूरचे छत्रपती शाहू महाराज या चळवळीचे अनधिकृतरित्या पुढारी बनले होते. ते एक ब्रिटिशांच्या साम्राज्य मधील प्रमुख संस्थानिक होतें. त्यांना त्या राज्यकर्त्यांविरुद्ध चळवळ करणें शक्य नव्हते. एका संस्थानिकाच्या मार्गदर्शनाखालीं ही चळवळ चालविली जात असल्यामुळें देखील तिला ब्रिटिश विरोधी स्वरूप प्राप्त होणें कठिण होतें.

इ. स. १९२० नंतर मात्र या चळवळीच्या जीवनांतील दुसऱ्या पर्वास सुरुवात झालेली आहे.

## हा समाज राजकीय चळवळ बनली
## पहिल्या महायुद्धाचा परिणाम

इ. स. १९१८–१९ नंतर सत्यशोधक चळवळीला राजकीय स्वरूप आलें व तिला नवी धार प्राप्त होऊं लागली हें वर म्हटलेच आहे. या स्थित्यंतराला मॉटेग्यू–चेम्सफर्ड सुधारणा मुख्यत्त्वें कारणीभूत आहेत. हेंहि खरें परंतु त्याच बरोबर पहिल्या जागतिक युद्धाचा या संघटनेवर कांहींसा परिणाम झाला आहे हेंहि दुर्लक्षून चालणार नाहीं. इ. स. १९१८ सालीं पहिलें महायुद्ध संपले आणि सैनिक व लष्करांतील अधिकारी मायदेशीं परत आले. यामध्यें मराठा व तत्सम वर्ग यांचा भरणा नजरेंत भरेल इतका मोठा होता. हे ब्राह्मणेतर सैनिक आपापल्या घरीं परत जाण्यास या सत्यशोधक चळवळीचीं पावले जोमानें पडण्यास एकच गांठ पडली. साहजिकच या चळवळीचें नेतृत्त्व लष्करांतून परतलेल्या अनेक मराठा व तत्सम लोकांकडे गेलें. यांच्याकडे या चळवळीचें पुढारीपण जाण्याचें कारण म्हणजे युद्धाच्या निमित्तानें या सैनिकांनीं अनेक देश व खंडे पाहिलीं होतीं. त्यांची दृष्टी व्यापक झाली होती. शिवाय लष्करांत त्यांना भेदाभेद न करतां समानतेची वागणूक मिळाली होती. जगाच्या पाठीवर जन्मावरून माणसामाणसांत भेद निर्माण झाल्याचे त्यांना कोठेंच दिसले नव्हते. त्यामुळें स्वतःच्या खेडयांत जाताच या लोकांना सामाजिक विषमतेची धार असह्य वाटूं लागली. पुष्कळ खेडयांत लष्करांतील सैनिकाकडे व सुभेदारांकडे या ब्राह्मण ब्राह्मणेतर चळवळीचें पुढारीपण गेल्याचें सांपडलें याचे हें कारण महत्त्वाचें आहे. राजकीय सत्ता हस्तगत करण्यासाठीं संघटित होत असलेल्या या चळवळीला या नव्या नेतृत्त्वामुळें आणखी जास्त गति प्राप्त झाली

१९२० साली द्विदल राज्य पद्धतीप्रमाणें सोपीव खाती हिंदी जनतेकडे सोपविण्यांत आली व त्यासाठीं सर्वत्र निवडणुका झाल्या. या माँटेग्यू चेम्सफर्ड सुधारणेमुळें ब्राह्मणेतर चळवळीच्या ग्रंथातील दुसऱ्या प्रकरणास सुरवात झाली. येथूनच तिचे मूळचे सामाजिक स्वरूप कमी होऊन तिला राजकीय स्वरूप प्राप्त होऊं लागलें. पुढें १९२०, १९२३ व १९२६ साली

कौन्सिलसाठीं निवडणुका झाल्या. त्यावेळीं महाराष्ट्रांत ब्राह्मणेतर पक्षाची स्थिति काय होती व त्यांनीं कौन्सिल प्रवेश करून ब्राम्हणेतरासाठीं काय सुधारणा केल्या हे अभ्यासणें मनोरंजक ठरणार आहे. त्यापूर्वी या चळवळीची मद्रासमध्यें अवस्था काय होती याचा ओझरता आढावा घेणें हितप्रत ठरणार आहे.

## मद्रासमधील ब्राह्मणेतर चळवळीचें स्वरूप

१८८५ साली कॉंग्रेस सुरू झाली आणि तिच्यामध्यें मद्रासमधील पुष्कळ सुशिक्षित ब्राह्मणेतर घुसले. मद्रासमध्यें ब्राह्मणेतरामध्यें शिक्षणाचा प्रसार फार झालेला होता. त्यांच्यामध्यें निष्णात डॉक्टर, पहिल्या दर्जाचे वकील, पट्टीचे संपादक व पहिल्या दर्जाचे वक्ते होते. परंतु त्यांच्यामध्यें हा भरणा जरी मोठा असला तरी ब्राह्मण वर्ग आपली मुस्कटदाबी केल्याशिवाय राहणार नाहीं अशी भीति वाटल्यावरून तो वर्ग कॉंग्रेसबाहेर पडला व त्यानें आपला एक स्वतंत्र साऊथ इंडिअन लिबरल फेडरेशन पक्ष काढला. कै. डॉ. नायर व सर त्यागराज चेट्टी यांच्याकडे या संस्थेचे पुढारीपण आलें.

सन १९१७ सालीं पार्लमेंटमध्यें स्टेट सेक्रेटरी श्री. एडविन मॉंटेग्यू यांनीं घोषणा केली व हिंदुस्थानला क्रमाक्रमानें जबाबदारीच्या राज्यकारभाराचे अधिकार देण्याचा निश्चय जाहीर केला. दक्षिणेमध्यें सगळीकडे ब्राह्मणांचें वर्चस्व होतें. या नवीन प्रांतिक स्वायत्ततेमुळें त्यांचे वर्चस्व आणखी वाढणार अशी भीति साऱ्या ब्राह्मणेतर पुढाऱ्यांना वाटू लागली. ब्राह्मणांच्या या नव्या आक्रमणापासून संरक्षण करण्यासाठीं सर्व ब्राह्मणेतर पुढाऱ्यांनीं नवीन चळवळ सुरू केली. राज्यव्यवस्थेंत आपणास स्वतंत्र मतदार संघ मिळावा असा प्रचार मद्रासेंत सर्व ब्राह्मणेतर पुढारी करू लागले. डॉ. नायर व सर त्यागराज चेट्टी यांनीं या चळवळीला पुढारीपण देण्याचें कबूल केले.

पार्लमेंटपुढें हिंदुस्थानचें हें बिल आलें. उमरावांची सभा व लोकसभा यांच्या संयुक्त सभेपुढें हें बिल चर्चिले जाणार होते. त्याप्रसंगीं ब्राह्मणेतर लोकांचें म्हणणें मांडण्यासाठीं मद्रासनें कर्तबगार पुढाऱ्यांचें मंडळ पाठविले व आपला आवाज लोकसभेंत उठविला. स्वतंत्र मतदार संघ कोणासच

मिळाले नाहींत परंतु त्यामुळें तो पक्ष संघटित झाला व चळवळीला दिशा प्राप्त झाली.

मद्रासमध्यें अशा प्रकारे इंग्लंडला मंडळ पाठविण्याची चळवळ चाललेली पाहून महाराष्ट्र व कर्नाटक येथील ब्राह्मणेतर पुढाऱ्यांना देखील तसें वाटूं लागलें. कोल्हापूरचे श्री. शाहू महाराज यांच्या नेतृत्वाखालीं दोन्ही ठिकाणचे पुढारी जमले व ब्राह्मणेतरांसाठीं स्वतंत्र मतदारसंघ मागण्यासाठीं श्री. भास्करराव जाधव महाराष्ट्र–कर्नाटकतर्फे इंग्लंडास गेले. मद्रासप्रमाणेंच मुंबई इलाख्यासहि हा हक्क प्राप्त झाला नाहीं. परंतु त्यामुळें मराठा व तत्सम समाजांत या प्रश्नामुळें राजकीय जागृति मात्र निश्चितपणें झाली व त्यांना मुंबई विधीमंडळांत ७ राखीव जागा मिळाल्या.

यानंतर १९२०, २३, २६ साली झालेल्या निवडणुकांत मद्रासमध्यें ब्राह्मणेतर पक्षाला बहुमत मिळाले व तेथें त्यांचे मंत्रिमंडळ देखील स्थापन झाले. त्यांच्याकडे सोपीव खात्याचे अधिकार आल्याबरोबर त्यांनी देवस्थानें बिलासारखी बिले पास करून घेऊन ब्राह्मणेतर समाजाच्या प्रगतीस जोरानें प्रारंभ केला.

## ब्राह्मणेतर पक्ष प्रभावी नव्हता

मुंबई इलाख्यांत उलट ब्राह्मणेतर पक्षास पहिल्या निवडणुकामध्यें बहुमत मिळाले नाहीं. व मंत्रिमंडळांत त्यांना प्रवेशही मिळाला नाहीं. इथें असे होण्यास मुख्यतः तीन कारणें होती. मुंबई इलाख्यांत सिंध व गुजराथचे प्रतिनिधी असत. तेथें या वादाची पुसट देखील कल्पना नव्हती त्यामुळें तेथील प्रतिनिधी यांच्यांत बसत नसत दुसरे हा पक्ष मद्रासप्रमाणें सुसंघटित नव्हता आणि तिसरें कारण म्हणजे मद्रासप्रमाणें या पक्षाच्या हातांत प्रचारासाठीं वृत्तपत्रें नव्हती व चांगल्या दर्जाचे पुढारीही नव्हते. यामुळें मंत्रिमंडळांत एक सिंधी मुसलमान दुसरे गुजराथी व तिसरे महाराष्ट्रीय ब्राह्मण–रँग्लर परांजपे आले व ब्राह्मणेतर पक्ष वगळला गेला.

१९२३ साली नंतर दुसऱ्या निवडणुका झाल्या त्यावेळीं मात्र ब्राह्मणेतर पक्ष व मुसलमान प्रतिनिधी यांनीं मंत्रिमंडळ बनविले. ब्राह्मणेतर पक्षाचे यावेळीं एकूण १३ सभासद निवडून आले. कॉंग्रेसनें या वेळीं ३४

जागा मिळविल्या होत्या परंतु त्यांनीं सरकारशीं असहकाराचें धोरण स्वीकारले होते. त्यामुळें त्यांनीं मंत्रिमंडळ बनविण्याचें नाकारले. हे ब्राह्मणेतर पक्षाच्या पथ्यावरच पडले. शिवाय १९२२ सालीच मुंबईचे निवृत्त होणारे राज्यपाल सर जॉर्ज लाईड यांच्या सत्कार समारंभाच्या वेळीं राजाराम महाराज यांनीं या चळवळीला संघटित स्वरूप दिले होते. या दोन कारणामुळें या वेळीं श्री. भास्करराव जाधव हे मंत्री होऊं शकले व त्याच वेळीं त्यांच्याकडे शिक्षणखाते दिले गेले. त्याचा त्यांनीं फायदा घेऊन ब्राह्मणेतर समाजांत शिक्षणाचा प्रसार भरपूर केला. नुसत्या सातारा जिल्ह्यांत विद्यार्थ्यांची संख्या ३०,००० वरून ६०,००० पर्यंत गेली.

नंतर १९२६ साली निवडणुका झाल्या. यावेळीं ब्राह्मणेतर पक्षाला १२ जागा मिळाल्या परंतु मंत्रिमंडळांत त्यांना एकही जागा मिळाली नाहीं. याला मुख्य कारण पुढारीपणासाठीं त्यांच्यात झालेली भांडणे होत. पुढें १९२८ सालीं रँगलर परांजपे गेल्यानंतर तेथें श्री. भास्करराव जाधव यांची नेमणूक झाली व त्यांना एक जागा मिळाली.

## ब्राह्मणेतर पुढाऱ्यांची कौन्सिलांतील विधायक कामगिरी

इ. स. १९२१ ते १९२९ पर्यंत सत्यशोधक समाजाचे पुढारी मुंबई लेजिस्लेटिव्ह कौन्सिलमध्यें होते. या काळांत त्यांनीं इतर सभासदांच्या मतानें मुख्यत: खालील कायदे पास करून ब्राह्मणेतर समाजास प्रगतीस हातभार लावला.

१ ३ ऑगष्ट १९२३ ला सी. एम्. गांधी यांनीं ठराव मांडला आणि म्हटले कीं सरकारी यंत्रणेमध्यें मराठा व तत्सम वर्ग, मुसलमान, अस्पृश्य, इ. कमीत कमी शैक्षणिक पात्रतेचीं बंधने घालून सरकारी खात्यांत नोकरीस लावावे.

"This council recommends to His Excellency the Governor in Council, that, in order to bring the educationally backward classes such as the Marathas Mahomedans, depressed classes and the like in a line with the advanced classes,

greater facilities should be provided for them to get education of all kinds and that in the recruitment to public services preference should be given to persons of the aforesaid classes possessing the necessary minimum education qualifications for the same " ( शैक्षणिक दृष्टचा मागासलेल्या मराठा, मुसलमान, दलित व तत्सम जातींना पुढारलेल्या जातीच्या बरोबरीनें आणण्यासाठीं त्यांना सर्व तऱ्हेच्या शैक्षणिक सवलती दिल्या पाहिजेत आणि कमीत कमी शैक्षणिक लायकी वर त्यांना सरकारी नोकऱ्यांत जागा देण्यासाठीं प्रथम मान दिला पाहिजे. )

त्यांचा मूळ ठराव पुढीलप्रमाणे होता.—

हा ठराव जरी श्री. गांधी यांनीं मांडला होता तरी त्याला जोरदार पाठिंबा दिला मात्र रा. ब. आर्. आर्. काळे ( सातारा जिल्हा ) यांनीं त्यांनीं या ठरावाचें महत्व आणि प्रयोजन सांगतांना म्हटलें,

" ब्राह्मण ब्राह्मणेतर यांच्या आजच्या भांडणाला महत्वाचें कारण म्हणजे सरकारी यंत्रणेंत ब्राह्मणांना मिळालेला अन्याय्य वांटा ! या पांच टक्के लोकांनीं नोकरीमधल्या ९५ टक्के जागा अडविल्या आहेत. अशा स्थितींत दोन्ही जमातींत वैरभाव निर्माण न होईल तरच आश्चर्य ! हा भेद नष्ट करण्यासाठीं ब्राह्मणेतरांना सरकारी खात्यांत जास्तीत जास्त जागा दिल्या पाहिजेत. ब्राह्मणेतरांना अल्पशा शिक्षणावर जर चांगल्या जागीं नेमले तर सरकारी यंत्रणा कार्यक्षम राहणार नाहीं अशी तक्रार कांहीं टीकाकार करतात. परंतु कार्यक्षमतेपेक्षां देखील लोकशाहीच्या दृष्टीनें इकडे पाहिले पाहिजे. जबाबदार स्वराज्यांत बहुसंख्य समाजावरच राज्यकारभाराचें उत्तरदायित्व पडणार आहे. त्यांना आतांपासूनच हें शिक्षण मिळाले पाहिजे. "

मूळच्या ठरावानंतर कांहीं दुरुस्त्या मान्य होऊन हा ठराव ४ ऑगष्ट १९२३ ला पास झाला.

(२) सरकारी यंत्रणेमधील ब्राह्मणेतरांच्या प्रवेशाप्रमाणें ' जोशी वृत्ति ' नष्ट करण्याचा ठराव देखील फार महत्वाचा आहे. खेड्यांतील बारा बलुत्याच्या पद्धतीप्रमाणें जोशी हा खेड्यांतील एक घटक होता. इंग्रजी राज्यानें ही जुनी ग्रामीण अर्थव्यवस्था मोडली होती. त्यांतच या ठरावानें खेड्यांतील ब्राह्मणांच्या धार्मिक वर्चस्वास आणखी एक तडा गेला.

## जोशी वृत्ति नष्ट करण्याचें बिल

जोशी वृत्ति नष्ट करण्याचा ठराव रा. ब. बोले यांनीं प्रथम ३ नोव्हेंबर १९२५ ला मुंबई कौन्सिलमध्यें मांडला. तो ३० नोव्हेंबर १९२५ ला सरकारी गॅझेटमध्यें प्रसिद्ध झाला.

मुंबई इलाखा, वऱ्हाड व नागपूर प्रांतांतील मराठी जिल्हें येथें ग्रामोपाध्यांची वतनें होतीं. ब्राह्मणेतर चळवळीच्या नेत्यांनीं ब्राह्मण पुरोहितशिवाय लग्नें व धर्मविधि उरकरण्यामी प्रथा सुरू केली. त्यामुळें ब्राह्मण जोशांचे उत्पन्न बुडूं लागलें. त्यावेळीं आपल्याकडून धर्मकृत्यें करवून न घेतल्याबद्दल झालेल्या नुकसानीसाठीं त्यांनीं ब्राह्मणेतर यजमानावर दिवाणी कोर्टांत दावे लावलें. दाव्याचा निकाल हायकोर्टानें ब्राह्मण व पुरोहितांना अनुकूल दिल्यामुळें ब्राह्मणेतर लोकांची स्थितिं चमत्कारिक झाली. ही अडचण दूर व्हावी म्हणून श्री. बोले यांनीं हा ठराव मांडला. ब्राह्मण जोशांना धर्मविधि न करतांदेखील इतरांकडून धार्मिक विधीसाठीं रक्कम मागण्याचा अधिकार नाहीं हें या ठरावानें श्री. बोले यांना स्पष्ट करायचें होतें. ठराव पुढीलप्रमाणें होता.

No person shall be entitled to claim, as a matter of right, any ceremonial emoluments from any Hindu who does not call in the services of the person claiming those emoluments " (Bombay legislative Council– 1926–Page 1918 ).

या ठरावाचें पहिलें वाचन १९ मार्च १९२६ ला झालें. त्यावेळीं रा. ब. बोले यांनीं जोशी वृत्तीवर तीव्र हल्ला केला. त्यांच्या म्हणण्याचा आशय असा कीं, जोशांची वतनें म्हणजे न्याय आणि समता या तत्त्वांना फांसलेला

हरताळ आहे. पुरोहितांचा हा जाच फक्त मुंबई इलाख्यांत फार तापदायक वाटतो. मद्रास, कलकत्ता, अलाहाबाद आणि पंजाब येथील न्यायमूर्तींनीं या पुरोहित वर्गाचा वतनाचा हक्क बेकायदेशीर ठरविला होता. मद्रासच्या न्यायकोर्टानें याबाबत दिलेला निर्णय येथील ब्राह्मणेतर चळवळीस पोषक ठरला. या निकालांत म्हटले होते--

" I am strongly against the recognition of office which could give rise to an exclusive right to officiate as purohit for a particular person on in a particular village or villages especially a right which can be enforced in a court of law. I hold that monopoly to officiateas purohit should not be recognized by courts andthat it is against public policy to allow any suchclaim. " (Bombay legislative council 1926 – Page 1503).

मद्रास कोर्टानें एवढ्या खणखणींत शब्दांत जोशी वतनें बेकायदेशीर ठरविल्यामुळें रा. ब. बोले यांनीं देखील आपलें मत मोठ्या आग्रहानें आणि आत्मविश्वासानें मांडले. श्री. बोले म्हणाले, हल्लीचे ब्राह्मण चांभारांचीं दुकानें थाटून बसलेले आहेत. हा धंदा अस्पृश्यांचा मानला जातो. असलीं कामें करून देखील ब्राह्मण आपलें पावित्र्य आणि पौरोहित्य यावर हक्क सांगूं लागतो हें मोठें चमत्कारिक आहे. यानंतर हा ठराव पुन्हां २८ जुलै १९२६ ला चर्चेसाठीं कौन्सिलसमोर आला. त्यावेळीं देखील श्री. बोले यांनीं जोशीवृत्तीवर कडाडून हल्ले केले. श्री. बोले यांना त्यावेळीं मुख्यत: जी. बी. प्रधान, पी. जी. जोशी, ल. ब. भोपटकर यांच्या सर्व मुद्यांना तोंड द्यावें लागलें. शेवटी कमळी व इतर ब्राह्मणेतर पुढाऱ्यांनीं जोरदार पाठिंबा दिल्यामुळें ३ ऑगस्ट १९२६ हा श्री. बोले यांचा ठराव पास झाला.

(३) वरील दोन्ही ठरावाप्रमाणें या काळांतील स्थानिक स्वराज्य संस्थामधील कामगिरी अत्यंत महत्त्वाची आहे. नव्या मंत्रिमंडळानें लोकल-बोर्डें, नगरपालिका यांचे मतदार वर्ग व्यापक केले. ब्राह्मणेतर वर्ग बहुसंख्य

असल्यामुळें स्वाभाविकच त्यांचा मतदार वर्ग बहुसंख्य होता. त्यांच्याच हातांत या सर्व स्थानिक संस्था गेल्या. ब्राह्मणेतरांच्या कर्तृत्वाला स्थानिक संस्थामुळें एका नवें कार्यक्षेत्रउघडें झालें. याच काळांत इ. स. १९२३ सालीं शिक्षणाचा ठराव पास करून स्थानिक संस्थांना शिक्षणविषयक खूप अधिकार दिले. या कायद्याप्रमाणें ब्राह्मणेतरांच्या ताब्यांत असलेल्या स्थानिक संस्थांनीं आपल्या शाळामधून जास्तींत जास्त ब्राह्मणेतर शिक्षक नेमले. स्थानिक स्वराज्य संस्थामधील कायद्यांना व सुधारणांना बहुजन समाजाच्या प्रगतीच्या दृष्टीनें फार मानाचें स्थान आहे.

(४) नोकऱ्या, जोशीवृत्तीचा उच्छेद व स्थानिक संस्थांचा कारभार याचप्रमाणें शिक्षणविषयक क्षेत्रांत या काळांत मोठी प्रगति झाली होती. ब्राह्मणेतर वर्गाच्या सामाजिक गुलामगिरीचें मूळ कारण त्यांचें अज्ञान हे आहे हे या सत्यशोधक नेत्यांनीं ओळखलें होते. ज्योतिराव फुले, न्यायमूर्ति रानडे, गोपाळ गोखले यांनीं यादृष्टीनें सक्तीच्या शिक्षणाच्या योजना अनेक वेळां मांडल्या होत्या. इ. स. १९२३ साली शिक्षणविषयक ठराव पास केला. या काळांत शिक्षणाचा प्रसार बहुजन समाजांत जास्तीत जास्त करावा म्हणून ब्राह्मणेतर पुढाऱ्यांनीं प्रयत्न केला. विशेषतः भास्करराव जाधव यांनीं या बाबतींत विशेष परिश्रम घेतले.

वरील चारहि सुधारणा ब्राह्मणेतर पुढाऱ्यांनीं इ. स. १९२१ ते १९२९ च्या काळांत केल्या. या चळवळीची या कालखंडांतील ही कामगिरी खास विधायक मानली पाहिजे. सत्यशोधक चळवळीच्या सर्व सामाजिक सुधारणेच्या ठरावाला कायदेमंडळांत त्या काळच्या प्रागतिक पुढाऱ्यांनीं सर्व प्रकारचें सहाय्य केलें ही गोष्ट नमूद केली पाहिजे.

## सत्यशोधक चळवळ सत्ताशोधक च वळ बनली

इ. स. १९२० ते १९३० या काळांतील सत्यशोधक चळवळीचा आढावा घेतल्यानंतर दोन गोष्टी कठोरपणें मांडणें अगत्याचें वाटते. पहिलें या काळांत या चळवळीच्या नेत्यांनी मागासलेल्या बहुजन समाजासाठीं नोकरीच्या जागा खुल्या करून दिल्या व त्यांच्या प्रगतीस फार मोठा हातभार लावला. सरकारी यंत्रणेमध्यें सत्तेच्या जागा मिळाल्यानें त्यांच्या शैक्षणिक

आणि आर्थिक स्थितींत झपाट्यानें बदल झाला. त्या काळांत त्याची फार गरज होती. परंतु या सत्तेच्या जागा ही त्यांची साधने होती व सामाजिक समता प्रस्थापित करणें हे त्यांचें साध्य होते. परंतु दुर्दैवानें पुढें ज्योतीरावांचे मानवी समतेचे विशाल साध्य बाजूला पडले व सत्ताप्राप्ती हे साधनच साध्य बनले गेले. त्यामुळेंच कांहीं टीकाकार अत्यंत निर्दयपणें याचे विश्लेषण करतांना म्हणतात, 'या काळांत सत्यशोधक चळवळ ही सत्ताशोधक चळवळ झाली.' खुलाशानें वस्तुनिष्ठ अभ्यासकाला यामधील सत्य सांगण्याची गरज नाही.

## भटशाही वाईट, भट नव्हेत

दुसरा दोष अशा प्रचाराच्या धुमाळींत नेत्यांनी ब्राह्मणशाही व ब्राह्मण यांच्यांत गल्लत केली. भटशाही आणि भट हे एकच होत असे त्यांनी समीकरण मांडले. हे दोन्हीचे एकीकरण शास्त्रीय दृष्ट्या एक होईल कीं नाहीं शंका वाटते. कारण ब्राह्मणशाही किंवा पुरोहितांची संस्था वाईट असून देखील कांहीं ब्राह्मण हे व्यक्तिशः चांगले असूं शकतात. ब्राह्मणशाही किंवा पुरोहितांची संस्था यामध्यें विवक्षित समाजव्यवस्था अंतर्भूत होते. परंतु ती समाज व्यवस्था निंद्य असून देखील कांहीं ब्राह्मण व्यक्ती या इतरांइतक्याच सद्विचारी व सन्मार्गी असूं शकतात. ती व्यवस्था नष्ट झाली म्हणजे त्याच व्यक्ति अत्यंत सच्छील होऊं शकतात. जोशीवृत्ति नष्ट करणें आणि जोशी नष्ट करणें यांत महदंतर आहे. सामान्यतः भटशाही आणि भट यांच्यांत भेद करणें स्थूल दृष्टीला कठीण जाते. शिवाय सर्वसामान्य माणसाला भटशाही ही कल्पना अव्यक्त आहे. तिचे दृश्य स्वरूप दाखविल्यावांचून सामान्य माणसाला त्याचे दुष्परिणाम कळतहि नाहींत. यामुळें प्रचाराच्या सोयीसाठीं असा भेद करणें कठीण होते. तरी देखील ब्राह्मणशाही आणि ब्राह्मण यांच्यांत सीमारेषा मारणें अगत्याचें होते. एक व्यवस्था घृणास्पद होती हे कोणालाहि नाकारून चालणार नाहीं. परंतु त्यामुळें ब्राह्मण जातींत जन्माला आलेल्या प्रत्येक व्यक्तीला निंद्य ठरविणें कितपत उचित ठरेल याबद्दल शंका वाटते.

## १९२९ नंतर बदललेलें चळवळीचें स्वरूप

१९२९ नंतर मात्र या चळवळीची दिशा बदलली व हा छोटासा प्रवाह विशाल राष्ट्रीय चळवळीमध्यें सामील झाला. जेधे यांच्यासारखे पुष्कळ सत्यशोधक नेते काँग्रेसमध्यें सामील झाले. विठ्ठलराव घाटे यांच्यासारखे कर्तबगार तरुण सरकारी यंत्रणामध्यें घुसले. भास्करराव जाधवासारख्यांनीं राजसंन्यास घेतला व बाळासाहेब मोरे यांच्यासारख्यांनीं आपला सवता सुभा निर्माण करून स्वतंत्रपणें काम करण्यास सुरवात झाली. या चळवळीची अशी वाताहत झाली. परंतु सर्वसामान्यपणे ही चळवळ काँग्रेसमध्यें विलीन झाली असे म्हणण्यास हरकत नाहीं. असे होण्यास महत्त्वाचीं चार कारणें घडलीं. टिळकांच्या मृत्यूनंतर महाराष्ट्रांतील पुष्कळसे ब्राह्मण पुढारी म. गांधीशी मतभेद झाल्यामुळें बाहेर पडले व त्यांनीं आपला स्वतंत्र पक्ष काढला. ब्राह्मण मंडळी काँग्रेसपासून अलिप्त झाली ही गोष्ट साऱ्या ब्राह्मणेतरांना पथ्यकारक वाटली. दुसरे त्याच वेळीं अखिल भारतीय काँग्रेसचें पुढारीपण म. गांधीसारख्या महाराष्ट्राबाहेरच्या ब्राह्मणेतर माणसाकडे गेले हे देखील ब्राह्मणेतरांना मनांतून बरेंच वाटले. तिसरें आणि महत्त्वाचें कारण म्हणजे राष्ट्रीय चळवळ त्यावेळीं बरीच फोंफावली होती. त्या प्रचंड अशा लाटेसमोर जमातवादाची लहानशी चळवळ टिकणे शक्य नव्हते. राष्ट्रवादासारखी विशाल चळवळ जमातवादासारख्या संकुचित चळवळीला न गिळेल तरच आश्चर्य ! आणि त्याच वेळीं म्हणजे इ.स. १९२९–३०त जगभर पसरलेली मंदी. आर्थिक मंदीची लाट राष्ट्रीय चळवळीला उपकारक ठरली. परकीय सरकारविरुद्ध आधीं लढा दिला पाहिजे या काँग्रेसच्या म्हणण्याला या मंदीमुळें अधिक धार प्राप्त झाली.

वरील चार कारणाप्रमाणें हिंदु–मुस्लीम वादामुळें या चळवळीचा जोर ओसरूं लागला. इ. स. १९२९–३० सालीं हिंदु–मुस्लीम वादाच्या ज्वाला देशभर भडकूं लागल्या होत्या. आपल्या समाजाबाहेरील हा शत्रू प्रबल होत आहे हे दिसतांच हिंदु समाजांत एकीची भावना प्रबल होऊं लागली. पुढाऱ्यांचें व जनतेचें लक्ष कांहीं प्रमाणांत तरी ब्राह्मण–ब्राह्मणेतर वादाकडून निराळचाच हिंदु-मुस्लीम वादाकडे वळले. हिंदु-मुस्लीम वादाला

जशी देशांत भरती येऊं लागली तशी ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादाला ओहोटी लागूं लागली.

या सर्व गोष्टींचा साकल्यानें झालेला परिणाम म्हणजे ब्राह्मणेतर पक्षाचें कॉंग्रेसमध्यें झालेलें विसर्जन होय !

## इ. स. १९३० ते १९४६ पर्यंतचें राजकीय जीवन

यानंतर हा पक्ष १९४६ पर्यंत कॉंग्रेसमध्यें राहूनच कार्य करीत होता. १९३७ सालीं मुंबई इलाख्यांत कॉंग्रेसचें मंत्रिमंडळ आलें. त्यावेळीं पुष्कळ ब्राह्मणेतर पुढाऱ्यांची मंत्रिमंडळांत वर्णी लागली. आमदारांमध्यें देखील ब्राह्मणेतर लोकांचा भरणा मोठा होता. या काळांत सत्यशोधक चळवळींतील अनेक कार्यकर्ते व नेते कॉंग्रेसमध्यें सामील झाले.

या काळामध्यें जातीयवाद महाराष्ट्रामध्यें पूर्वीसारखा उजळ माथ्यानें वावरूं शकत नव्हता. परंतु त्यामुळें तो नष्ट झाला असे मानण्याचें कारण नाहीं. या पंधरा वर्षामध्यें तो भूमिगत होऊनच कॉंग्रेसमध्यें कार्य करीत होता. असे म्हणण्यामध्यें या पुढाऱ्यांच्या राष्ट्रीय वृत्तीबद्दल शंका घेण्याचा हेतु नाहीं. परंतु या वादाची मुळें त्यांच्या मनामध्यें इतकी खोलवर गेली होती कीं त्यांना देखील तीं सहज काढून टाकणें शक्य नव्हतें.

ता. २० ऑक्टोबर १९३८ ला नागपूर येथें विदर्भ-मध्यप्रांत ब्राह्मणेतर परिषद भरली होती. त्यावेळीं त्या प्रांतातील सुमारे २००० ब्राह्मणेतर कार्यकर्ते आले होते. या परिषदेंत म. गांधींच्या राजकारणावर विश्वास व्यक्त करणारा ठराव पास होऊन कॉंग्रेसला मिळण्याचा निर्णय प्रचंड बहुमतानें घेण्यांत आला. ठरावाला फक्त ४ सभासदांनीं विरोध केला होता. या परिषदेचे अध्यक्ष श्री. केशवराव जेधे हे होते. ते आपल्या अध्यक्षीय भाषणांत म्हणाले होते, "थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे महात्मा गांधी राजकारणांत आल्यापासून सत्यशोधक समाजाच्या चळवळीच्या मागें जो कार्यक्रम होता तो म्हणजे सामाजिक समतेची प्रस्थापना करणें, तो कॉंग्रेसनें स्वीकारला आणि त्यामुळें ब्राह्मणेतर जनतेला कॉंग्रेसपासून अलिप्त राहण्यासारखें कांहींही राहिले नाही. १९३५ सालच्या कायद्यानें जे कांहीं हक्क हिंदी जनतेला देण्यांत आले ते फारसे नाहींत. तथापि सदरहू कायद्यामुळें

हिंदुस्थानांतील ३॥ कोटी लोकांना मतदानाचा हक्क प्राप्त झाला आणि महाराष्ट्रांतील ११ जिल्हयांतील सुमारे २० लाखापर्यन्त मतदार झाले: त्यामुळें यापुढील राज्यकारभार बहुमताच्या जोरावर चालणारा असल्या-कारणानें मिळालेल्या सत्तेचा उपयोग बहुजन समाजाच्या हिताकरतां व्हावा अशी माझी इच्छा आहे आणि त्याचप्रमाणें मी महाराष्ट्रांतील माझ्या सर्व सहकाऱ्यांना काँग्रेसमध्यें समाविष्ट करण्याला विनंती केली. आणि काँग्रेस कार्यकर्त्यांनाहि ही गोष्ट योग्य आहे असें मानून आज महाराष्ट्रांतील जनता आणि काँग्रेस यांचें समीकरण झालें आहे." (ज्ञानप्रकाश–२१ऑक्टो.१९३८)

## चळवळीच्या धुरीणांचा साम्यवादी दृष्टिकोण

१९४५ च्या निवडणुका होईपर्यंत या पक्षाचे अनुयायी काँग्रेसमध्यें राहिले. परंतु या निवडणुकीनंतर मात्र त्यांच्यामध्यें असंतोष वाढू लागला. इ. स. १९४८ मध्यें श्री. शंकरराव मोरे यांच्या नेतृत्वाखालीं शेतकरी कामकरी पक्ष नांवाचा पक्ष स्थापन केला. हा वर्ग बाहेर पडतांना सर्वच ब्राह्मणेतर पुढारी व कार्यकर्ते बाहेर पडले असें मानणें चुकीचें ठरेल कारण नामदार भाऊसाहेब हिरे व नामदार यशवंतराव चव्हाण यांच्यासारखे कार्यकर्ते अद्यापही काँग्रेसमध्यें राहून कार्य करीत आहेत. काँग्रेसमधून हा वर्ग बाहेर पडण्यास निरनिराळी तीन चार कारणें घडलीं परंतु त्यांतील एक प्रमुख म्हणजे या पक्षाच्या धुरीणांना आलेली वर्गीय लढ्याची दृष्टी होय ! काँग्रेस ही भांडवलदारांच्या आधीन झालेली संस्था आहे त्यामुळें ती अंतर्गत धोरणांत ज्याप्रमाणें क्रांतिकारक कार्यक्रम घेऊ शकत नाहीं त्याचप्रमाणें आंतरराष्ट्रीय राजकारणांत देखील कम्युनिस्ट राष्ट्रांना अनुकूल भूमिका घेऊं शकत नाहीं. देशांत त्यांचा कल टाटा, बिर्ला इ. धनपतींकडे आहे त्याचप्रमाणें देशाबाहेर तो अमेरिकेसारख्या भांडवलशाही प्रधान राष्ट्राकडे आहे. कसेल त्याची जमीन किंवा उद्योगधंद्याचें राष्ट्रीयीकरण यासारखा क्रांतिकारक कार्यक्रम ही काँग्रेस घेऊच शकत नाहीं असें यांचें मुख्य म्हणणें. काँग्रेस ही धनिकांच्या आहारी गेलेली संस्था आहे म्हणून १९३९ साली कॉ. मानवेंद्र-नाथ रॉय यांचा पक्ष काँग्रेसबाहेर पडला होता. त्याच मतभेदावर ७-८ वर्षांनंतर हा पक्ष आतां या संस्थेतून फुटून बाहेरपडला होता. अर्थात याला

दुसरेंही कारण असणें शक्य आहे. याच सुमारास मा. स्टालीननें रशियामध्यें किंवा मार्शल टिटोनें युगोस्लाव्हियामध्यें साम्यवादाचा प्रयोग पुष्कळ प्रमाणांत यशस्वी केलेला होता. चीनमधील शेतकऱ्यांची लाल क्रांति या मार्गानें आगेकूच करीत होती. या क्रांत्यांचे प्रयोग या नेत्यांच्या समोर होते. त्यांचा परिणाम यांच्या मनावर न झाला तरच आश्चर्य ! त्यामुळें या पक्षानें देखील महाराष्ट्रामध्यें कम्युनिझमच्या तत्त्वज्ञानावर आपली संघटना उभी केली व कॉंग्रेसविरोधास सुरुवात केली.

### साम्यवादाप्रमाणेंच प्रांतवादहि कारणीभूत

या नव्या पक्षाच्या जन्माला साम्यवादी दृष्टीकोण जसा जबाबदार होता त्याचप्रमाणें प्रांतवादहि अंशतः कारणीभूत होता. महाराष्ट्र विरुद्ध गुजराथ असा हा वाद इथें निरनिराळ्या स्वरूपांत चालू होता. गुजराथी नेत्यांचे प्रभुत्व सदैव महाराष्ट्रीयांच्या जीवनावर चालूं असते. गुजराथी लोकांचें वर्चस्व झुगारून द्यायचें असलें तर महाराष्ट्रांतील बहुजन समाजानें एकत्रित येऊन संघटना उभी करणें जरूर होते. हा अप्रगट सुप्त प्रांतवाद या नव्या पक्षाच्या उदयाला कांहीं प्रमाणांत कारणीभूत झाला होता. 'गुजराथी पुढारीपणाला शह देणारी एक महाराष्ट्रीयन संघटना' म्हणून देखील कांहीं लोकनेते या चळवळीकडे पहात होते.

### नव्या पक्षाचीं मूलभूत तत्त्वें

पुढें इ. स. १९४८ च्या एप्रिलमध्यें शेतकरी कामकरी पक्ष स्थापन झाला. परंतु त्यापूर्वी कॉंग्रेसमध्यें २-४-४७ ला कॉंग्रेस शेतकरी कामगार संघ स्थापन झाला होता. या संघाला वर्गीच स्वरूप प्राप्त झालेले असले तरी त्याला पूर्वीची सत्यशोधक चळवळीची पार्श्वभूमि मोठी होती हे नाकारून चालणार नाहीं. आळंदीला ( देवाची ) भरलेल्या या संघाच्या सभेला उपस्थित असलेल्या सभासदांमध्यें पूर्वीची सत्यशोधकी मंडळी होतीच. परंतु बाकीचे नेते देखील बहुजनसमाज (ब्राह्मणेतर) मधील होते. या संघटनेमध्यें त्यावेळीं केशवराव जेधे, शंकरराव मोरे, नाना पाटील, श्री. तुळशीदास जाधव, भापकर, व्यंकटराव पवार, दत्ता देशमुख, पी. के. सावंत, ज्ञानोबा जाधव, भाऊसाहेब राऊत इ. प्रमुख नेते होते. सत्यशोधक चळवळीची

हुकुमशाही या देशांत स्थापिली जाण्याचा धोका निर्माण होईल. यासाठीं आम्ही कॉंग्रेसचा त्याग करून नवा पक्ष उभारीत आहोत."

या पक्षाचा तात्त्विक कार्यक्रम जरी मार्क्सवादी असला तरी या पक्षाच्या अनुयायांना ब्राह्मणेतर चळवळीचा जातीय वारसा टाकून देणें शक्य झालेले नाहीं. त्यांच्या पक्षनेत्यांमध्यें जातीयवृत्ति आहे कीं नाहीं हा मुद्दा जरी क्षणभर बाजूला सारला तरी त्यांच्या अनुयायांमध्यें आपणास काय दिसून येते ? वर्गीय लढ्याबरोबरच जातीय लढ्याची भाषा या पक्षियांच्या ओठावर दिसून येते. कम्युनिझम्‌बरोबर जातीयवादाचा झालेला हा विवाह चमत्कारिक वाटल्यावाचून राहणार नाहीं.

## सामाजिक भेदाचीं जळमटें कायम

या चळवळीचे सबंध राजकीय जीवन पाहिल्यानंतर एक गोष्ट जाणवल्यावाचून रहात नाहीं. या सत्यशोधक चळवळीची मूळची विशाल समतेची भूमिका या संघटनेला पचूं शकली नाहीं. कारण विषमतेचे मूर्तिमंत उदाहरण जी अस्पृश्यता ती नष्ट करण्यासाठीं या संघटनेनें आतांपर्यंत कांहींही केलें नाहीं म्हणजे ब्राह्मण आणि मराठे व तत्सम यांच्यामधील महदंतर या चळवळीनें जरूर कमी केले. परंतु मराठे व अस्पृश्य यांच्यांतील अनुल्लंघनीय अंतर मात्र तसेच कायम ठेवलें. पूर्वीचा ब्राह्मण ज्या तिरस्कारानें आणि क्षुद्रपणानें ब्राह्मणेतरांकडे पहात असायचा त्याच किंवा कांहींशा कमी क्षुद्रपणानें आजचा मराठा अस्पृश्यांकडे पहात असतो. या दोघांमधील भयंकर विषमता नष्ट करण्यासाठीं या संघटनेनें कांहींही केलें नाहीं आणि म्हणूनच ही चळवळ ही समतेची चळवळ असा दावा त्यांच्या धुरीणांना करतां येणार नाही. गेल्या ५०–६० वर्षांमध्यें गांवाबाहेरचा महारवाडा हा गांवाबाहेरच राहिला. तो गांवांत येऊं शकला नाहीं. अस्पृश्यांना सार्वजनिक विहीरीवर पाणी मिळूं शकले नाहीं. या चळवळीच्या पुढाऱ्यांनीं त्यांच्या मंदिर-प्रवेशासाठीं कसलाही प्रयत्न केला नाहीं. या समाजाच्या हातांत गेलीं २५ वर्षें महाराष्ट्रांतील सर्व स्थानिक स्वराज्यसंस्था होत्या. या काळामध्यें या वर्गानें किती अस्पृश्यांना नगरपालिकेचे वा लोकलबोर्डाचे अध्यक्ष केले आहे ? त्यांच्या शिक्षणासाठीं वा मुलाबाळांसाठीं किती

पीठिका असलेल्या या नेत्यांनीं या कॉंग्रेसांतर्गत पक्षांत साम्यवादी विचारांचा अवलंब केला. त्यांनीं त्या वेळीं प्रसिद्ध केलेल्या त्यांच्या कार्यक्रमाच्या मूलभूत तत्त्वामध्यें वर्गीय तत्त्वज्ञानाचें प्रतिबिंब स्वच्छ पडलेलें आहे. त्यांची मूलभूत तत्त्वें पुढील आहेत.

(१) देशांतील राजसत्ता ही श्रमजीवी वर्गाचे हातांत असलीं पाहिजे व त्याचेच हिताकडे पाहून त्या सत्तेचा उपयोग सतत झाला पाहिजे.

(२) उत्पादनाचीं साधनें ही मूठभर लोकांच्या मालकीची असली तर हे मूठभर कारखानदार व जमीनदार त्या साधनांचा उपयोग श्रमजीवी वर्गाच्या पिळवणुकींसाठींच करतात तरी हीं साधनें म्हणजे जमीन व कारखानें राष्ट्राच्या मालकीची केली पाहिजेत.

(३) कारखाने व जमीन यांच्याप्रमाणें वाहतुकीचीं सर्व साधनें राष्ट्राच्या मालकीचीं झालीं पाहिजेत. इ.

परंतु पुढें या कॉंग्रेस शेतकरी–कामगार संघाचे व कॉंग्रेस अग्रणींचें मतभेद विकोपास जाऊं लागले. तेथें देव विरुद्ध जेधे असा झगडा तीव्र स्वरूप धारण करूं लागला. कॉंग्रेसमध्यें दुसरा उपपक्ष राहूं शकत नाहीं असे त्यावेळीं सांगण्यांत आले. साहजिकच या पक्षाला या संस्थेतून बाहेर पडण्यावांचून मार्ग उरला नाहीं. पुढें २६ एप्रिल १९४८ रोजीं मुंबईला या पक्षनेत्यांची सभा झाली. तेथें सर्व जिल्ह्यांतून १५० कार्यकर्ते जमा झाले होते. त्या सभेंत कॉंग्रेसत्याग करून नवा पक्ष स्थापण्याचा निर्णय प्रचंड बहुमतानें घेण्यांत आला. हा नवा पक्ष म्हणजेच शेतकरी कामकरी पक्ष होय ! या पक्षानें पूर्वीची साम्यवादी विचारधारा पुढे चालविण्याचें निश्चित केलें. कॉंग्रेस त्यागाचीं कारणें देतांना श्री. शंकरराव मोरे-पक्षनेते यांनीं २८–४–१९४८ च्या पत्रकारांना दिलेल्या मुलाखतींत हा साम्यवादी दृष्टीकोन आग्रहानें मांडला होता. त्यांत त्यांनीं म्हटले होते, "कॉंग्रेस ही भांडवलशाही समाजरचनेची पाठीराखी आहे. कामगार किसानांच्या राज्यासाठीं त्यांची पिळवणूक करणारे भांडवलदार व सरंजामदार यांचा वर्गच नष्ट झाला पाहिजे. कॉंग्रेस ही भांडवलदार, जमीनदार व संस्थानिक यांनीं काबीज केलेली असल्यामुळें तिच्या हातीं संपूर्ण सत्ता गेली म्हणजे या वर्गाची

जणांनी खस्ता खाल्लेल्या आहेत ? उलट एखादा महर्षि विठ्ठल रामजी शिंदे यांच्यामध्यें निघालाच तर तांदळातला खडा काढून फेंकून द्यावा त्याप्रमाणें त्याला या चळवळीनें फेकूनच दिला नाहीं काय ? आणि असे असूनहि ही चळवळ समतेची चळवळ आहे असा कोणी दावा करूं लागला तर ती समतेची क्रूर थट्टा आरंभली आहे असेच वाटणार नाहीं काय ? स्पृश्य व अस्पृश्य यांच्यातील ही भेदाची तटबंदी तर यांनीं कायम ठेवलीच पण मराठ्या-मराठ्यामधील तरी भेदाची जळमटे या संघटनेला काढून टाकतां आलेली आहेत कां ? अद्यापही शहाण्णव कुळी मराठे इतर मराठ्यांकडे क्षूद्रतेच्या नजरेनें पहात नाहीं कां ? स्पृश्य समाजांतील ही उतरंड देखील या समतेच्या चळवळीला मोडून टाकतां आली नाहीं आणि म्हणूनच मोठ्या खेदानें असें म्हणणें प्राप्त आहे कीं या चळवळीला मूळची ज्योतिबांची विशाल समता-वादी प्रेरणा पेलूं शकली नाहीं. ज्योतिबा फुले किंवा महर्षि विठ्ठल रामजी शिंदे यांच्यासारखे सुधारक पचूं शकले नाहींत. या चळवळीनें समता प्रस्थापित केली नाहीं तर फक्त ब्राह्मण्याची तीव्र धार बोथट केलेली आहे. ब्राह्मण आणि मराठा व तत्सम ब्राह्मणेतर वर्ग यांच्यातील सामाजिक आणि धार्मिक विषमता नष्ट केली परंतु स्पृश्य आणि अस्पृश्य यांच्यातील अनुल्लंघनीय दरी मात्र त्यांनीं कायमच ठेवली आहे. या दृष्टीनें सत्यशोधक चळवळ आणि अस्पृश्य समाज यांचा साकल्यानें अभ्यास करणें फलदायी होईल.

# सत्यशोधक चळवळ आणि अस्पृश्य समाज

सत्यशोधक चळवळीचा अभ्यास करतांना साधारणपणें आतांपर्यन्त बहुतेकांचें लक्ष ब्राह्मण व स्पृश्य ब्राह्मणेतर समाज यांच्यावरच खिळलेले असते. त्या दृष्टीनें या विषयाची चर्चा आणि मूल्यमापन आतांपर्यन्त अने-कांनी केले. परंतु या चळवळीचें सर्वांगीण विवेचन करायचे असले तर स्पृश्य आणि अस्पृश्य समाजामधील देखील विषमता या चळवळीनें कितपत कमी केली याचा विचार झाला पाहिजे. थोडक्यांत म्हणजे या चळवळीचें यशाप-यश मोजतांना इतके दिवस ब्राह्मण व ब्राह्मणेतर यांच्यावर भर दिला होता.

यापुढच्या काळांत यामध्यें बदल करून ब्राह्मणेतर व अस्पृश्य समाज यांच्यावर अधिक भर देणें जरूर आहे. हें झालें नाहीं तर उद्यांच्या सामाजिक क्रांतीमध्यें उणेपणा राहील व समाजामधील संवादित्व देखील नाहींसें होईल.

इ. स. १८७३ पासून इ. १९५२ पर्यंतची सत्यशोधक चळवळ आणि अस्पृश्य वर्ग यांचा अभ्यास करण्याच्या दृष्टीनें तीन कालखंड पाडतां येतील. (१) इ. स. १८७३ ते १९२०—या काळामध्यें ज्योतिबांची मानव्याची विशाल प्रेरणा पुष्कळ प्रमाणांत या चळवळीमध्यें धगधगत होती. विशेषत: त्यांच्या मृत्यूनंतर शाहू महाराजांनीं या चळवळीमागील ही भूमिका चांगली पचवून त्यानुसार अस्पृश्यतेचा उच्छेद करण्याचा प्रयत्न केला होता. (२) दुसरा कालखंड इ. स. १९२० ते १९३०—या काळांत सत्यशोधक चळवळीच्या स्पृश्य नेत्यांनीं अस्पृश्यांना कधींच जवळ करण्याचे बुद्धिपुरस्सर आणि सांघिक प्रयत्न केले नाहींत. (३) तिसरा कालखंड इ. स. १९३० ते १९५२ पर्यंतचा मानतां येईल. या काळांत सत्यशोधक चळवळ विस्कळित झाली होती. शिवाय अस्पृश्यांची संघटना डॉ. आंबेडकर यांच्या प्रभावी नेतृत्वाखालीं जोमदारपणें पावलें टाकीत होती. या दृष्टीनें या तिसऱ्या कालखंडांत यासंबंधीं फारसा अभ्यास करतां येणार नाहीं.

## ज्योतिबांनीं अस्पृश्यतेवर प्रहार केले

इ. स. १८७३ सालीं ज्योतिरावांनीं आपला सत्यसमाज स्थापन केला होता. परंतु त्यापूर्वींच त्यांनीं या समाजाची वैचारिक पायाभरणी केली. विशेषत: अस्पृश्यतेचा कलंक धुवून काढून सर्व हिंदू समाजामध्यें सामाजिक समता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला होता. इ. स. १८५२ सालीं त्यांनीं प्रथम अस्पृश्य मानलेल्या महार मांगांच्या मुलांसाठीं पुण्यास शाळा स्थापन केली. हिंदुस्थानच्या संबंध इतिहासांत अलिकडच्या काळांत हिंदूंनीं अस्पृश्यासाठीं प्रयत्न केल्याचें हें पहिलें उदाहरण आहे. ज्योतिरावांच्या या कार्याचा उल्लेख त्या काळच्या ५ डिसेंबर १८५३ च्या ज्ञानप्रकाशच्या अंकांत मोठ्या गौरवानें केला आहे. त्याचप्रमाणें ४ सप्टेंबर १८५६ च्या ज्ञानप्रकाशच्या अंकांत देखील त्यांच्या अस्पृश्यांच्या शाळेची माहिती प्रसिद्ध झाली आहे. या प्रारंभीच्या काळामध्यें ज्योतिरावांनीं अस्पृश्यांबद्दल अत्यंत व्यापक अशी

मानवतावादी भूमिका स्वीकारली होती हें त्यांच्या अनेक चळवळींवरून स्वच्छ दिसून येतें. इ. स. १८६८ सालीं त्यांनीं अस्पृश्यांसाठीं आपल्या घरांतील पाण्याचा हौद अस्पृश्य बांधवासाठीं खुला केला होता.

खुद्द अस्पृश्यांना त्यांच्या हौदांतील पाणी घेण्यास संकोच वाटत असे. तेव्हां त्यांनीं स्वतः पुढें होऊन महार मांगाच्या भगिनींना पाणी भरून दिले होते. त्याचप्रमाणें इ. स. १८७३ सालीं ज्योतिरावांनीं अस्पृश्यतेसंबंधीं आपला जाहीरनामा प्रसिद्ध केला. ज्योतिरावांचें या जाहीरनाम्यामधील पाखंडी धैर्य, मूर्तिभंजकाचा आत्मविश्वास आणि मानव्यावरची गाढ श्रद्धा केवळ अनन्यसाधारण म्हटली पाहिजे. त्यांचा हा जाहीरनामा त्यांनीं प्रसिद्धीसाठीं वतमानपत्राकडे पाठविला त्यावेळीं तो प्रसिद्ध करण्याचें धैर्य देखील आमच्या पत्रपंडितांमध्यें शिल्लक नव्हतें. त्या जाहीरनाम्यांत ज्योतिराव फुले यांनीं लिहिलें होतें,

" जे शूद्र अगर कोणीहि आपल्या उत्पन्न कार्यास मानून, नीतीस अनुसरून व स्वच्छ उद्योगधंदा करण्याचा निश्चय करून त्याप्रमाणें आचरण करीत आहेत, अशी त्याजविषयी माझी खात्री झाल्याबरोबर मी त्यांस केवळ आपल्या कुटुंबांतील बांधवाप्रमाणें समजून त्यांजबरोबर अन्नव्यवहार करीन. मग ते कोणत्याहि देशांतील असोत."

ज्या सालीं ज्योतिरावांनीं सत्यशोधक चळवळ काढली त्याच वर्षी त्यांनीं हा जाहीरनामा प्रसिद्ध केला हें लक्षांत घेतल्यानंतर प्रारंभी अस्पृश्यासंबंधींचा या चळवळीचा किती उदार दृष्टीकोन होता हें लक्षांत येतें.

या त्यांच्या जाहीर निश्चयाप्रमाणें १८८४ सालीं हंटर कमिशनसमोर त्यांनीं जी साक्ष दिली होती त्यांत त्यांनीं आवर्जून सांगितले होते कीं शूद्र, अतिशूद्र यांचा उद्धार करावयाचा असेल तर तुम्ही सक्तीचें मोफत शिक्षण सुरू करा. ज्योतिरावांच्या वरील सर्व हालचाली सत्यशोधक चळवळीच्या दृष्टीनें अत्यंत महत्वाच्या असल्यानें त्यांना विशेष स्थान आहे. परंतु इ. स. १८९० सालीं ज्योतिबा वारले आणि त्यानंतर इ. स. १९०२ पर्यंत जवळ जवळ त्यांच्या उदात्त विचारांना सत्यशोधकांत त्यांना कोणी वारसदार मिळाला नाहीं.

## शाहू महाराजांची महनीय कामगिरी

छत्रपति शाहू महाराज यांनीं मात्र गादीवर आल्यानंतर थोड्याच अवधींत ज्योतिबांची विचारज्योत प्रज्वलित ठेवण्याचा दृढ निश्चय केल्यासारखें वाटलें. शाहू महाराजांनीं अधिकृतरीत्या कोल्हापूरला सत्यशोधक समाज स्थापन केला तो इ. स. १९१२ मध्यें! परंतु त्यापूर्वी त्यांनीं या विचाराची दीक्षा घेऊन त्यानुसार पावलें टाकावयास प्रारंभ केला होता. इ. स. १९०८ सालीं छत्रपति शाहू महाराजांची कन्या आक्कासाहेब यांचा कोल्हापूरला विवाह झाला. त्या प्रसंगीं महाराजांनीं अस्पृश्यांना अनेक ठिकाणीं कामास लावलें. हत्ती हाकण्यासाठीं माहूत, घोडेस्वार, क्षत्रियाप्रमाणें तलवारी गळयांत अडकवून मिरवणुकीबरोबर चालणारे लोक इ. ठिकाणीं महार मांग नेमलेच. परंतु पुढें लवकरच सार्वजनिक पाणवठ्यावर त्यांना पाणी भरण्यासहि मुभा दिली. त्यांच्या काळांत शिवराम जानबा कांबळे हा त्यांच्या पदरी नोकरीस होता. तो अस्पृश्य चळवळीचा मोठा धडाडीचा नेता असावा असें दिसतें. स्पृश्यांच्या पाणवठ्यावर जाऊन त्यानें राजाज्ञेप्रमाणें पाणी भरून आणलें. महाराजांच्या इतर हुजऱ्यांना आणि आश्रितांना याचा संताप आला त्यांनीं कांबळेवर चोरीचा आळ आणून बेदम मारलें. त्यांच्या पाठीवर रक्ताचे वळ उमटले. अंग सुजून व गांठी येऊन फुलून गेलें. महाराज त्यावेळीं दिल्लीस होते. २ दिवसांनीं ते परत आलें तेव्हां कांबळे यानें रक्तानें चिंब झालेला आपला अंगरखा व मारानें कातडे लोंबत असलेली आपली पाठ महाराजांना दाखविली. केवळ स्पृश्यांच्या पाणवठ्यावर पाणी भरल्यानें त्याला ही पाशवी शिक्षा मिळाल्याचें कळतांच महाराज संतापानें बेहोष झाले. त्यांनीं कांबळेला मारलेल्या इसमास तांतडीनें राजवाड्यांत आपल्या समक्ष बोलाविले आणि चाबकानें फोडून काढले. कांबळे यास त्यांनीं उत्तेजनासाठीं हवा तेवढा पैसा पुरविला. त्यानें पुढें कोल्हापूरच्या मध्यभागीं महाराजांच्या आश्रयाखालीं चहा कॉफीचें उपहार गृह चालविलें व हजारो हिंदूंच्या शेंकडो वर्षांच्या सनातन कल्पनेस हादरा दिला.

महाराजांच्या अशा प्रत्यक्ष उत्तेजनाशिवाय इ. स. १९१७ सालीं त्यांनीं कोल्हापूर संस्थानांतच अस्पृश्यांची परिषद भरली होती त्याचे अध्यक्ष-

स्थान स्वीकारले होते. व त्याचप्रमाणें १९२० सालीं त्यांच्या मार्गदर्शनाखालीं व अध्यक्षतेखालीं नागपूरला अखिल भारतीय बहिष्कृत समाज परिषद भरली होती. या दोन्ही ठिकाणीं त्यांनीं अत्यंत आवेशानें अस्पृश्यतेवर हल्ला केला होता. येथपर्यंत सत्यशोधक चळवळीनें स्पृश्य आणि अस्पृश्य यांच्यांतील सामाजिक भेद नष्ट करण्यासाठीं प्रयत्नांची कोशीस केली निदान त्या दिशेनें प्रयत्न केले असें म्हणता येईल.

## मानवी समतेचा विचार लुप्त होऊं लागला

परंतु इ. स. १९२० नंतर या ब्राह्मण ब्राह्मणेतर चळवळीमधील ज्योतिबाची मूळची मानवी समतेची भूमिका हळूहळू नष्ट होऊं लागली. या काळांत या चळवळीच्या पुढाऱ्यांनीं सत्यशोधकी तमाशे काढले होते. लोकमान्य टिळकांनीं पांढरपेशा समाजांत गणेशोत्सव सुरू करून जी राजकीय जागृति केली. तीच जागृति या तमाशानें बहुजनसमाजांत केली. या तमाशामधून हलगी तुणतुण्यावर जीं गाणीं म्हटलीं जात त्यामध्यें ब्राह्मणांवर व त्यांनीं निर्माण केलेल्या सामाजिक भेदावर अत्यंत तीव्र टीका केलेली असे. परंतु ब्राह्मण आणि ब्राह्मणेतर यांच्यांतील सामाजिक विषमतेवर त्या लावण्यांतून जे कडक हल्ले होते ते हल्ले मात्र स्पृश्य आणि अस्पृश्यांमधील सामाजिक विषमतेबद्दल अगदीं दिसेनासे होत.

इ. स. १९२० ते १९२४ च्या काळांत बाळू वाडगे हे कोल्हापूरचे सत्यशोधकी तमासगीर अत्यंत नाणावलेले होते. त्यांचे तमाशे पंढरपूरला प्रत्यक्ष ऐकलेले श्री. भीमराव नानाजी खरात ( आटपाडी जि॥ सातारा ) यांच्याशीं बोलतांना त्यांनीं सांगितले कीं महार मांग आणि मराठे यांच्यांतील विषमतेवर त्यांनीं कधीं व शब्द काढला नाहीं. त्याचप्रमाणें या सत्यशोधकी तमाशांत हलगी, ढोलकी, तुणतुणें वाजविण्यासाठीं बहुधा महार-मांग मंडळी असत. हे सुरकरी, हलगीवाले किंवा ढोलकरी हे इतर मराठा तमासगीर मंडळींबरोबर रहात, उतरत, खात पीत. कित्येक वेळीं मंदिरांतहि त्यांचा मुक्काम असे. परंतु या तमाशांत महार मांग लोक आहेत हें गांवांतील एकाहि इसमाला कधीं कळूं दिलें जात नसे. त्यांची जात कोणी विचारलीच तर ती मराठा म्हणून सांगितली जाई. त्यांच्या जातीबद्दल देखील एवढी

दक्षता घेतली जाई. ही माहिती श्री. रामचंद्र नारायण घोलप (घाडगे) य रहिमतपूरच्या गृहस्थांची प्रत्यक्ष मुलाखत घेतली असतां त्यानीं सांगितली. श्री. घोलप हे सत्यशोधकी तमाशांत सुरकरी म्हणून ३–४ वर्षे काम करीत होते. महाराची जात इतरांना कळली तर हाःहाकार माजेल या भीतीनें त्यांची जात गुप्त ठेवण्यासाठीं या सत्यशोधकी प्रचारकाची धडपड पाहिली म्हणजे त्या काळांत त्यांची अस्पृश्याबद्दल काय भूमिका होती हें स्वच्छ दिसतें.

## श्री. माधवराव बागल यांचा अनभव

या संबंधीचा याच काळांतील अनुभव श्री. माधवराव बागल यांनीं आपल्या नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या आत्मचरित्रांत दिला आहे. तोदेखील उद्बोधक आहे. ते म्हणतात, " अस्पृश्यता निवारण हाही पण माझा आवडीचा विषय पण लोकांना अस्पृश्यतेवर व्याख्यान देणें फारसे आवडावयाचें नाहीं. अस्पृश्यता निवारणाला लोक अनुकूल नसत. मी अस्पृश्यांची बाजू घेऊन वरच्या लोकांना पुष्कळ तुटून बोलत असे. एका गांवच्या पुढाऱ्यानें त्याबद्दल माझी सभेंतच कान उघाडणी केली. ते म्हणाले, आपण आमच्या तालुक्यांत दौरा काढीत आहांत याबद्दल आम्हाला फार आनंद वाटतो. पण तुम्ही अस्पृश्यतेवर जर बोलूं लागला तर तुम्हाला पुढें काम करणेंच जड जाईल. लोक तुम्हांला गांवांत जागाही देणार नाहींत. तरी तूर्त तो विषय सोडून बोलावे अशी आमची विनंति आहे." हे गृहस्थ सत्यशोधकच होते. "

( जीवनप्रवाह पान १०३ )

## महारांचीं पोरें उदम्याच्या मुलांबरोबर

त्याचप्रमाणें इ. स. १९२३ सक्तीचा प्राथमिक शिक्षणाचा कायदा पास होण्याचें घाटत होतें. त्याच काळांत या नव्या कायद्यानें महारा मांगांची पोरें पाटलाच्या आणि उदम्याच्या पोराशेजारीं मांडीला मांडी लावून बसणार या कल्पनेनें स्पृश्य हिंदूंत असंतोष माजला होता. रा. ब. जी. के. चितळे हे अहमदनगर जिल्हा बोर्डाचें व नगरपालिकेचे त्यावेळीं अध्यक्ष होते जिल्ह्यामध्यें ते दौऱ्यावर असतांना त्यांना अनेक ब्राह्मण आणि ब्राह्मणेतर लोकांनीं छेडलें. या काळांत ब्राह्मणेतर पुढाऱ्यांनीं, अस्पृश्यांनीं देखील सामाजिक समता लागूं व्हावी अशा तऱ्हेचें म्हटल्याचें दिसत नाहीं.

४ ऑगष्ट १९२३ ला श्री. एस्. के. बोळे यांनीं ठराव मांडला कीं सार्वजनिक विहिरी, नळ धर्मशाळा त्याचप्रमाणें सार्वजनिक शाळा, कोर्ट, ऑफीसें व दवाखाने अस्पृश्यांना खुलीं असावीत." हा ठराव त्याच दिवशीं पास झाला. या ठरावावर बोलतांना एक सदस्य म्हणाले, या ठरावामुळें स्पृश्यांचीं मनें दुखावलीं जाऊन त्याचे परिणाम अनिष्ट होतील असें सांगितलें जातें. परंतु ब्राह्मणेतर पुढाऱ्यांनीं तरी असा विचार करूं नये. कारण ते ब्राह्मणाकडून ज्या सामाजिक समतेची अपेक्षा बाळगतात, तीच ते खालच्या वर्गाला मात्र देण्यास कां कूं करतात. हा विरोधाभास जाणवल्यावांचून रहात नाहीं. ! मुंबई विधान सभेंतील हे त्यावेळचें भाषण अत्यंत मार्मिक आणि सडेतोड आहे. हा ठराव पास झाल्यानंतर ११ सप्टेंबर १९२३ ला सरकारी गॅझेट मध्यें ठराव प्रसिद्ध होऊन त्यानुसार सरकारी आज्ञा सर्व लोकल बोर्ड, नगरपालिका यांना गेल्या. या ठरावाचें उद्देश जरी मोठे उच्च आणि स्तुत्य होते तरी त्याची अंमल बजावणी मात्र कोठेहि फारशी झाली नाहीं. त्यानंतर ६ ऑगस्ट १९२६ ला मुंबई कौन्सिलनें दुसरा ठराव पास केला आणि सांगितलें कीं या कायद्याची अंमलबजावणी करण्यास जी स्थानिक संस्था कसूर करील तिला सरकारी मदत मिळणें बंद होईल हाहि कायदा दप्तरीं दाखल झाला आणि तो देखील बरेंच दिवस प्रत्यक्षांत आलाच नाहीं.

सत्यशोधकी तमाशामधील प्रचाराचीं गाणीं व अस्पृश्य तमासगीरांना त्यांच्या मेळाव्यांत मिळणारी वागणूक, त्याचप्रमाणें सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाबद्दल स्पृश्य हिंदूंत माजलेला प्रक्षोभ व त्याबद्दल या नेत्यांची मुग्धता यावरून त्यांच्या धोरणावर प्रकाश पडतोच परंतु त्याच बरोबर त्या काळांतील सार्वजनिक पाणवठ्यावरील अस्पृश्यांचा शिरकाव व मंदिर प्रवेश यावेळीं सर्व ब्राह्मणेतर पुढाऱ्यांच्या विचाराची चांगली कसोटी लागली.

## अस्पृश्यांना मंदिर प्रवेशास मज्जाव

याचें प्रत्यंतर महाडच्या प्रकरणावरून चांगले अनुभवास येते. २०मार्च १९२७ ला महाडला डॉ. आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखालीं अस्पृश्यांची परिषद भरली होती. सरकारनें इ. स. १९२३ व इ. स. १९२६ च्या काय-

ह्यानें अस्पृश्य वर्गाला सार्वजनिक विहिरींवर पाणी भरण्यास मुभा दिली होती. हा सरकारी कायदा प्रत्यक्षांत आणण्याचें या परिषदेनें ठरविलें. त्याच-प्रमाणें त्यांची परिषद संपल्यानंतर डॉ. आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखालीं सर्व हरिजन बंधू गांवांतील मध्यवर्ति ठिकाणीं असलेल्या विहीरीकडे पाणी पिण्यास निघाले. परंतु त्याबरोबर सर्व ब्राह्मण व ब्राह्मणेतरांत प्रक्षोभ निर्माण झाला. त्याचा परिस्फोट दंग्यांत झाला. कित्येक हरिजनांना मार बसला. पुढें दंगा केल्याबद्दल न्यायालयासमोर ५ स्पृश्यांना ४ म. स. म. ची शिक्षा झाली. परंतु न्यायालयीन निवाड्यापेक्षां गांवातील पंचांचा निवाडा अधिक मोलाचा आणि दूरगामी असतो. या दृष्टीनें त्या भागांतील ब्राह्मणेतर पुढाऱ्यांनीं अस्पृश्य बांधवांच्या या चळवळीस बिनशर्त पाठिंबा देणें जरूर होते. विहीरीवरील या पाणी प्रकरणाप्रमाणें मंदिर प्रवेशाबद्दलहि ब्राह्मणेतर समाज व शेंकडो वर्षे सामाजिक अन्यायाखालीं दडपले गेलेले अस्पृश्य बांधव यांच्यांत साध्या माणुसकीच्या मूलभूत हक्कासाठीं रणे माजलीं आहेत. पुण्याच्या पर्वती देवळांतील अस्पृश्यांचा प्रवेश, नाशिकचा श्रीरामाच्या देवळां-तील त्यांचा प्रवेश या वेळीं दोन्ही वर्गांत कुरुक्षेत्रें निर्माण झालीं आहेत. ब्राह्मणाकडून सामाजिक समतेची अपेक्षा बाळगणाऱ्या ब्राह्मणेतर वर्गाला हाच हक्क पददलित वर्गाला नाकारण्याचा काय नैतिक अधिकार होता ?

त्यामुळेंच अस्पृश्यांनीं याहि काळांत ब्राह्मण व ब्राह्मणेतर यांच्यापासून संरक्षणासाठीं स्वतः राखीव जागा आणि स्वतंत्र मतदार संघ यांच्या मागण्या केल्या. इ. स. १९१७ सालीं शिवराम जानबा कांबळे यांनीं डॉ. मॅन साहेबा-मार्फत इंग्लंडच्या पार्लमेंटांत या राखीव जागांची मागणी केली होतीच परंतु इ. स. १९२८ सालीं सायमन कमिशन समोर साक्ष देतांना डॉ. आंबेडकर यांनीं याच मागणीचा पुनरुच्चार केला होता.

## अस्पृश्यता निवारण बिलास ब्राह्मणेतरांचा विरोध

ब्राह्मणेतर चळवळीचे अग्रणी ब्राह्मणापासून ज्या मानवी समतेची अपेक्षा करीत होते, ती समता ते खालीं अस्पृश्यांना नाकारीत होते हे आतां पर्यंत दिसून आले. परंतु त्याबरोबर आणखी एका ठरावानें ही गोष्ट स्पष्ट झाली.

११ सप्टेंबर १९३४ रोजीं मुंबई कौन्सिलमध्यें भारतसेवक श्री. रघुनाथराव बखले यांनीं अस्पृश्यता निवारक बिल मांडलें होतें. इ. स. १९२३ सालीं सार्वजनिक विहीरीवर अगर पाणवठ्यावर अस्पृश्यांना पाणी भरण्याचा पूर्ण हक्क आहे हें कायद्यानें जाहीर केलें होतें. त्या कायद्याला वरूनच आणखी एक पाऊल पुढें टाकण्याचा या कायद्याचा इरादा होता. त्याचा मुख्य उद्देश असा होता कीं, ज्या सार्वजनिक सुखसोयींच्या ठिकाणीं जाण्याला हरिजनांना हक्क आहे, त्या ठिकाणीं जाण्याला त्यांना कोणी ते केवळ हरिजन आहेत या मुद्यावर अडथळा केला तसा अडथळा करणें गुन्हा समजला जावा. वास्तविक या मागणींत न्याय आणि कायदा यापैकीं कोणत्याहि दृष्टीनें आक्षेपार्ह असें काय होतें? सरकारनें ज्या सार्वजनिक ठिकाणीं हरिजनांचा प्रवेशाचा हक्क मान्य केला होता अशा ठिकाणापुरता त्यांचा कायदेशीर हक्क सुरक्षित राखण्यासाठीं हें बिल पुढें आणलें होतें. परंतु या ठरावाला देखील त्या काळांत कायदेमंडळांतील ब्राह्मणेतर सभासदांचा एकमुखी पाठिंबा मिळाला नाहीं. या बिलाला पंढरपूरचे श्री. बाळासाहेब मोरे वकील यांनीं देखील विरोध केला. ते म्हणाले, "हें बिल मंजूर झाल्यावर खेड्यांत शांतताभंग होईल. खेड्यांतील परिस्थिति भिन्न असतें हें लक्षांत ठेवलें पाहिजे. पुण्या–मुंबईत स्थिति वेगळी असते. येथें आम्ही गव्हर्मेंट हौसवर अगर कार्यकारी कौन्सिलच्या सभासदाकडे खान्यास जातो. तेथें मुसलमान व अस्पृश्य वाढपीं असतात. अशा ठिकाणास रा. सा. कुलकर्णी यांनीं देखील खाना खाल्ला आहे. पण आळंदीला गेल्यावर तेथील परिस्थिति भिन्न असल्यामुळें त्यांना सोवळें पाळावें लागतें. खेड्यांतील सर्व लोकांच्या विरोधामुळें हें बिल पास करूं नये असें माझें मत आहे" श्री. मोरे यांच्याप्रमाणें रा. ब. भाऊसाहेब चितळे यांनीदेखील त्याला विरोध केला. ते म्हणाले, "खेड्यांतील लोकांचें सध्याचें जीवन लक्षांत घेतल्यास हें बिल अत्यंत खोडसाळ असून तें पास होऊं देता कामा नये. हें बिल पास झाल्यानें सध्यांचें विस्कळीत झालेल्या खेड्यांतील जीवन अधिक बिघडेल, खेड्यांतील सलोख्याच्या संबंधांत असल्या कायद्यानें बिघाड येईल. या बिलानें डोकीं फुटण्याचे प्रसंग येतील." (ज्ञानप्रकाश १२ सप्टेंबर

१९३४ ) ब्राह्मण व ब्राह्मणेतर सभासद एक होऊन त्यांनीं या बिलाला विरोध केला.

श्री. बखले यांनीं मांडलेलें हरिजन निबंध निवारक बिल १३ विरुद्ध ३३ मतांनीं फेटाळून लावण्यांत आलें या बिलाचें पहिलें वाचन मंजूर करून ते लोकमत प्रदर्शनासाठीं प्रसिद्ध करण्याची तरी ब्राह्मणेतर पुढाऱ्यांनीं खटपट करायला पाहिजे होती. परंतु ते देखील त्यांनीं केलें नाहीं.

ज्योतिबांनीं अंगिकारलेली सामाजिक समतेची मूळ भूमिका इ. स. १९२० च्या पुढें या चळवळीमधून आस्ते आस्ते लुप्त होऊं लागली हें सत्य आहे. या चळवळीला या काळांमध्यें असें वळण कां लागले याची देखील समीक्षा आतां सर्वांनीं तटस्थ वृत्तीनें केली पाहिजे. माझ्या दृष्टीनें याला खालील कारणें प्रामुख्यानें जबाबदार होतीं.

## अस्पृश्यांबद्दल अनुदार दृष्टिकोण कां ?

जाति व्यवस्था या देशामध्यें गेलीं अनेक शतकें हिंदु मनावर निरंकुश सत्ता गाजवीत आहे. ही व्यवस्था या देशामध्यें केव्हां आणि कशी रुजली याबद्दल विद्वानांमध्यें मतभद आहेत. एमील सेनाँ ( **Emile Senart** ) डॉ. घुर्ये, हटन, डॉ. आंबेडकर यांनीं यासंबंधीं केलेल्या विवेचनांत एकवाक्यता आढळत नाहीं. तथापि एवढें मात्र सर्वमान्य मत आहे कीं ही जाति व्यवस्था ( कीं अव्यवस्था ) या देशामध्यें फार प्राचीन काळापासून मूळ धरून आहे. इ. स. पूर्वी ४–५ व्या शतकांत जैन आणि बौद्ध धर्मीयांनीं जन्माधिष्ठित उच्चनीचतेवर कडाडून हल्ले केले. परंतु दुर्दैवानें मानवी समतेचे हे नवे विचार कालांतरानें येथें निष्प्रभ झाले आणि अनेक शतकें जन्मावरून श्रेष्ठ कनिष्ठता ठरविणारी अत्यंत प्रतिगामी जातिव्यवस्था येथें अप्रतिहतपणें वावरत राहिली. मध्ययुगामध्यें तर या व्यवस्थेला अतिशय जड स्वरूप प्राप्त झालें. अलिकडच्या काळांत देखील म. फुले यांनीं कांहीं वर्षे या घृणास्पद सामाजिक विषमतेवर कठोर हल्ले केले होतें. मात्र त्यांच्या या टीकेला लाभावें असें सातत्य लाभलें नाहीं. साहजिकच जातिव्यवस्थेमधील श्रेष्ठ कनिष्ठतेच्या संस्कारांची जनमनावर जी शेकडों वर्षें पुढें पुढें चढत आलीं होतीं ती कायमच राहिली. अनेक वर्षांचें हे हिंदु मनांवरील विचाराचे थर

पहिल्याच शस्त्रक्रियेंत नष्ट होणें खास सोपें नव्हतें. त्यांतून अंत्यज तर स्पृष्ट समाजापासून फारच दूरचे ! त्यामुळें अस्पृश्यांबद्दलचा स्पृश्य समाजाचा अनुदार दृष्टिकोन लवकर सुधारणें कठीण होतें. इ. स. १९२० च्या नंतरची सत्यशोधक चळवळ सामाजिक गुलामगिरीची ही घातक कल्पना लोकमनांतून संपूर्णपणें निपटून काढू शकली नाहीं. याला कांहीं प्रमाणामध्यें जातिव्यवस्थेचा हा शेंकडो वर्षांचा इतिहासहि कारणीभूत आहे.

परंतु हा इतिहास लक्षांत घेऊन सुद्धां असे म्हणावेसे वाटतें कीं सवर्ण हिंदु व शूद्र समाज यांच्यांतील सामाजिक भेद नष्ट करण्यासाठीं या नेत्यांनीं कांही प्रयत्नच केले नाहींत. दोष जातो तो त्यांच्या विफल प्रयत्नांकडे नव्हे तर प्रयत्नांचा हेतूच त्यांच्या मनांत नव्हता या गोष्टीकडे ! या दृष्टीनें या घटनेला माझ्या मतें फक्त दोन कारणें मुख्यतः जबाबदार होतीं.

( १ ) राजकीय सत्ता हस्तगत करण्याच्या कार्यक्रमामुळें सामाजिक क्रांति उखडली जाणें अपरिहार्य होतें.

( २ ) इ. स. १९२० नंतर चळवळीचें नेतृत्व ब्राह्मणेतर समाजांतील उच्च वर्गाकडे गेल्यामुळें त्याला सामाजिक समतेचा पुरोगामी विचार पेलणें कठीण होते.

## सत्तेचें राजकारण क्रांतिकारक सामाजिक कार्यक्रम निष्प्रभ करते

इ. स. १९२०–२१ नंतर प्रांतांतील सत्ता काबीज करणें हें या चळवळीचें मुख्य कार्यक्षेत्र ठरलें. निवडणुकीच्या आखाड्यांत हा समाज उतरला तेव्हांच त्यांतील क्रांतिकारक सामाजिक आशय उपेक्षिला जाणें स्वाभाविक होते. निवडणुकीमधील सत्तेचें राजकारण आणि मूर्तिभंजक सामाजिक कार्यक्रम हे सहसा एकत्र नांदू शकत नाहींत. कारण एकदां सत्ता काबीज करायची ठरविली म्हणजे मग मतदारांच्या आवडीनिवडीचा आणि त्यांच्या मानसिक प्रवृत्तीचा विचार अधिक करावा लागतो. त्यांना रुचेल आणि पचेल अशा गोष्टी बोलून त्यांना संतुष्ट ठेवणें भाग असते, त्यांच्या सनातन कल्पनांना हादरे देणारे विचार बोलून दाखविणें म्हणजे त्यांचा रोष ओढवून घेणें होय ! सत्तेच्या राजकारणाच्या दृष्टीनें हा मार्ग अव्यवहार्य ठरत असतो.

सामान्य जनतेच्या आवडत्या परंतु प्रतिगामी विचारांवर हल्ले करून सामाजिक प्रगति साधण्यापेक्षां त्यांच्या रूढ कल्पनांना सुखवन, प्रसंगीं खतपाणी घालून सत्ता काबीज करणें राजकारणी पुरुषाला अधिक सोयीचे आणि विलोभनीय वाटत असते. या दृष्टीनें अस्पृश्यांबद्दलच्या सर्व स्पृश्य समाजाच्या कल्पना लक्षांत घेतां ब्राह्मणेतर पुढाऱ्यांनीं अस्पृश्यतेबद्दलचा व्यापक दृष्टीकोण टाकून देणें साहजिक होते. वैयक्तिकरित्या शूद्र वर्गाबद्दल उदात्त भूमिका घेणाऱ्या नेत्यांनीं देखील बहुजन समाजामध्यें गेल्यानंतर या प्रश्नावर पूर्ण मौन पाळलें होतें. राजकारणाच्या वेदीवर सामाजिक क्रांतीचा बळी जाणें त्यामुळें अगदी स्वाभाविक वाटतें. मतदारांच्या मर्जीवर ज्याचें सिंहासन स्थिरावले आहे असा माणूस रुचेल ते बोलणार आणि पटेल ते करणार. हा सुधारकी बाणा घेऊं शकत नाहीं. याचेंच प्रत्यंतर ब्राह्मणेतर चळवळीच्या या कालखंडांत सर्वांना आले.

## नेंतृत्व उच्च ब्राह्मणेतर वर्गाकडे

अस्पृश्यांबद्दलच्या या चळवळीच्या नेत्यांच्या भूमिकेला राजकारण जसे कारणीभूत झाले तसेच या चळवळीचे नेतृत्व उच्च मराठा वर्गाकडे गेले ही घटना देखील अंशतः कारणीभूत झाली. आर्थिक दृष्ट्या सुस्थिर असलेला आणि घराण्याच्या दृष्टीनें समाजांत प्रतिष्ठा पावलेला उच्च मराठा वर्ग अस्पृश्याबद्दल सामाजिक समतेची भूमिका घेऊं शकत नव्हता. या वर्गातील सर्वच व्यक्ति वैचारिक दृष्ट्या समतेच्या भूमिकेवर येऊं शकत नव्हत्या असे दूरान्वयानें सुद्धां मला ध्वनित करावयाचे नाहीं. परंतु ग्रामीण अर्थव्यवस्थेंत मानाचें स्थान असलेला आणि सामाजिक विषमतेचें शल्य वरच्या ब्राह्मणाशिवाय इतरत्र कुठेंहि न बोचत असलेला हा उच्च वर्ग सामाजिक समतेचा विचार लवकर स्वीकारणें कठीण होतें. त्या वर्गातील व्यक्तींचा हा दोष नाहीं. पुष्कळ प्रमाणामध्यें हा मानवी स्वभाव आहे. परंतु त्यामुळेंच इ स. १९२० च्या पुढें या चळवळींतील व्यापक सामाजिक आशय अस्तंगत पावूं लागला.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
प्र. क्र. ८५८६

## महार हे अस्पृश्यांतील ब्राह्मणच

दुर्दैवानें जाति व्यवस्थेचें वीष समाजाच्या रोमरोमामध्यें फार खोलवर पसरलें आहे. कारण ब्राह्मण व ब्राह्मणेतर यांच्या संयुक्त जाचाखालीं चिरडल्या गेलेल्या अस्पृश्य समाजांत तरी कुठें सामाजिक समता दृष्टीस पडते ? त्यांच्यांतीलहि महार हा स्वतःला उच्च समजून मांगाला क्षुद्र मानतो ना ? त्यांच्याशीं बेटी व्यवहार करण्यास प्राणपणानें विरोध करतो ना ? इतकेच नव्हे तर आपल्या मंदिरांत त्यांना येण्यास देखील मज्जाव करतोच ना ? महार हा वर्ग देखील अस्पृश्यामध्यें स्वतःला ब्राह्मणच मानतो ना ? मग महार इतर मांगांना व धेडांना जी वागणूक देतात तीच जर त्यांना वरच्या वर्गाकडून मिळाली तर त्याबद्दल कुरकूर करण्याचा त्यांना काय नैतिक अधिकार आहे ? परंतु हा दोष त्यांचा नाहीं. जाति व्यवस्थेचें वीष या समाज पुरुषाच्या शरीरांत खोलवर गेल्याचेंच हें चिन्ह आहे. याबद्दल त्या काळांतील ब्राह्मणेतर पुढाऱ्यांना देखील सर्वस्वी दोषी धरण्यांत अर्थ नाहीं, परंतु त्यामुळें केवळ आपण वस्तुस्थितीकडे देखील पाठ फिरवूं शकत नाहीं.

इ. स. १९३० ते १९४८ च्या कालखंडांत ही चळवळ कॉंग्रेसमध्यें सामील झाली होती. त्यामुळें या काळांत ब्राह्मणेतर स्पृश्य व अस्पृश्य यांच्यांतील महदंतर कमी करण्याच्या त्यांच्या प्रयत्नाबद्दल कांहींच बोलतां येणार नाहीं. इ. स. १९४८ नंतर या चळवळीला साम्यवादी बैठक मिळाली तरी आर्थिक कार्यक्रमाबरोबर सामाजिक समतेच्या मूलगामी विचारावर त्यांनीं हवा तेवढा भर दिल्याचें दिसत नाहीं. त्यामुळें इ. स. १९२० च्या पूर्वीची ज्योतिरावांची मूळची अत्यंत व्यापक आणि मानवी समतेची भूमिका या चळवळीला मानवली नाहीं असेंच मोठ्या खेदानें म्हणावें लागेल. यामुळें डॉ. आंबेडकर यांनीं याबाबत इ. स. १९५० सालीं या चळवळीबद्दल अत्यंत त्वेषानें उद्गार काढले कीं, " ब्राह्मणेतर वर्गानें महात्मा ज्योतिबा फुले यांची स्मृति सर्वस्वी पुरून टाकली आहे असे नसून या वर्गानें त्यांच्या तत्वज्ञानास निर्लज्जपणें दगा दिला आहे," त्याचप्रमाणें ते पुढें म्हणतात, " सत्यशोधक समाजाचें कार्य अखिल भारतांत पसरलें पाहिजे. हिंदुस्थानला स्वातंत्र्य

लाभलें पण या स्वातंत्र्याचा खरा फायदा जर हिंदी जनतेला व्हावयाचा असेल तर या जनतेच्या मानेवर बसलेलें भोळ्या समजुतीचें जोखड झुगारून दिलें पाहिजे व हें महत्त्वाचें काम सत्यशोधक समाजानें करणें अगत्याचें आहे." (१६ व्या सत्यशोधक समाज परिषदेला डॉ. आंबेडकर यांचा संदेश 'सत्यशोधक' मासिक–डिसेंबर १९५० पा. १ लें )

## म. फुले यांच्या कार्याचें सम्यक् दर्शन

म. फुले यांच्या जीवन कार्याचें व वैचारिक अधिष्ठानाचें मूल्यमापन आतापर्यन्त चार मानदंड लावून झालें १) राष्ट्रवाद २) धर्मवाद ३) साम्यवाद ४) सुधारणावाद.

म. फुल्यांच्या विचारांना आणि आचाराला राष्ट्रवादाचा मानदंड लावून त्यांचें मूल्यमापन करण्याचा प्रयत्न आजवर महाराष्ट्रांत अनेक वेळां झाला. त्यामध्यें विष्णुशास्त्री चिपळूणकर, लो. टिळक यांचा तर अंतर्भाव होतोच परंतु त्याशिवाय इतर पुष्कळ टीकाकारांचा समावेश होतो. प्रभाकर पाध्ये व टिकेकर यांच्या 'आजकालचा महाराष्ट्रा'मध्यें हाच दृष्टीकोण व्यक्त झाला आहे. डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे यांच्या नुकत्याच प्रकाशित झालेल्या भारतीय लोकसत्तेमध्यें राष्ट्रवादी विचाराचा प्रभाव ठळकपणें नजरेंत भरतो. साम्यवादी विचाराचे अनुयायी नवजीवनवाले यांनीं देखील हाच निकष आपल्या समीक्षेमध्यें वापरला आहे. उदा. ते आपल्या लोकसखा या पत्रांत म्हणतात, "महात्मा फुल्यांच्या सत्यशोधक विचारसरणीचा आधार घेऊन उदय पावलेल्या ब्राह्मणेतर पक्षानें ब्रिटिश सत्तेच्या मुळावर घाव घालण्याची चळवळ उभारण्यापेक्षां ब्रिटिश राज्यकर्त्यांनीं देऊं केलेल्या नोकऱ्यांमध्यें आपला वांटा अधिक असावा अशी भूमिका घेतली. याचें मूळ ज्याप्रमाणें सत्यशोधक चळवळीच्या पुढारीपणाच्या वर्गीय आशयामध्यें आहे, त्याचप्रमाणें सत्यशोधक विचारसरणींतील मौलिक उणीवामध्यें आहे. साम्राज्यशाहीचें देशावरील सर्वांगीण वर्चस्वही आपल्या प्रगतीच्या मार्गांतील पहिली धोंड आहे या गोष्टीवर सत्यशोधक विचारसरणीनें कधींच भर दिला नाहीं" (लोकसखा ता. १६–७–५०) नवजीवन संघटनेच्या नेत्याप्रमाणें श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांच्या मनावर देखील राष्ट्रवादाची पगड फार मोठी आहे

असें वाटते. कांहीं महिन्यापूर्वीं प्रकाशित झालेल्या ' चिपळूणकर काल आणि कर्तृत्व ' या आपल्या ग्रंथांत त्यांनीं या आपल्या विचाराचा प्रपंच केला आहे. ते ज्योतिबांबद्दल म्हणतात.

" 'गुलामगिरीं'त आणि सार्वजनिक ' सत्यधर्मांत ' ज्या फुल्यांनीं वेद पुराणांचा उपसा केला आणि सगळ्या जगाच्या इतिहासाची झडती घेतली त्यांना इंग्रज, युरोपियन आणि अमेरिकन यांच्या अखिल मानव जातीचें आणि विशेषत: सर्व श्वेतेतर लोकसमाजाचें शोषण आणि निर्मूलन करणाऱ्या आसुरी साम्राज्यवादाचा अणुमात्रसुद्धां बोध होऊं नये, हा केवढा चमत्कार! लोकहितवादी आणि रानडे यांनींहि पारतंत्र्याला ईश्वरी कृपाप्रसाद म्हणण्याचा घृणास्पद राष्ट्रीय प्रमाद केला, ही गोष्ट खरी. पण, त्याचबरोबर ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या शोषक भेदनीतीचे वाभाडे काढावयालाहि ते चुकले नाहींत, पण फुल्यांचें डोळे मात्र कधींच उघडले नाहींत. त्यांच्या या एकांगी विकृत जातीय प्रचाराचा आणि पारतंत्र्याच्या राष्ट्रघातकी पुरस्काराचा दुष्परिणाम महाराष्ट्राच्या जीवनावर किती भयंकर झाला, याची साक्ष इतिहास देतच आहे." ( चिपळूणकर, काल आणि कर्तृत्व पा. नं. २०६ )

वरील अभ्यासकांप्रमाणें इतर अनेक राष्ट्रवादी टीकाकारांनीं ज्योतिबांचे व त्यांच्या सत्यशोधक चळवळीचे मूल्यमापन 'इंग्रजधार्जिणी' 'साम्राज्यशाहीचे हस्तक 'राष्ट्रघातकी' या तऱ्हेनें केलें आहे.

## धर्मवादी विचारशाखा

राष्ट्रवादाप्रमाणें धर्मवादाचा मानदंड हातांत घेऊन कांहीं समीक्षकां नीं त्यांच्या कार्याचें मोजमाप करण्याचा प्रयत्न केला. यामध्यें विष्णुशास्त्री चिपळूणकर व लो. टिळक यांचा प्रामुख्यानें उल्लेख करावा लागेल. धार्मिक दृष्ट्या ज्योतिबा हे हिंदु धर्मावर अत्यंत कडवट आणि कठोर हल्ले करीत व कांहीं प्रसंगीं ख्रिस्ती धर्मांतील उदात्त तत्वांचा गौरवपर शब्दांत उल्लेख करीत. यामुळें ते 'ख्रिस्ताळलेले' होते. 'हिंदु धर्माचे शत्रू' होतें असा त्यांच्याबद्दलचा सर्वत्र समज होता. चिपळूणकर, टिळक यांच्या लिखाणांतून या तऱ्हेचें विवेचन अनेक ठिकाणीं आले आहे. परंतु या विद्वानांप्रमाणें नगरपालि-

केंतील सन्मान्य सभासदामध्य देखील हा दृष्टिकोन व्यक्त झाला होता. तो पहाणें अत्यंत उद्बोधक आहे. पंडितांच्याप्रमाणें सर्वसामान्य माणसें त्यांच्या कार्याचें मूल्यमापन कसें करीत होती हें पाहण्यासाठीं पुणें नगरपालिकेंतील 'टिळक पुतळ्या'च्या वेळचा वाद पाहणें बोधप्रद ठरेल. इ. स. १९२५ सालीं (रे मार्केटसमोर–आतांच्या फुले मंडईसमोर) पुतळा कोणाचा उभारावयाचा, टिळकांचा कीं फुल्यांचा! असा हा वाद होता.त्यावेळीं फुल्यांच्यासंबंधीं व्यक्त झालेली मतें खालीलप्रमाणें होती. हीं मतें त्या काळांतील विशिष्ट विचार शाखा दर्शविणारी आहेत. या ऐतिहासिक दृष्टीनेंच केवळ त्यांच्याकडे पहावे. व्यक्तींचे उल्लेख गौण आहेत. म्हणून ते इथें दिलेलें नाहींत. ज्योतिबांबद्दल नगरपालिकेच्या सभेंत त्यावेळीं व्यक्त झालेली मते पुढीलप्रमाणें, "जोतिबा फुल्यांचेसंबंधी निश्चित माहिती नाहीं. तथापि ते एक विशिष्ट पंथाचे पुरस्कर्ते होते एवढे सिद्ध होते. त्यांना कोणी सत्यशोधक म्हणतात, तर कोणी ख्रिस्त सेवक म्हणतात." "आम्हांस राजद्रोही माणसें चालतील पण धर्मद्रोही व देशद्रोही माणसें आम्हास खपणार नाहींत." "इंग्रजांनीं आपल्या राज्यप्रसाराबरोबर धर्म प्रचार करण्याचें ध्येय ठेवलें होतें व आहे. त्याकरितां त्यांनीं मिशनरी लोकांची नेमणूक केली. त्यांनी मोठमोठ्या गांवांत वस्ती केली पण धर्मप्रसाराचें कार्यास त्यांना हिंदूकडून अडथळा होऊं लागला तेव्हां त्यांनीं कावा करून हिंदूंतीलच एक माणूस गांठला व तो म्हणजे ज्योतिराव फुले हा होय....सर्व ठिकाणीं जाणारा व बोलणारा असाच ज्योतिबा होता. म्हणून त्याला मिशनरी लोकांनीं आपल्या हाताशीं धरला व आपलीं मतें प्रसृत केलीं."

## साम्यवादी मानदंड

राष्ट्रवाद आणि धर्मवाद यांच्याप्रमाणें साम्यवादाचा मानदंड वापरून कांहीं समीक्षक ज्योतिबा फुले व सत्यशोधक चळवळ यांचें ऐतिहासिक कार्य ठरविण्याचा प्रयत्न करतात. यामध्यें मुख्यतः खासदार शंकरराव मोरे यांचा प्रामुख्यानें उल्लेख करावा लागेल. सत्यशोधक चळवळ ही वर्गीय चळवळ होती हें विशद करतांना ते म्हणतात," 'ब्राह्मण' जात आहे त्याचप्रमाणें वर्गहि आहे. धर्म, सत्ता व संपत्ति यांची मक्तेदारी या वर्गाचे हातांत गेली म्हणून

१०५९३

दलित अशा ब्राह्मणेतर जातींनीं त्यांच्याविरुद्ध 'वर्गीय' चळवळ केली 'ब्राह्मणेतर चळवळ ही वर्गीय चळवळ होती. ती चळवळ भिक्षुकशाही व भांडवलशाही यांच्या विरुद्ध होती. या चळवळीचें हें वर्गीय स्वरूप मी अनेक लेखांत आतांपर्यंत दाखविले आहे." ( नवजीवन संघटनेचें गौडबंगाल पा. नं. १७०–१७१ ) सत्यशोधक चळवळीचा वर्गीय आशय श्री. शंकरराव मोरे यांनीं व्यक्त केला त्याचप्रमाणें ज्योतिराव हे साम्यवादी विचारांच्या फार निकट उभे होते असे त्यांनीं त्याच पुस्तकांत मांडले आहे. ते म्हणतात,

" ब्राह्मणेतर जातींना विषमतेवर आधारलेल्या, शिक्षणबंदी करणाऱ्या, इतर जातींना पिळून काढणाऱ्या क्रूर व राक्षसी धर्माच्या तावडीतून सोडविण्याचा क्रांतिकारक प्रयत्न करीत होते. धर्मानें आपली गुलामगिरी लादून ब्राह्मणेतरांचीं मनेंच मारलीं आहेत, धर्माची अफू चारून त्यांना बेभान केले आहे. तरी ही गुलामगिरी, ही धर्माची अफूची धुंदी कमी करणें हें आपलें पहिलें कर्तव्य आहे. असें ज्योतिबांना वाटत होतें." ( नवजीवन संघटनेचें गौडबंगाल पा. नं. १५९–१६० ) ' धर्म ही अफूची गोळी आहे.' हे मार्क्सप्रणित तत्त्व घेऊन त्यानुसार इथें ज्योतिबाच्या विचारांचा साम्यवादी अर्थ लावण्याचा प्रयत्न केला आहे. श्री. केशवराव जेधे यांनीं देखील दाभाडीच्या भाषणांत ज्योतिराव व सत्यशोधक चळवळ यांचा वर्गीय अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न केला आहे.

राष्ट्रवाद, धर्मवाद, साम्यवाद याचप्रमाणें सुधारणावादाचा निकषावरून म. ज्योतिराव व त्यांची चळवळ यांचे गुणदर्शन करण्याचा कांहीं ठिकाणी प्रयत्न दिसतो. राजा राममोहन रॉय, लोकहितवादी, आगरकर, रानडे यांच्याप्रमाणें म. ज्योतिराव फुले हे समाजसुधारक होते हा या वर्गाच्या विचाराचा आशय ! नवजीवन संघटनेच्या अग्रणींनीं हा विचार लोकसखा या आपल्या साप्ताहिकांतून इ. स, १९४९–५० साली मांडलेला दिसतो.

## मानवतावादी मानदंड

वरील वर्गीकरण कांटेकोरपणानें करतां येणार नाहीं. त्यामुळें या विवेचन पद्धतींत फार मोठे अंगभूत दोष निर्माण होतील. अभ्यासाच्या सोयी-

साठीं ढोवळ मानानें वरील विचार शाखा कल्पिलेल्या आहेत. कांहीं समीक्षकांत आपणांस राष्ट्रवाद व धर्मवाद यांचा मिलाफ दिसतो तर कांहीं अभ्यासकांच्या दृष्टिकोनांत साम्यवाद व सुधारणावाद यांचा समन्वय आढळतो. माझ्या दृष्टीनें प्रा. गं. बा. सरदारांच्या महाराष्ट्राचे उपेक्षित मानकरीमध्यें दुसऱ्या समन्वयाचें प्रतिबिंब पडलें आहे. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनीं इ. स. १९४७ सालीं प्रसिद्ध केलेल्या 'ज्योति निबंधां'त नव्या टीका–मूल्यांचा वापर केला आहे. त्यामध्यें त्यांनीं ज्योतिराव हे मुख्यतः मानवतावादी कसे होतें हें सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु त्यांच्या विवेचनांत क्वचित प्रसंगीं या मानवतावादी मानदंडावर साम्यवादी पुसट लाल छटा पडल्याची शंका मनाला चाटून जातें.

त्यांच्या पुस्तकाची सुरुवात जरी हिंदुस्थानांतील सामाजिक गुलामगिरीच्या विरुद्ध बंड पुकारणारा पहिला पुरुष या अर्थपूर्ण वाक्यानें होत असली तरी त्याचा शेवट मात्र राष्ट्रीय चळवळीच्या व शेतकरी कामकरी राज्याच्या सुखस्वप्नानें झाला आहे. " वरिष्ठ वर्ग हे शिक्षित आणि व्यवहारांत मुरलेलें असल्यामुळें ते स्वतःची फसवणूक होऊं देत नाहींत. त्यांचा स्वतःच्या हितसंबंधावर जागरूक पहारा असतो." अशा वर्गीय तत्त्वज्ञानाची अंधुक छाया त्यांच्या या निरुपणांत आढळते. त्याचप्रमाणें शेतकरी कामकरी राज्याचा वर्गीय आशय ते ज्योतिरावांच्या विचारांत पहात आहेत. ते वरील पुस्तकाच्या उपसंहारांत म्हणतात, " मुसळाला अंकुर फुटणें जसे अशक्य तसेंच राष्ट्रवादी चळवळीला शेतकरी कामकरी राज्याचें फळ येणें अशक्य आहे. बहुजन समाजाला अजून कित्यक वर्षें शेतकरी कामकरी राज्याचें नुसतें स्वप्नच पहावें लागेल. कदाचित् तें स्वप्न सुद्धां दिसूं नये असा बंदोबस्त करणारे स्वराज्य लवकरच उत्पन्न होईल. त्या स्वराज्यांत अज्ञानाच्या मोहनिद्रेंत गाढ झोपलेली जनताच आपणांस पहावयास सांपडेल. माझें काम धोक्याची सूचना देणें एवढेच आहे. मी फुले यांचें विचारांत ती धोक्याची सूचना आहे हें पाहिलें म्हणून फुले यांच्या थोर विचाराचा परामर्ष घेतला." ( ज्योति निबंध, पा. नं. ३५ )

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या वरील विवेचनांत मानवतावादाबरोबरच अंशतः तरी साम्यवादी निकषांचा आश्रय केला आहे मानवतावादी व साम्यवादी निकष परस्परपूरक नसून ते एकमेकाशीं विरोधी आहेत असें माझें मत आहे.

इ. स. १९४७ सालीं रॉयपक्षाचें अध्वर्यु असतांना शास्त्रीबुवांनीं हे पुस्तक लिहिलें. त्यावेळचा त्यांचा वैचारिक प्रवास लक्षांत घेतां त्यांचे वरील दोन्ही निकष मला स्वाभाविक वाटतात. शास्त्रीबुवा त्यावेळीं वैचारिक जीवनाच्या दृष्टीनें संधिकालामध्यें होते. वर्ग–विग्रहाचा साम्यवादी विचार टाकून नव्या मानवतावादाचा पुरस्कार ते त्यावेळी करीत होते. एक विचार–धारा टाकून दुसरें तत्त्वज्ञान स्वीकारण्याच्या संक्रमणावस्थेंत त्यांच्या निबंधामध्यें दोन्ही विचारांच्या पडछाया आढळणें स्वाभाविक होते. त्यांच्या या निबंधांत दिसणाऱ्या या वर्गविग्रही विचाराची ही पार्श्वभूमि लक्षांत घेतली म्हणजे आपणास चटकन् त्यांच्या अशा मूल्यमापनाचा बोध होईल.

म. ज्योतिबा फुले यांच्या जीवन कार्यासाठीं व त्यांच्या चळवळीच्या फलश्रुतीसाठीं अभ्यासूंनीं आतांपर्यंत ज्या वरील निरनिराळ्या कसोट्या लावल्या त्या निखालस चुकीच्या होत्या असें म्हणणें खास धाडसाचे ठरेल. वरील प्रत्येक विचार–पंथामध्यें सत्यांचा कांहीं अंश असणें शक्य आहे. त्यानुसार कांहीं प्रमाणांत त्यांचा अन्वयार्थ अल्पसा योग्यहि ठरेल. परंतु म. ज्योतिबांचें सम्यक्‌दर्शन वरील कसोट्यामुळें होऊं शकेल कीं नाहीं याची शंका वाटते. कारण माझ्या मते ते पिंडानें भूतदयावादी मानवतावादी होतें. राष्ट्र, धर्म, शेतकरी कामकरीचे राज्य, समाज सुधारणा इत्यादि विषयक त्यांचे विचार त्यांच्या मानवतावादी प्रेरणेंतून बाहेर पडलेलें होतें. वरील विचाराच्या मुळाशीं त्यांची मानवतावादी विशाल प्रेरणा कार्य करीत होती. किंबहुना वरील सर्व प्रकारचे विचार हे त्यांच्या विश्वबंधुत्वाच्या उदात्त विचाराचे निरनिराळे मनोहर आविष्कार होते. म. फुल्याच्या साऱ्या आचाराला आणि विचाराला याच थोर विचाराची बैठक होती.

## आशय व अभिव्यक्ति यांमध्यें गल्लत

त्यांनीं आपल्या ग्रंथांतून 'भटशाही' वर अत्यंत कडकडून हल्ले केले आहेत. ब्राह्मणांवर अतिशय टीका केली आहे. परंतु त्याच्या मुळाशीं मानवतावादी प्रेरणा होती. ज्योतिबांचा खराखुरा अभ्यास करायचा असेल तर आपणास त्यांच्या विचाराचा आशय व त्यांची अभिव्यक्ति यामध्यें फरक केला पाहिजे. त्यांच्या विचारांची अभिव्यक्ति बरीच ओबड धोबड, क्वचित प्रसंगी ' ब्रह्मद्वेष्टी ' वाटतें. परंतु या बाह्य आविष्कारावरून घाईघाईनें त्यांचे मूल्यमापन करूं नये. या ब्रह्मद्वेष्टया अभिव्यक्तीमागील आशय हा तपासला पाहिजे. तेथें आपणास सामाजिक गुलामगिरीमुळें व अन्याय्य जातिव्यवस्थेमुळें तडफडत असलेल्या त्यांच्यांतील मानव्याचा शोध लागेल. शेंकडो वर्षें सामाजिक गुलामगिरीच्या टांचेखाली चिरडल्या जाणाऱ्या माणूसकीचें मूक आक्रंदन त्यांना ऐकूं येत होते. त्यामुळें अस्वस्थ होऊन त्यांनीं अत्यंत त्वेषानें या सामाजिक दास्यावर हल्ला केला होता. ब्राह्मणावरील त्यांचा हल्ला मुख्यतः ब्राह्मणशाही किंवा जातिव्यवस्था यावर होता. आशय आणि अभिव्यक्ति यामध्यें गल्लत झाल्यानें ज्योतिबांबद्दल खूप अपसमज सर्वत्र पसरले. त्याला अंशतः ज्योतिबा जबाबदार असतील कदाचित त्यांच्याहूनहि त्यांचे टीकाकार याला अधिक जबाबदार असतील.

'मानवी ऐक्य हे एकच सत्य आहे' हा त्यांच्या विचारांचा गाभा आहे. याच एका 'सत्या'च्या शोधासाठीं आयुष्यभर ते भटकत होते. त्याचा शोध त्यांना त्यांच्या जीवनांत लागला. म्हणूनच त्यांना सत्यशोधक ज्योतिराव म्हणावयाचे. या मानवी ऐक्याच्या आड जातिभेद, धर्मभेद, राष्ट्रभेद, खंडभेद लिंगभेद येतात म्हणून त्यांनीं या सर्व भेदावर प्रखर टीका केली आहे.

## ज्योतिरावांचा वैचारिक वारसा

आजच्या काळाला ज्योतिरावांच्या विचाराचा वारसा फार मोठा आहे. जातीभेदामुळें मनुष्यामनुष्यांमध्यें निष्कारण उच्चनीच भेद पडले हें त्यांना मान्य नव्हतें. जातिभेद ही मानवी समतेच्या आड येणारी मोठी गळ आहे म्हणून त्यांचा तिच्यावर राग होता. ज्योतिबांच्या टीकेमागील ही प्रेरणा आपण लक्षांत घेतली म्हणजे आपण त्यांना चांगले

समजूं शकू. जातिभेदाप्रमाणें धर्मभेद व राष्ट्रभेद यावरहि त्यांनीं आपल्या ग्रंथांतून चौफर हल्ले केले आहेत. धर्म मानव संघामध्यें शत्रुत्त्व निर्माण करतो. 'मानव तेवढा एक' हें महान सत्य त्याला विसरायला लावतो. धर्माच्या नांवाखाली आतांपर्यंत माणसानें एकमेकांच्या रक्ताच्या अनेक नद्या वाहविल्या आहेत. धर्मभेद टाकून द्या असाहि विचार त्यांनीं आपल्या सार्वजनिक सत्यधर्म यांतून मांडला आहे. जातिभेद आणि धर्मभेद याप्रमाणें राष्ट्रभेदावर त्यांनी केलेली टीका फार मोलाची आहे. राष्ट्रवाद हा पिंडानें आक्रमक असून तो युद्धपिपासू आहे. राष्ट्राच्या वैभवासाठीं माणून भ्रातृभाव सोडून वर्षानुवर्षें एकमेकाशीं वैर करतो. राष्ट्रवादाचा इतिहास माणसातील संवादित्वाच्या विनाशाचा इतिहास आहे. माणसानें या खोट्या अभिमानापासून अलिप्त रहावे. ज्योतिबांचा हा विचार फार महत्त्वाचा आहे. आश्चर्य असे कीं अशाच प्रकारचा विचार युरोपमध्यें याच काळामध्यें लॉर्ड अॅक्टन सारखा विचारवंत मांडीत होता. त्यानें इ. स. १८६२ मध्यें एके ठिकाणीं म्हटले आहे.

**" Nationality does not aim either at liberty or prosperity, both of which it sacrifices to the imperative necessity of making the nation the mould and measure of the state. Its course will be marked with material as well as moral ruin. "**

( मानवी स्वातंत्र्याची जोपासना करावी किंवा समृद्धि करावी असा राष्ट्रावादाचा हेतु नसतो. राष्ट्राला राज्य सरकारच्या ठराविक मोजमापांत व सांच्यात बसविण्यासाठीं राष्ट्रवाद स्वातंत्र्याचा व समृद्धीचा बळी घेतो. राष्ट्रवाद जसजसा वाढेल तसतसा भौतिक व नैतिक अध:पातच होत राहील.)

लॉर्ड अॅक्टन यांच्या आणि ज्योतिबांच्या विचारांत कितीतरी साम्य आहे. जातिभेद, धर्मभेद, राष्ट्रभेद या सर्व भेदावर हल्ला करण्यापाठीमागची ज्योतिबांच्या भूमिका शुद्ध विश्वकुटुंबवादाची होती. सामाजिक गुलामगिरीविरुद्ध बंड करणारा आणि मानवी समता आणि स्वातंत्र्य यांच्यावर अचल विश्वास घोषित करणारा आधुनिक भारतांतील हा पहिला पुरुष आहे. उद्यांच्या प्रबोधनाच्या चळवळीला त्यांचा हाच प्रमुख वैचारिक वारसा आपण अभिमानानें जतन केला पाहिजे. (समाप्त)

# याच लेखकाचीं इतर प्रकाशनें

पुणे विद्यापीठांतील बहि:शाल शिक्षण मंडळाच्या बहि:शाल प्रकाशनाच्या वतीनें प्रसिद्ध झालेलें

## ‘ व्यक्ति-स्वातंत्र्याचा विकास ’

★

## मनुष्य आणि मुंग्या

स्वाध्याय माला अ. वि. गृह प्रकाशन, पुणें.

# आगामी प्रकाशनें

### मुंबई राज्यांतील नगरपालिकांचा कारभार

नगरपालिकांचा गेल्या शतकांतील विकास, त्यांची अंदाजपत्रकें, कारभारांतील कार्यक्षमता, त्यांच्यावरील सरकारी नियंत्रण या संस्थांतील पक्षराजकारण, कामगारांच्या चळवळी व इ. विषयांची चर्चा करणारा ग्रंथ

### नवमानवतावाद

साम्यवादाची मूलग्राही चिकित्सा करून त्यांतील उणीवा दाखविणारें व जीवनाचें नवें सर्वांगीण तत्त्वज्ञान सांगणारें कै. मानवेंद्रनाथ रॉय यांच्या नवमानवतावादाचा परिचय करून देणारे पुस्तक.

# संदर्भ ग्रंथ

## निबंध

( १ ) ब्राह्मणांचे कसब — लें.–ज्योतिबा फुले
( २ ) शिवाजीचा पोवाडा — ”
( ३ ) गुलामगिरी — ”
( ४ ) शेतकऱ्यांचा आसूड — ”
(५) इषारा — ”
( ६ ) सार्वजनिक सत्यधर्मप्रकाश
( ७ ) कुलकर्णी लीलामृत– ले. मुकुंदराव पाटील –प्रस्तावना भास्करराव जाधव.
( ८ ) भीमपुराण– भीमराव विठ्ठलराव महामुनी.
( ९ ) महाराष्ट्राचे उपेक्षित मानकरी – प्रा. गं. बा. सरदार
(१०) आजकालचा महाराष्ट्र – पाध्ये, टिकेकर
(११) ज्योति-निबंध – तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी
(१२) ‘नवजीवन संघटनेचें’ गौड बंगाल –– श्री. शंकरराव मोरे
(१३) समाजशास्त्र – डॉ. केतकर
(१४) भारतीय लोकसत्ता –– डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे
(१५) चिपळूणकर काल आणि कर्तृत्व – ग. त्र्यं. माडखोलकर

## चरित्रें व आत्मचरित्रें

( १ ) महात्मा फुले – आ. अ. मानकर
( २ ) महात्मा फुले  ए. के. घोरपडे
( ३ ) म. ज्योतिबा फुले यांचा अल्पपरिचय – पं. सी. पाटील
( ४ ) सत्यशोधक ज्योतिराव फुले–दा. गो. वैद्य व रा. ग. कालेकर

( ५ ) छत्रपती शाहू महाराज यांचे चरित्र – श्री. आ. बा. लठ्ठ
( ६ ) जीवन प्रवाह — श्री. माधवराव बागल

## वृत्तपत्रें व नियतकालिकें



| | | |
|---|---|---|
| भारत ज्योति— | ( इंग्रजी साप्तहिक ) | २१ मार्च १९४८ |
| ,, | ,, | १४ जून १९५० |
| दीनबंधु | ( मराठी साप्ताहिक ) | ७ मे १९४८ |
| ,, | ,, | ८ ऑक्टोबर १९४८ |
| ,, | ,, | २६ नोव्हेंबर १९४८ |
| ,, | ,, | ३ डिसेंबर १९४८ |
| सह्याद्रि | मासिक | मार्च १९४८ |
| ,, | ,, | एप्रिल १९४८ |
| ,, | ,, | मे १९४८ |
| ,, | ,, | जुलै १९४८ |
| ,, | ,, | ऑगस्ट १९४८ |
| टाइम्स ऑफ्. इंडिया | मुंबई | २२ ऑक्टोबर १९४८ |
| ,, | ,, | २९ ऑक्टोबर १९४८ |
| ,, | ,, | १ नोव्हेंबर १९४८ |
| ,, | ,, | २१ मे १९४९ |
| ,, | ,, | २२ एप्रिल १९५२ |

लोकसखा अंक — इ. स. १९४९ ते १९५०

‘ सत्यशोधक ’ मासिक, म. फुले विशेषांक
डिसेंबर १९५० — रा. ना. चव्हाण

—ज्ञानप्रकाश व केसरी अंक – इ. स. १९२० ते १९३५

—केसरी अंक इ. स. १९२० ते १९४०

(अ) Caste in India–Hutton J. H.

(ब) Caste and Race in India–by Ghurye, G. S.

(क) Ambedkar, B. R. – What congress and Gandhi have done to the untouchables.

(ड) Report of the Maharashtra University Commission 1942–43 Government of Bombay.

(इ) The proceedings of the legislative council Bombay–– years 1923, 1926, 27, 28.

(ई) Memorandum prepared by the Government of Bombay for the submission to the Indian Statutary Commission–1928.

(उ) History of Modern Marathi, 1903 literature Bhate–G. P.


REFBK-0008576